
वृषाली जोशी

# लिओ टॉलस्टॉय

## लघुकथासंग्रह



# लिओ टॉलस्टॉयच्या कथा

मूळ लेखक – लिओ टॉलस्टॉय

मराठी अनुवाद – वृषाली जोशी

© वृषाली जोशी
सर्व हक्क अनुवादिकेच्या स्वाधीन. या अनुवादातील कोणताही भाग कोणत्याही माध्यमातून प्रसिद्ध करण्यासाठी अनुवादिकेची पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता आहे.
दूरभाष ९९२१७४६२४५

**या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!**

# लिओ टॉलस्टॉयच्या कथा

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

### आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# लिओ टॉलस्टॉयच्या कथा

लेखक : लिओ टॉलस्टॉय

अनुवादिका: वृषाली जोशी

चलभाष : ९९२१७४६२४५

इमेल – vrishalisjoshi@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : १६ नोव्हेंबर २०२०(दिवाळी)

©esahity Pratishthan®2020

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

कथानुक्रम

१ प्रेम तिथे देव

२ दुर्लक्षित ठिणगी

३ प्रेमाची महती

४ रिकामा ताशा

५ अस्वलाची शिकार


६ तीन साधू

७ छोटारडा सैतान

८ तीन प्रश्न

९ अती प्रिय

# लिओ टॉलस्टॉय



Everyone thinks of changing the world but no one thinks of changing himself

‘वॉर अँड पीस’ व ‘ॲना कॅरेनिना’ यासारख्या जगप्रसिद्ध कादंबऱ्या लिहिणाऱ्या थोर रशियन लेखक लिओ टॉलस्टॉय, या १८२८ मध्ये रशियात जन्मलेल्या व ८२ वर्षांचे आयुष्य लाभलेल्या लेखकाच्या गोष्टींचे हे पुस्तक आहे.

त्याच्या लोकप्रिय कथांपैकी तीन गोष्टी या पुस्तकात आहेत. ‘प्रेमाची महती’, ‘प्रेम तिथे देव’ व ‘दुर्लक्षित ठिणगी’.

नावावरूनच तुमच्या लक्षात आले असेल, की ‘सर्वांवर प्रेम करा’ हा येशूचा संदेश यात सांगितलेला आहे.

रशियात पूर्वापार चालत आलेल्या तीन गोष्टी यात आहेत. यापैकी ‘तीन साधू’ व ‘रिकामा ताशा’ या कथा चमत्कार दाखवणाऱ्या असून, ‘छोटारड्या सैतानाची कथा’ सैतानाची दुष्ट प्रवृत्ती दाखवते.

‘अस्वलाची शिकार’ ही मुलांसाठी लिहिलेली गोष्ट असून, ‘तीन प्रश्न’ ही धार्मिक व राजकीय दृष्ट्या छळल्या जाणाऱ्या ज्यूंसाठी लिहिलेली गोष्ट आहे. ‘अती प्रिय’ ही फ्रेंच लेखक मोपांसा याच्या कथेवरून बेतलेली, थोडी विनोदी धाटणीची कथा वाटते.

‘एका माणसाला किती जमीन लागते’, ही कथा माझ्या ‘विश्वकथा २’ मध्ये येऊन गेलेली असल्याने, इथे दिलेली नाही.

Where Love Is, God Is

# प्रेम तिथे देव



एका गावात मार्टिन नावाचा एक चांभार रहायचा. तळघरात त्याची एक लहानशी खोली होती. त्याला एक खिडकी होती. त्यातून तो रस्ता बघू शके. त्यातून येणाऱ्या जाणाऱ्यांचे फक्त पाय दिसत. पण मार्टिन पायांवरून माणसे ओळखे. तो तिथे खूप वर्षे रहात होता आणि खूप माणसे त्याच्या ओळखीची होती. त्याच्या हाताखालून गेली नाही, अशी बुटांची एखादीच जोडी शेजारपाजारच्या भागात होती. तेव्हा तो स्वतः केलेले कामच खिडकीतून बघत असे. काही बुटांचा तळवा त्याने बदललेला असे, काहीला जोड दिलेला असे, तर काहींच्या वरच्या बाजूची काही दुरुस्ती त्याने केलेली असे. तो चांगले काम करे, चांगले

सामान वापरे आणि फारसे पैसे लावत नसे. लोकांना त्याचा भरवसा वाटे. त्यामुळे त्याच्याकडे भरपूर काम असे. काम किती दिवसात होईल, ते तो अचूक सांगे आणि त्या वेळात ते करून देई. उगीच खोटी आश्वासने देत नसे. त्यामुळे तो पंचक्रोशीत प्रसिद्ध होता आणि त्याच्याकडे कामाची कधीच कमी नसे.

मार्टिन नेहमीच एक चांगला मनुष्य होता. पण तो जसजसा म्हातारा होऊ लागला, तसतसा तो आत्म्यासंबंधी व ईश्वराच्या जवळ जाण्यासंबंधी, जास्त विचार करू लागला. तो त्याच्या मालकाकरता काम करत असतांना, त्याचा पैशांचा हिशेब पूर्ण होण्यापूर्वीच, त्याची बायको तीन वर्षांचा मुलगा मागे ठेवून वारली. त्याची आधीची सर्व मुले तान्ही असतानाच देवाघरी गेलेली होती. प्रथम मार्टिनने मुलाला गावाकडील त्याच्या बहिणीकडे पाठवायचा विचार केला. पण मग त्याला, मुलाला त्याच्यापासून दूर करायचा विचार नको वाटला. ‘माझ्या छोट्या कपिटॉनला, नव्या कुटुंबात रहाणे जड जाईल. मी त्याला माझ्याजवळच ठेवतो.’ असा विचार त्याने केला.

मार्टिनने मालकाला सोडले व मुलाबरोबर राहू लागला. पण मुले त्याच्या नशीबात नव्हती. जेव्हा मुलगा वडिलांना मदत करून आधार व आनंद देईल, अशा वयाचा झाला, तेव्हा

आजारी पडला. आठवडाभर त्याला खूप जास्त ताप आला व तो देवाघरी गेला. मार्टिन त्याला पुरून आल्यावर मोठ्याने ऊर बडवत, देवाच्या नावाने खडे फोडू लागला. दुःखाने पुन्हा पुन्हा त्याला मरण यावे, असे म्हणू लागला. त्याचे प्रेम असलेल्या तरुण मुलाला देवाने उचलून नेले आणि म्हाताऱ्याला मागे ठेवले म्हणून, देवाला कोसू लागला. त्यानंतर मार्टिन कधी चर्चमध्ये गेला नाही.

गेली आठ वर्षे वारकरी असलेला, मार्टिनच्या मूळ गावचा एक म्हातारा माणूस, ट्रोइटसा मठात जाताना वाटेत त्याच्याकडे आला. मार्टिनने त्याच्याजवळ स्वतःचे दुःख सांगून, मन मोकळे केले.

“अरे पवित्र माणसा, मला आता जगायची इच्छा नाही. मी देवाजवळ माझे मरण लवकर यावे असे मागतो, कारण मला आता आयुष्यात काही आशा उरली नाही.”

म्हाताऱ्याने उत्तर दिले, “तुला असे बोलायचा काही हक्क नाही. मार्टिन, देवाची करणी आपण जाणू शकत नाही. आपला तर्क नव्हे, तर देवाची इच्छा सगळे ठरवते. देवाची इच्छा अशी असेल, की तुझ्या मुलाने मरावे व तू जगावेस व ते

चांगल्यासाठीच असेल. तू स्वतःच्या सुखासाठी जगायचा विचार करतोस, म्हणून तू दुःखी होतोस.”

मार्टिनने विचारले, “पण एखाद्याने का जगावे?”

म्हातारा बोलला, “देवासाठी. त्याने तुला आयुष्य दिले आहे. त्याच्यासाठी तू जगले पाहिजेस. तू आता अधिक दुःख करू नकोस, मग तुझ्यासाठी सर्व काही सोपे होईल.”

मार्टिन क्षणभर गप्प झाला व त्याने विचारले, “पण देवासाठी कसे जगायचे?”

म्हातारा उत्तरला, “देवासाठी कसे जगायचे, हे आपल्याला ख्रिस्ताने दाखवले आहे. तू वाचू शकतोस का? मग ख्रिस्ताच्या शिकवणीचे पुस्तक आणून वाच. त्यात सर्व काही दिलेले आहे.”

ते शब्द मार्टिनच्या हृदयात खोल रुतून बसले. त्याच दिवशी त्याने मोठ्या अक्षरातील, टेस्टॅमेंट आणून वाचायला सुरवात केली. पहिल्यांदा तो फक्त सुट्टीमध्ये वाचू लागला. पण एकदा सुरवात केल्यावर त्याचे मन इतके हलके होऊ लागले, की तो रोज वाचू लागला. काही वेळा तो वाचनात इतका गुंग होई, की दिव्यातील तेल संपले तरी, त्याला वाचन सोडवत नसे. तो रोज रात्री वाचू लागला. तो जितके जास्त वाचू लागला तेवढे त्याला जास्त स्पष्टपणे समजू लागले, की देवाला त्याच्याकडून काय हवे

आहे आणि तो देवासाठी कसा जगू शकतो. त्याचे मन अधिकाधिक हलके होत गेले. तो पूर्वी दुःखाने छोट्या कपिटॉनचा विचार करत, जड हृदयाने झोपायला जात असे. पण आता तो पुन्हा पुन्हा असे म्हणू लागला, "देवाचा विजय असो. देवाचा विजय असो. तू म्हणतोस तसेच मी करणार."

तेव्हापासून मार्टिनचे आयुष्य बदलले. पूर्वी तो सुट्टीच्या दिवशी बाहेर हॉटेलात जाऊन चहा पीत असे. आणि एखाददोन पेले व्होडका घ्यायलाही मागेपुढे बघत नसे. कधी मित्राबरोबर तिथे गेल्यास, व्होडका न घेताही आनंदाने मूर्खासारखे वागे. कुणाच्या अंगावर ओरडे किंवा त्याला शिव्या देई. पण आता त्या सर्व गोष्टी बंद झाल्या. त्याचे आयुष्य शांत आणि आनंदी झाले. तो सकाळी कामाला सुरवात करे आणि दिवसभराचे काम करून झाले, की तो दिवा खाली काढून टेबलाशी उभा राही, त्याचे टेस्टॅमेंटचे पुस्तक काढे आणि ते उघडून वाचत बसे. जितके तो जास्त वाचे, तितके त्याला ते जास्त समजे. त्याच्या विचारात स्पष्टता येत जाऊन, तो सुखी समाधानी बने.

एकदा असे झाले, मार्टिन खूप उशीरापर्यंत वाचत बसला. तो ल्यूकचे टेस्टॅमेंट वाचत होता. आणि सहाव्या प्रकरणात काही काव्य आलेः

तुमच्या एका गालावर कुणी मारले, तर दुसरा गालदेखील पुढे करा. तुमचे पांघरलेले वस्त्र कुणी काढून घेतले, तर तुमचा कोटही त्याला देऊन टाका. तुमच्याकडे काही मागणाऱ्या माणसाला, ते ते देऊन टाका. आणि ते परत मागू नका. त्याने तुमच्याशी जसे वागावे असे तुम्हाला वाटत असेल, तसे तुम्ही त्याच्याशी वागा.

त्याने अशीही कडवी वाचली, जेथे देव म्हणत होताः

“मला देव देव म्हणता, मात्र मी सांगितलेले ऐकत का नाही? जो कुणी माझ्याकडे येतो, त्याला मी तो कसा आहे ते सांगतो. मार्ग दाखवतो. तो घर बांधण्यासाठी खोल खणतो, व खडकावर पाया उभारतो. जेव्हा पूर येतो, तेव्हा पाणी घरावर जोरात उसळते. पण त्याचा पाया भक्कम खडकावर असल्यामुळे, ते घर हलत नाही. पण जो माझे ऐकत नाही, तो पायाशिवाय घर बांधणारा मनुष्य असतो. त्या घराला पाण्याने झोडपून काढल्यास, ते घर कोसळते आणि प्रचंड नुकसान होते.”

जेव्हा मार्टिनने हे शब्द वाचले, तेव्हा आतल्या आत त्याचा आत्मा सुखावला. त्याने चष्मा काढून पुस्तकावर ठेवला आणि त्याची कोपरे टेबलावर टेकवून, त्याने वाचलेल्या भागावर परत

नजर फिरवली. त्याने स्वतःचे आयुष्य त्या निकषांवर तपासून बघितले.

'माझे घर खडकावर बांधलेले आहे की वाळूवर? जर ते खडकावर उभे असेल, तर ते सुरक्षित आहे. मी देवाने सांगितलेले सगळे ऐकतो का, असा विचार मी एकटा बसून करत असतो. पण माझे लक्ष जरा विचलित झाले, की लगेच मी पाप करायला प्रवृत्त होतो. तरी मी तग धरतो. मला इतकी मजा येते. अरे देवा, मला मदत कर.'

असा विचार करत तो झोपायला जायला निघाला. पण त्याला पुस्तक सोडवत नव्हते. त्यामुळे तो --- जुन्या रोमन सैन्यातील, विधवेच्या मुलाचे, शतकाच्या अधिकाऱ्याचे --- सातवे प्रकरण वाचत राहिला. जॉनच्या शिष्यांचे उत्तर वाचत राहिला. एक श्रीमंत ढोंगी माणसाने उमरावाला घरी बोलावले व कथन केले की कशी एक पापी बाई येऊन त्याच्या पाया पडली व तिच्या अश्रूंनी त्याचे पाय भिजून गेले आणि त्याने कसा तिला न्याय दिला. चव्वेचाळीसाव्या कडव्यावर येत त्याने वाचलेः

त्या बाईकडे वळून तो सायमनला म्हणाला, "तू त्या बाईला पाहिलेस? ती म्हणाली, 'मी तुझ्या घरात शिरले, पण तू मला पाय धुवायला पाणीही दिले नाहीस.' पण तिने तिच्या अश्रूंनी माझे

पाय धुतले. तिच्या केसांनी पुसले.” ती म्हणाली, ‘तू माझ्या डोक्याला लावायला तेल दिले नाहीस’ पण तिने मलमाने माझे पाय चोळले.”

त्याने ही कडवी वाचून विचार केला, “त्याने पाय धुवायला पाणी दिले नाही, तिच्या डोक्यासाठी तेल दिले नाही --- आणि मार्टिनने चष्मा परत एकदा काढून, पुस्तकावर ठेवला व विचार केला.

तो माझ्यासारखा ढोंगी असणार. त्यानेही फक्त त्याचाच विचार केला --- एक कप चहा कसा मिळेल, आपण उबदार आणि आरामशीर कसे राहू, पण आलेल्या पाहुण्याचा विचार केला नाही. काहीच काळजी घेतली नाही. आणि पाहुणा कोण होता? देव स्वतः! तो माझ्याकडे आलेला असतांना मी असे वागावे का?”

मार्टिनने त्याच्या दोन्ही हातांवर डोके ठेवले. आणि काही समजण्यापूर्वी, तो झोपी गेला.

त्याला अचानक त्याच्या कानात गुणगुणल्यासारखा एक आवाज ऐकू आला, “मार्टिन”

त्याने झोपेतून उठून विचारले, “कोण आहे?”

त्याने वळून दाराकडे बघितले. तिथे कोणी नव्हते. त्याला परत हाक ऐकू आली. मग त्याला स्पष्टपणे ऐकू आले, “मार्टिन, मार्टिन! उद्या रस्त्यावर बघ. कारण मी येणार आहे.”

मार्टिन खुर्चीतून डोळे चोळत उठला. पण त्याला समजेना, की त्याने ते शब्द खरे ऐकले की स्वप्नात! दिवा मालवून, तो परत झोपला.

दुसऱ्या दिवशी तो उजाडण्यापूर्वीच उठला. प्रार्थना म्हणून झाल्यावर त्याने विस्तव पेटवून कोबीचे सूप केले व शिंगाड्याच्या पिठाचा केक बनवला. मग चहा करुन ॲप्रन घातला आणि त्याच्या कामासाठी खिडकीत बसला. काम करतांना त्याला रात्री काय झाले, ते आठवले. कधीतरी त्याला ते स्वप्नासारखे भासे आणि कधीकधी ते खरेच ऐकल्यासारखे वाटे. त्याने विचार केला, “अशा गोष्टी पूर्वी पण झालेल्या आहेत.”

त्यामुळे तो खिडकीत बसून राहिला. काम करण्यापेक्षा बाहेर लक्ष ठेवून राहिला. बिन ओळखीचे बूट दिसले, की थांबून वर तो चेहरा बघू लागला. नवीन बूट घातलेला एक हमाल व मग एक पाणक्या तिथून गेले. नंतर निकोलसच्या राज्यातील एक वयस्क सैनिक हातात फावडे घेऊन खिडकीजवळ आला. मार्टिन त्याचे बूट ओळखत होता. ते गबाळे व जुने होते. ते चामड्याचे असून

उंच होते. त्याचे नाव स्टेपानीटेह होते. शेजारच्च्या एका व्यापाऱ्याने त्याला दयेपोटी, त्याला त्याच्या घरी ठेवून घेतले होते. आणि त्याचे काम घरच्या हमालाला मदत करणे, हे होते. तो मार्टिनच्या खिडकीसमोरील बर्फ झाडू लागला. मार्टिनने त्याच्याकडे पाहिले व कामाला लागला.

मार्टिन त्याचे तर्क आठवून, स्वतःशी बोलला, "मी वयानुसार चक्रम होत चाललो असणार. स्टेपानीटेह माझ्या खिडकीशी येऊन बर्फ साफ करू लागल्यावर मला वाटले, की मला भेटायला ख्रिस्तच आला आहे. मी शरीर व मनाने थकलेला म्हातारा झालो आहे."

तरी डझनभर टाके घातल्यावर, त्याला परत खिडकीबाहेर बघावेसे वाटले. त्याने पाहिले की स्टेपानीटेहने त्याचे फावडे भिंतीला टेकून ठेवले आहे आणि तो विश्रांती घेत बसला आहे किंवा स्वतःला उबदार करतो आहे. तो म्हातारा आणि थकलेला होता. आणि खरे तर त्याच्यात बर्फ झाडण्याची शक्ती नव्हती.

मार्टिनने विचार केला, "मी त्याला आत बोलावून चहा दिला तर? किटलीतील चहा उकळतो आहे."

त्याने दाभण जागेवर ठेवून दिले. उठला व किटली टेबलावर ठेवली. चहा बनवला. मग खिडकीवर टकटक करून,

स्टेपानीटेहला खिडकीशी बोलावले व त्याला आत यायला सांगितले. स्वतः जाऊन दार उघडले.

“आत ये आणि थोडा उबदार हो. माझी खात्री आहे, तू गारठला आहेस.”

स्टेपानीटेह म्हणाला, “देव तुझे भले करो. थंडी माझ्या हाडांपर्यंत गेली आहे.”

त्याने आत येऊन बर्फ झटकला. जमिनीवरील पाणी तो पायाने सारवू लागला. पण असे करतांना तो घसरून पडला.

“काही त्रास घेऊ नकोस. मी जमीन पुसतो --- हे माझे कामच आहे. ये मित्रा, बस आणि चहा घे.”

त्याने दोन कप भरून एक पाहुण्याला दिला. स्वतःचा चहा बशीत ओतून, त्यावर फुंकर मारू लागला.

स्टेपानीटेहने त्याचा कप रिकामा केला. तो आभार मानू लागला. पण हे स्पष्ट दिसत होते, की त्याला अजून चहा दिल्यास बरे वाटले असते.

“अजून एक कप घे” असे म्हणत मार्टिनने परत दोघांचे कप भरले. त्याने त्याचा चहा प्यायला. पण मार्टिन रस्त्याकडे बघत बसला.

पाहुण्याने विचारले, “तू कुणाची वाट बघतो आहेस का?”

“मी कुणाची वाट बघतो आहे का? हो. मला तुला सांगायची लाज वाटते. खरे तर मी कुणाची वाट बघत नाही आहे. पण मी काल रात्री काहीतरी ऐकले, ते माझ्या मनातून जात नाही. ते खरे होते की भास होता, हे मी सांगू शकत नाही. मित्रा, काल रात्री मी ख्रिस्ताला कसा त्रास झाला, आणि तो कसा पृथ्वीवर उतरला, हा ल्यूकच्या टेस्टॅमेंटचा भाग वाचत होतो. मी अशी अपेक्षा करतो, की तुला ती गोष्ट माहिती असेल.”

स्टेपानीटेह उत्तरला, “मी त्याबद्दल ऐकले आहे, पण मी अज्ञानी माणूस असून, वाचू शकत नाही.”

“असे बघ, तो पृथ्वीवर कसा आला ते मी वाचत होतो आणि मग मी असे वाचले की तो एका ढोंगी माणसाकडे गेला, ज्याने त्याचे नीट  स्वागत केले नाही. मित्रा, मी ते वाचतांना, असा विचार केला, त्या माणसाने ख्रिस्ताचा नीट मान देऊन स्वागत केले नाही. समजा, माझ्यासारख्या माणसाच्या बाबतीत अशी गोष्ट झाली, तर मी विचार केला, त्याचे स्वागत करण्यासाठी मी काय करणार नाही! पण त्या माणसाने त्याचे काहीच आदरातिथ्य केले नाही. तर मित्रा, मी असा विचार करता करता, पेंगू लागलो आणि तेवढ्यात मला माझ्या नावाने कोणी

हाका मारत असल्याचे ऐकू आले. मी उठलो. कुणीतरी कुजबुजले, “मी उद्या येतो. माझी वाट बघ. असे दोनदा झाले. तुला खरे सांगायचे तर, ते माझ्या मनात इतके रुतून बसले, की मला ते सांगायची लाज वाटते. मी माझ्या प्रिय देवाची वाट बघतो आहे.”

स्टेपानीटेहने शांतपणे त्याचे डोके हलवले. त्याचा चहा संपवून कप बाजूला ठेवला. पण मार्टिनने तो घेऊन पुन्हा भरला.

“मित्रा, अजून एक कप पी. मी विचार करत होतो, की तो जमिनीवर कसा उतरला असेल! सर्वसामान्य लोकांबद्दल उबग न येता, त्यांच्यामध्ये तो कसा मिसळला असेल. आणि मी वाचले की लोकांमध्ये मिसळून त्याने आपल्यासारख्या कामगार, पापी लोकांमधून त्याचे शिष्य निवडले व तो म्हणाला, “जो स्वतःची उन्नती करेल, तो नम्रपणे वागेल आणि जो नम्रपणे वागेल, त्याची उन्नती होईल. तुम्ही मला देव म्हणता. मी तुमचे पाय धुवेन. मी गरीब, नम्र, शांत व दयाळू लोकांवर कृपा करतो.”

स्टेपानीटेह त्याचा चहा विसरून गेला. ऐकता ऐकता तो रडू लागला.

मार्टिन म्हणाला, “घे अजून चहा घे.” पण स्टेपानीटेहने त्याचा कप बाजूला ठेवला व त्याचे आभार मानून जाण्यासाठी उठला.

तो म्हणाला, “मार्टिन, मी तुझा आभारी आहे. तू मला माझ्या आत्म्यासाठी समाधान व शरीरासाठी अन्न दिलेस.”

मार्टिन बोलला, “त्यात काय मोठेसे? परत ये. मला माझ्याकडे पाहुणे आलेले आवडतात.”

स्टेपानीटेह निघून गेला. मार्टिनने उरलेला चहा ओतून पिऊन टाकला. मग चहाची भांडी आवरून, तो कामाला बसला. बुटाला शिवण घालू लागला. शिवता शिवता तो खिडकीबाहेर बघत राहिला. ख्रिस्ताबद्दल, त्याच्या सत्कृत्यांबद्दल, आठवत राहिला. त्याची वाट बघत राहिला. ख्रिस्ताच्या वचनांनी त्याचे डोके भरून गेले होते.

खिडकीवरून दोन सैनिक गेले. एकाचे बूट त्याचे स्वतःचे होते तर दुसऱ्याचे सैन्यातले होते. नंतर शेजारील घराचा मालक, चकाकणारे रबरी बूट घालून चालला होता. मग एक भट्टीवाला टोपली घेऊन चालला होता. हे सगळे गेल्यावर, लोकरीचे मोजे व शेतकऱ्याने बनवलेले बूट घातलेली एक बाई आली. ती खिडकीवरून चाललेली असतांना भिंतीशी थांबली. मार्टिनने

तिच्याकडे पाहिले. ती गरीबीचे कपडे घातलेली, कुणी पाहुणी स्त्री होती. ती बाळाला कापडात गुंडाळायचा प्रयत्न करत होती पण ते कापड पुरेसे नव्हते. त्या स्त्रीच्या सर्वांगावर उन्हाळ्याचे व ते सुद्धा गबाळे, फाटके तुटके कपडे होते. मार्टिनने खिडकीतून बाळाला रडतांना ऐकले. आणि ती स्त्री त्या बाळाला शांत करायचा प्रयत्न करत होती. पण तिला ते जमत नव्हते. मार्टिन उठला. दारातून बाहेर जात तिला बोलावले.

"बाई, अहो बाई!"

ते ऐकून ती बाई वळली.

"इतक्या थंडीत तुम्ही बाळाला घेऊन बाहेर का उभ्या आहात? आत या. आत उबदार जागी तुम्ही त्याला चांगले गुंडाळू शकाल. इकडून या."

ॲप्रन घातलेल्या, नाकावर चष्मा असलेल्या, तिला बोलावणाऱ्या म्हाताऱ्या माणसाला बघून, त्या बाईला नवल वाटले. पण ती आत आली. ते पायऱ्या उतरून लहानशा खोलीत गेले आणि मार्टिनने तिला अंथरूण दाखवले.

"इथे शेकोटीजवळ बसा. उब मिळवून मग बाळाला पाजा."

“माझ्याकडे दूध नाही. मी सकाळपासून काही खाल्लेले नाही. पण तरी तिने बाळाला छातीशी धरले. मार्टिनने मान हलवली व थोडासा पाव आणि वाटी आणली. कोबीचे गरम सूप आणून वाटीत ओतले. त्याने केकचे भांडेही आणले. पण तो अजून तयार झाला नव्हता. मग त्याने एक कापड अंथरून, फक्त सूप व पाव तिच्यासमोर मांडला.

“तुम्ही हे खाऊन घ्या. मी बाळाकडे बघतो. मलाही मुले होती. त्याना कसे सांभाळायचे, ते मला माहिती आहे.”

ती स्त्री उठली व टेबलाशी बसून खाऊ लागली. मार्टिन अंथरूणावरील बाळाशेजारी बसला. पण बाळ रडत राहिले. मार्टिन बोटांनी चुटक्या वाजवून, त्याचे मनोरंजन करायचा प्रयत्न करू लागला. त्याने बाळाच्या तोंडात त्याचे बोट घातले व लगेच बाहेर काढले. असे परत परत केले. पण त्याने ते बाळाच्या तोंडात जाऊ दिले नाही. कारण काम करतांना ते मेणाने काळे कुट्ट झाले होते. पहिल्यांदा बाळ ते बोट बघून शांत झाले व मग हसू लागले. त्यामुळे मार्टिन खूश झाला.

ती स्त्री खाता खाता बोलत होती. ती कोण आहे व कुठून आली आहे, हे तिने सांगितले.

ती म्हणाली, “मी सैनिकाची पत्नी आहे. त्यांनी त्याला आठ महिन्यांपूर्वी कुठेतरी लांब पाठवले आणि तेव्हापासून, मी त्याच्याबद्दल काहीही ऐकले नाही. मी मूल होईपर्यंत स्वयंपाकीणीचे काम करत, एका घरी रहात होते. पण नंतर ते मला ठेवून घेईनात. आता गेले तीन महिने माझे दुर्दैव चालू आहे. मला रहायला जागा नाही. खाण्यासाठी जवळचे किडूकमिडूक मी विकले. मी ओली दाई म्हणून काम मिळवण्याचा प्रयत्न केला पण जमले नाही. ते म्हणाले मी फार अशक्त व खंगलेली दिसते. आता मी एका व्यापाऱ्याच्या बायकोला भेटायला चालले आहे. ( माझ्या गावची एक बाई तिच्याकडे कामाला आहे ) आणि तिने मला काम मिळवून देण्याचे वचन दिले आहे. मला वाटते, आता सगळे नीट मार्गी लागणार. पण ती बाई म्हणते आहे की एक आठवड्याने ये. तिची जागा खूप लांब आहे आणि मी आता कंटाळून गेले आहे. बिचारे बाळही उपाशी आहे. घरमालकीणीला माझी दया येऊन, तिने मला फुकट रहायची परवानगी दिली आहे. मला कळत नाही, की मी आता काय करू.”

मार्टिनने उसासा टाकत विचारले, ”तुमच्याजवळ काही उबदार कपडे नाहीत का?”

“माझ्याकडे उबदार कपडे कसे असतील? मी माझी शेवटची शाल कालच सहा पेनींसाठी विकली. मग त्या स्त्रीने येऊन बाळाला उचलले. मार्टिन उठला. भिंतीवर काही वस्तू लटकत होत्या. त्यातून त्याने एक जुने जाकीट शोधून आणले.

तो बोलला, “हे जरी झिजलेले व जुने असले, तरी बाळाला गुंडाळायला त्याचा उपयोग होईल.”

त्या स्त्रीने जाकीटाकडे व नंतर मार्टिनकडे पाहिले. तिने ते घेतले व तिला रडू फुटले. मार्टिन वळला आणि पलंगाखालून एक लहानशी पेटी आणली. त्यातील सामान विस्कटून तो काही शोधू लागला. त्या बाईसमोर बसला. ती म्हणालीः

“देव तुमचे भले करो. ख्रिस्तानेच मला तुमच्या खिडकीशी पाठवले. नाहीतर बाळ थंडीने काकडले असते. मी निघाले तेव्हा ते इतके गार नव्हते. पण आता बघा ते केवढे गार पडले आहे. नक्कीच ख्रिस्ताने तुम्हाला खिडकीतून बाहेर बघायला लावले असणार आणि मग तुम्हाला या बिचाऱ्या बाळाची दया आली असणार.”

मार्टिन हसून बोलला, “खरे आहे. त्यानेच माझ्याकडून हे करून घेतले. नाहीतर मी खिडकीबाहेर बघितलेच नसते.”

मग त्याने त्या स्त्रीला स्वप्नाबद्दल सांगितले. कसा देव त्याच्याकडे येणार असल्याचे बोलला, ते त्याने सांगितले.

ती स्त्री बोलली, “कोणाला माहिती? सगळे शक्य आहे.” ती उठली. तिने जाकीट स्वतःच्या खांद्यांभोवती व बाळाभोवती गुंडाळले. नंतर तिने वाकून मार्टिनचे परत एकदा आभार मानले.

मार्टिन बोलला, “कृपया, या सहा पेनी घ्या आणि तुमची शाल सोडवा.” त्या स्त्रीने छातीवर ख्रिस्ताचा क्रॉस काढला. मार्टिननेही तसेच केले. ती बाहेर पडली.

ती स्त्री गेल्यावर, मार्टिनने थोडे कोबीचे सूप प्यायले. भांडी आवरून ठेवली व परत काम करू लागला. पण खिडकीवर लक्ष ठेवायला विसरला नाही. सावली पडली की लगेच तो ते कोण आहे ते पाही. त्याच्या ओळखीचे काही लोक व काही अनोळखी लोक तिथून गेले पण विशेष असे कोणी नाही.

थोड्या वेळाने मार्टिनने सफरचंद विकणारी एक बाई त्याच्या खिडकीसमोर थांबलेली पाहिली. तिची टोपली मोठी होती पण त्यात थोडीच सफरचंदे होती. तिने बरीचशी विकली होती. तिच्या पाठीवर ती घरी घेऊन चाललेले, वेफर्सने भरलेले पोते होते. तिने ते नक्कीच विकत घेतले होते. तिला त्या पोत्यामुळे दुखापत होत होती. तिला ते एका खांद्यावरून दुसऱ्या खांद्यावर घ्यायचे होते.

म्हणून तिने ते खाली फूटपाथवर ठेवले व टोपली खांबावर ठेवली. पोत्यातील वेफर्स ती हलवू लागली. ती असे करत असतांना जुन्या, फाटक्या टोपीतील एक मुलगा धावत आला. टोपलीतील सफरचंद हिसकावून घेतले व पळू लागला. पण म्हाताऱ्या बाईच्या ते लक्षात आले व तिने त्याची बाही धरून त्याला पकडले. तो सुटायचा प्रयत्न करू लागला पण त्या बाईने त्याला दोन्ही हातांनी धरून ठेवले. त्याची टोपी भिरकावून दिली व त्याचे केस पकडले. मुलगा किंचाळू लागला आणि म्हातारी त्याच्या अंगावर ओरडू लागली. मार्टिनने हातातले दाभण खाली टाकले व दाराबाहेर पडला. पायऱ्या चढायच्या घाईत, त्याचा चष्मा पडला. पण तो रस्त्यावर धावत गेला. म्हातारी मुलाचे केस ओढून, त्याला रागावत होती. त्याला पोलिसाकडे नेण्याच्या धमक्या देत होती. मुलगा बचावाचा प्रयत्न करत म्हणत होता, “मी ते घेतले नव्हते. मला का मारते आहेस? मला जाऊ दे.”

मार्टिनने दोघांना बाजूला केले मुलाला हाताने धरून तो म्हणाला, “आजीबाई, त्याला सोडून द्या. ख्रिस्तासाठी त्याला क्षमा करा.”

“मी त्याला चांगली शिक्षा करणार आहे. म्हणजे वर्षभर त्याच्या ते लक्षात राहील. मी त्या चोरट्याला पोलिसाकडे नेणार आहे.”

मार्टिन म्हातारीपुढे गयावया करू लागला.

“आजीबाई, त्याला सोडून द्या. तो परत असे करणार नाही. ख्रिस्तासाठी त्याला क्षमा करा.”

म्हातारीने त्याला सोडून दिले. मुलगा पळून जाणार होता. पण मार्टिनने त्याला थांबवले व म्हणाला, “आजीबाईंची माफी माग. आणि परत असे करू नकोस. मी तुला सफरचंद घेतांना पाहिले.”

मुलाने रडत रडत तसे केले. “हे ठीक झाले. आणि आता हे सफरचंद तुझ्यासाठी घे. आजीबाई, मी त्याचे पैसे देतो.”

आजी म्हणाली, “तू त्या चोरट्याला अशा तऱ्हेने बिघडवशील. त्याला चांगले चाबकाने फोडून काढले पाहिजे म्हणजे तो आठवडाभर ते विसरणार नाही.”

मार्टिन बोलला, “आजीबाई, आजीबाई, ती आपली पद्धत झाली. देवाची नव्हे. त्याला आपण सफरचंद चोरल्याबद्दल मारले, तर मग आपण केलेल्या पापांचे काय?

म्हातारी गप्प बसली.

मार्टिनने तिला देवाची बोधकथा सांगितली, की कसे त्याने त्याच्या नोकराचे मोठे कर्ज माफ केले. आणि नोकराने कसे बाहेर जाऊन त्याच्या  कर्जबुडव्याचा गळा धरला. म्हातारी व मुलगा दोघांनीही ती गोष्ट ऐकली.

“देव आपल्याला दुसऱ्यांना क्षमा करायला सांगतो. नाहीतर आपल्यालाही कुणी क्षमा करणार नाही. प्रत्येकाला क्षमा करा आणि अविचारी लहान मुलाला तर नक्कीच करा.”

म्हातारीने तिची मान हलवून सुस्कारा टाकला.

ती म्हणाली, “खरे आहे. पण त्यामुळे ते फार बिघडतात.”

मार्टिन बोलला, “आपण मोठ्या माणसांनी त्याना, चांगले मार्ग दाखवले पाहिजेत.”

म्हातारी म्हणाली, “मी तेच म्हणते. मला सात मुले होती. आता फक्त एक मुलगी उरली आहे.” ती तिच्या मुलीबरोबर कशी व कुठे रहात होती व तिला किती नातवंडे होती, ते ती सांगू लागली. “आता मला शक्ती उरली नाही. तरीही नातवंडांकरता मी खूप काम करते. ती सर्वजण चांगली आहेत. मला भेटायला ते सोडून कुणीच येत नाही. छोटी ॲनी काही झाले तरी मला सोडून

जाणार नाही, ती मला म्हणते, “तू माझी आजी, आवडती आजी, प्रिय आजी आहेस,” त्या विचाराने म्हातारी एकदम हळूवार झाली. अर्थात तो त्या मुलाचा पोरकटपणा होता. देव त्याला मदत करो.” ती त्या चोर मुलाबद्दल म्हणाली.

ती म्हातारी ते पोते पाठीवर घेणार, तेवढ्यात तो मुलगा उडी मारून पुढे आला व बोलला, “आजी, मी ते ओझे घेतो. मी त्याच बाजूला चाललो आहे.”

म्हातारीने मान हलवली व ते पोते त्याच्या पाठीवर दिले. ते रस्ता चालू लागले. म्हातारी मार्टिनकडून सफरचंदाचे पैसे घ्यायचे विसरून गेली. मार्टिन त्याना रस्त्याने एकमेकांशी बोलत बोलत जाताना बघत राहिला.

ते दिसेनासे झाल्यावर मार्टिन घरात गेला. पायरीवर त्याचा न फुटलेला चष्मा बघून, त्याने तो घेतला व दाभण घेऊन परत त्याचे काम सुरु केले. थोडा वेळ काम केल्यावर, त्याला चामड्याच्या भोकातून दोरा पलीकडे घालायला दिसेना. मग त्याच्या लक्षात आले, की दिवे लावणारा रस्त्यातील दिवे लावायला आलेला आहे. त्याने विचार केला, ‘दिवेलागणी झाली.’ त्यामुळे त्याने घरातील कंदील लावून टांगला. परत काम करू लागला. एक बूट पूर्ण करून तो निरखून बघितला. तो ठीक झाला होता. मग हत्यारे

गोळा केली. तुकडे गोळा केले. दोरा व दाभण बाजूला ठेवले. दिवा खाली करून टेबलावर घेतला. मग मांडणीतून टेस्टॅमेंट बाहेर काढले. काल जेवढे वाचले तिथे त्याने खूण म्हणून, चामड्याचा तुकडा घालून ठेवला होता. ते पान उघडण्याऐवजी, दुसरेच पान उघडले गेले. ते उघडल्यावर त्याच्या मनात कालच्या स्वप्नाचा विचार आला. तो असा विचार करत असतानाच त्याला पदरव आला, जसे काही कुणी त्याच्यामागे चालते आहे. मार्टिन वळला आणि त्याला वाटले की अंधाऱ्या कोपऱ्यात कुणी माणसे उभी आहेत. पण ती कोण आहेत, ते त्याला कळेना. त्याच्या कानात कुणी कुजबुजले, "मार्टिन, मार्टिन, तू मला ओळखत नाहीस का?

मार्टिन उद्गारला, "कोण आहे?"

आवाज आला, "मी आहे." आणि कोपऱ्यातून स्टेपानीटेह पुढे येऊन हसला व ढगासारखा अदृष्य झाला.

अंधारातून आवाज आला, "मी आहे." आणि कडेवर बाळ घेतलेली बाई पुढे आली. ती हसली. बाळ हसले. आणि ते ढगासारखे नष्ट होवून दिसेनासे झाले.

पुन्हा एकदा आवाज आला, "मी आहे," आणि सफरचंदवाली म्हातारी व मुलगा हसत हसत पुढे आले. आणि तेदेखील अदृष्य झाले.

मार्टिनचा आत्मा आनंदी झाला. त्याने टेबलाशी जाऊन चष्मा घातला व टेस्टॅमेंटचे उघडलेले पान वाचायला सुरवात केली. त्या पानाच्या वर जे लिहिलेले होते, ते त्याने वाचले.

‘मी भुकेला होतो, तेव्हा तू मला अन्न दिलेस. मी तहानलेला होतो तेव्हा तू मला पेय दिलेस. मी कोणी परका असून, तू मला आत घेतलेस.’


पानाच्या तळाशी असे लिहिलेले त्याने वाचले.

‘तू तुझ्या या भावांकरता, जे काही केलेस, ते सगळे मला पोचले.’

मार्टिनला समजले, की त्याचे स्वप्न खरे ठरले. ख्रिस्त त्या दिवशी खरेच त्याच्या घरी आला होता आणि त्याने त्याचे यथोचित स्वागत केले होते.

A Spark Neglected Burns The House

# दुर्लक्षित ठिणगी



एकदा एका गावात इव्हान नावाचा शेतकरी रहात होता. त्याची परिस्थिती चांगली होती. त्याला तीन धडधाकट मुले होती. मोठ्याचे लग्न झाले होते. मधल्याचे ठरले होते आणि धाकटा तगडा असून तो घोड्यांकडे व शेतीकडे बघे. इव्हानची बायको काटकसरी व उरक असलेली होती. त्यांची सून शांत आणि कामसू असल्यामुळे, ते नशीबवान होते, अशा त्या कुटुंबाला सुखी न रहाण्यासारखे काहीच नव्हते. अस्थम्याचा त्रास असलेले इव्हानचे वडील विटांच्या उबदार अंथरुणावर, गेली

सात वर्षे पडून होते. तीन घोडे, त्यातील एक अगदी ३/४ वर्षांचा घोडा, गायवासरू, पंधरा बकऱ्या, असे पाहिजे ते, सगळे इव्हानकडे होते. स्त्रिया सर्व कुटुंबाचे कपडे शिवत, शेतीकामातही मदत करत आणि पुरुषमाणसे शेतात राबत. त्यांना नेहमी स्वतःसाठी पुरेसे धान्य असे. पुढची सुगी आली तरीही ते उरे. ओट विकून ते सारा भरणे व इतर गरजा भागवत. जर इव्हान आणि त्याचा शेजारी गॉर्डे इव्हानॉफचा मुलगा, लंगडा गॅब्रिएल यांच्यात, खूप लांबलेले, कटू भांडण नसते, तर इव्हान आणि त्याची मुले समाधानाने राहिली असती.

जोपर्यंत गॉर्डे जिवंत होता व इव्हानचे वडील घर सांभाळत होते, तोपर्यंत ते दोघे शेतकरी सख्ख्या शेजाऱ्यांसारखे रहात होते. जर दोन्ही घरांमधील स्त्रियांना गाळणे किंवा मोठे भांडे लागले किंवा पुरुषांना पोते लागले किंवा गाडीचे चाक मोडले व लगेच दुरुस्त होत नसेल, तर ते खऱ्या शेजाऱ्यांसारखी एकमेकांना मदत करत. जेव्हा गुरे एकमेकांच्या हद्दीत शिरत, तेव्हा ते त्याना नुसते हाकलत व म्हणत, “त्याना इकडे येऊन देऊ नका. आमचे धान्य तिथे पडलेले आहे.” त्या दिवसांमध्ये कुरणे किंवा गॅरेज कुलुपबंद करणे, एकमेकांपासून वस्तू लपवून ठेवणे, पाठीवर एकमेकांबद्दल वाईट बोलणे, हे प्रकार नव्हते.

तो वडिलांचा काळ होता. मग मुलांचा काळ सुरू झाला, तेव्हा सर्व बदलले.

ते अगदी क्षुल्लक कारणावरून, सुरु झाले.

इव्हानच्या सुनेची एक कोंबडी होती. एका हंगामात ती लवकर अंडी देऊ लागली. इस्टरसाठी सून अंडी जमवून ठेऊ लागली. रोज ती गॅरेजजवळ जाई, तेव्हा तिला गाडीत अंडे मिळे. पण एक दिवस, बहुधा मुलांनी कोंबडीला घाबरवल्यामुळे, ती कुंपणापलीकडे शेजाऱ्यांच्या अंगणात जाऊन बसली. तिने तिथे अंडी घातली. सुनेने कोंबडीचा विशिष्ट आवाज ऐकला. पण तिने विचार केला, ‘आता मला रविवारची तयारी केली पाहिजे. मी अंडी नंतर आणते. संध्याकाळी ती गाडीजवळ गेली, पण तिथे अंडी नव्हती. तिने सासूला व दिरांना जाऊन विचारले, की त्यांनी अंडी घेतली का. पण तिचा लहान दीर, तरास बोलला, “तुझ्या कोंबडीने शेजारच्या अंगणात अंडी घातली. तिथे ती केकाटत होती आणि मग काही वेळाने उडी मारून आपल्या अंगणात आली.”

सून तिच्या कोंबडीला बघायला गेली. ती इतर पक्ष्यांबरोबर डहाळीवर बसलेली होती व डोळे मिटून, झोपायच्या तयारीत

होती. सुनेला वाटले की कोंबडीला बोलता आले असते, तर तिनेच काय झाले, ते सांगितले असते.

नंतर ती शेजारी गेली. गॅब्रिएलची आई बाहेर आली व म्हणाली, “काय ग, काय हवे आहे?”

“आजी, आज सकाळी माझी कोंबडी उडून, तुमच्या अंगणात आली. तिने एक अंडे घातले नाही का?”

“आम्ही काही पाहिले नाही. आमच्या कोंबड्यांनी मागेच अंडी घालायला सुरवात केली आहे. आम्ही तीच गोळा करतो. इतर लोकांची अंडी घ्यायची आम्हाला काही गरज नाही. आणि बरका, आम्ही दुसऱ्याच्या अंगणात अंडी शोधण्यासाठी जात नाही.”

सून चिडली व बोलायला नको, ते बोलली. शेजारणीने त्यात रस घेऊन अजून काही अपशब्द बोलले. दोघी बायका एकमेकींना शिवीगाळी करू लागल्या. पाणी आणायला गेलेली इव्हानची बायको पण तिथे येऊन भांडू लागली. गॅब्रिएलची बायको बाहेर आली व पूर्वी झालेल्या व कधीही न झालेल्या गोष्टी उकरून, इव्हानच्या सुनेच्या अंगावर ओरडू लागली.

सगळ्यांचे आवाज एकाच वेळेस येऊन, तिथे गलका सुरु झाला. त्या विचार न करता तोंडाला येईल, ते बरळू लागल्या.

“तू अशी!” “तू तशी!” “तू चोर आहेस!” “तू चवचाल आहेस!” “तू तुझ्या सासऱ्यांना मरेपर्यंत उपाशी ठेवतेस.” “तू फार वाईट आहेस.” आणि असेच.

“अग दगडे, मी तुला दिलेल्या गाळण्याला तू भोक पाडलेस.” “आमच्या जोखडाखाली तू बादल्या ठेवतेस. तू आमचे जोखड परत देऊन टाक.” मग त्यांनी जोखड धरून पाणी सांडले. एकमेकींचे पदर ओढले व मारामारी करू लागल्या. शेतातून परत आलेल्या गॅब्रिएलने त्याच्या बायकोची बाजू घेऊन, भांडायला सुरवात केली. इव्हान आणि त्याचा मुलगा पण बाहेर येऊन, त्यांना सामील झाले. इव्हान बळकट मनुष्य होता. त्याने सर्वांना बाजूला करून गॅब्रिएलच्या दाढीतील मूठभर केस ओढून काढले. काय चालले आहे, बघायला लोक जमले आणि त्यांनी कसेबसे दोघांना बाजूला केले.

असे ते सर्व सुरु झाले.

गॅब्रिएलने त्याचे ओढून काढलेले केस एका वर्तमानपत्रात गुंडाळून, ते जिल्हा कोर्टात सादर केले. तो म्हणाला, “त्या देवीचे वण असलेला चेहरा घेऊन वावरणाऱ्याने, ओढून काढण्यासाठी मी दाढी वाढवली नव्हती.” त्याची बायको शेजारीपाजारी जाऊन

ओरडत सुटली, की आम्ही या इव्हानला हद्दपार करून सैबेरीयाला पाठवून देणार आहेत.

पहिल्यापासून इव्हानचे म्हातारे वडील झोपलेल्या उबदार अंथरुणावरुन, पडल्या पडल्या त्यांच्या मुलाबाळांना भांडणापासून परावृत्त करून, शांती प्रस्थापित करायच्या प्रयत्नात होते. पण कोणीच त्यांचे ऐकत नव्हते. त्यांनी सांगितले, "तुम्ही मूर्खपणा करत आहात. मुलांनो, अशा फालतू कारणावरून भांडण करण्यापूर्वी विचार करा. एका अंड्यावरुन सर्व सुरु झाले. मुलांनी ते घेतले असेल --- ठीक आहे. त्याचे काय एवढे? एका अंड्याची किंमत किती? देव सगळ्यांना भरपूर देतो. आणि समजा तुमच्या शेजाऱ्याने अपशब्द वापरले --- तरी तुम्ही ते नीट करून घ्या. त्यांना सांगा, की हे चांगल्या शब्दात कसे सांगता आले असते. जर तिथे मारामारी झाली, तर तसे कधीकधी होते, असे म्हणून सोडून द्या. आपण सगळे पापी आहोत. त्यामुळे समझोता करून भांडण मिटवून टाका. तुमच्यासाठी भांडण वाईट आहे."

पण तरुण मंडळींनी म्हाताऱ्या मंडळींचे ऐकले नाही. त्यांचे बोलणे काही अर्थ नसलेले व म्हातारचळ लागलेले आहे, असे ते समजले. इव्हानने त्याच्या शेजाऱ्यापुढे शरणागती पत्करली नाही.

तो म्हणाला, “मी त्याची दाढी कधीच ओढली नाही. त्याने स्वतःच ती ओढली. पण त्याच्या मुलाने माझ्या शर्टावर खिळे, स्क्रू असे सामान उडवून, तो फाडला --- बघा. बघा.”

इव्हान पण कोर्टात गेला. त्यांची केस चालवली गेली. हे सर्व चालू असतांना गॅब्रिएलच्या गाडीच्या आतील भागाचा एक सांधा नाहीसा झाला. गॅब्रिएलच्या घरातील स्त्रियांनी इव्हानच्या मुलावर त्याचा वहीम ठेवला. त्या म्हणाल्या, “रात्री आम्ही आमच्या खिडकीतून त्याला गाडीकडे जातांना पाहिले. शेजारी म्हणाले, की आम्ही त्याला दारुच्या गुत्त्यात जमीनदाराशी काही खोटेनाटे बोलतांना पाहिले.

तर ते दोघे कोर्टात गेले. घरी असा एकही दिवस गेला नाही, की भांडणे वा मारामारी झाली नाही. मोठ्या माणसांकडून शिकून, मुलेही एकमेकांना शिवीगाळी करत. बायका जेव्हा नदीवर कपडे धुताना भेटत, तेव्हा त्यांचे तोंड वाजे, तेवढे कपडेही आपटले जात नसत. आणि उच्चारलेला प्रत्येक शब्द कटू जहरी असे.

पुरुषमाणसे दुसऱ्याच्या कीर्तीला कलंक लागेल, असे काही बोलत. पण नंतर ते संधी मिळेल त्यावर, डल्ला मारू लागले. मुलांनी पण त्यांचे उदाहरण घेऊन वागणे चालू ठेवले. आयुष्य त्यांच्यासाठी अधिकाधिक कठीण झाले. गावकीच्या सभेत व

कोर्टातील जज्जसमोर इव्हान आणि गॅब्रिएल, एकमेकांना लोक कंटाळेपर्यंत शिव्याशाप देत रहात. गॅब्रिएल इव्हानला दंड करायच्या वा तुरुंगात टाकायच्या गोष्टी करे आणि इव्हानही गॅब्रिएलला तसेच बोलत राही. कुत्रे जसे एकमेकांवर भुंकतांना पिसाटतात, तसे ते एकमेकांवर थुंकून, एकमेकांवर रागावत व जितका जास्त वेळ हे भांडण चाले, तितके ते अधिकाधिक क्रोधित होत. तर दोघे शेतकरी कोर्टात गेले. आणि एकाला वा दुसऱ्याला दंड झाला किंवा तुरुंगात टाकले गेले. पण त्यामुळे ते एकमेकांवर अधिक खार खाऊन असत. ते म्हणत, "जरा थांब. तुला चांगली अद्दल घडवतो. असे सहा वर्षे चालू राहिले. इव्हानचे म्हातारे वडील झोपलेल्या उबदार अंथरुणावरुन, पडल्या पडल्या पहिल्यापासून त्यांना परतपरत समजावत राहिले, "मुलांनो तुम्ही काय करत आहात? हे एकमेकांना शिव्याशाप देणे थांबवा. आपापले काम करा. दुसऱ्याचे वाईट चिंतू नका --- ते तुमच्यासाठी चांगले ठरेल. तुम्ही जितका द्वेष कराल, तितके ते वाईट ठरेल."

पण कुणी त्यांचे ऐकत नसत.

सातव्या वर्षी एका लग्नामध्ये इव्हानच्या सुनेने गॅब्रिएलला घोड्याला चोरतांना पकडून, त्याला लाज आणली. गॅब्रिएल

थोडासा प्यायलेला होता आणि राग आवरू शकला नाही. त्याने तिला असा ठोसा लगावला, की ती आठवडाभर आडवी राहिली. ती तेव्हा गरोदर होती. इव्हानला आनंद झाला तो जज्जकडे तक्रार नोंदवायला गेला. ‘आता मला माझ्या शेजाऱ्यांपासून सुटका मिळेल. आता त्याचा तुरुंगवास किंवा सैबेरीयाला हद्दपारी, काही चुकत नाही.’ पण त्याचा मनसुबा पूर्ण झाला नाही. जज्जने ती केस निकालात काढली. कारण त्या स्त्रीची तपासणी केल्यावर असे आढळले, की तिला काही जखम वगैरे झालेली नसून, ती चांगली तंदुरुस्त आहे. मग इव्हान शांतीच्या न्यायमूर्तींकडे गेला. त्याने ती केस जिल्हा कोर्टाकडे सोपवली. इव्हानने त्या कोर्टातील कारकून व वरिष्ठ मंडळींना, एक गॅलन दारूची लाच देऊन, गॅब्रिएलला मारझोड करवायला सांगितले. कारकुनाने, गॅब्रिएलला शिक्षा वाचून दाखवली. ‘जिल्हा कोर्टात शेतकरी गॅब्रिएलला झाडाच्या फोकाने वीस फटके मारण्यात येतील.’

इव्हानने देखील ते ऐकले व गॅब्रिएलकडे त्याच्या प्रतिक्रियेसाठी बघितले. गॅब्रिएल पांढरा पडला व वळून, पॅसेजमध्ये गेला. इव्हानही त्याच्या पाठोपाठ घोड्याला बघण्यासाठी गेला. त्याने चोरून गॅब्रिएलला बोलतांना ऐकले, “फार छान! त्याने माझी पाठ झोडपून काढली. आता आग

लागेल. माझ्या शिक्षेपेक्षा वाईट अशी आग, त्याला नेस्तनाबूत करेल. हे शब्द ऐकून इव्हान लगेच परत कोर्टात गेला आणि जज्ज मंडळींना म्हणाला, “तो माझ्या घराला आग लावायच्या गोष्टी करतो आहे. तो असे बोलला, याला साक्षीदार आहेत.”

गॅब्रिएलला बोलावण्यात आले. “तू असे बोललास, हे खरे आहे का?”

“मी काही बोललो नाही. तुमच्या हातात सत्ता असल्याने, तुम्ही मला मारा. म्हणजे माझे बरोबर असून फक्त मला शिक्षा होणार. आणि त्याने मात्र त्याला हवे तसे वागावे.”

गॅब्रिएलला अजून पण काही बोलायचे होते. पण त्याचे गाल आणि ओठ थरथरू लागले. त्याने भिंतीकडे तोंड केले. त्याच्याकडे बघून कोर्टातील लोकही घाबरून गेले. त्यांनी विचार केला, “हा नक्कीच स्वतःची किंवा शेजाऱ्याची काही खोडी काढेल.

मग वयस्क जज्ज म्हणाला, “असे बघा, माझ्या लोकांनो, नीट विचार करा. आणि निर्णय घ्या. मित्रा गॅब्रिएल, तू गरोदर बाईला ठोसा लगावलास, हे बरोबर केलेस का? तुझे नशीब, की तिला काही झाले नाही. पण काय होऊ शकले असते, याचा विचार कर. हे बरोबर आहे का? तू त्याची माफी मागितलेली बरी!

मग तो तुला क्षमा करेल आणि आम्ही तुझ्या शिक्षेचा फेरविचार करू.”

कारकुनाने हे शब्द ऐकून शेरा मारला, “कायदा कलम ११७ खाली, हे होणे अशक्य आहे. दोन पक्षांमधील निर्णय झालेला आहे आणि कोर्टाने जाहीर केलेला निर्णय अंमलात आणला गेला पाहिजे.”

पण जज्जने कारकुनाचे ऐकले नाही. तो म्हणाला, “मित्रा, तुझी जीभ आवर. पहिला कायदा काय आहे, तर शांतीप्रिय देवाचे ऐकावे. जज्जने शेतकऱ्यांचे मन वळवायला सुरवात केली. पण त्यात तो यशस्वी होईना. गॅब्रिएल त्याचे काही ऐकून घ्यायला तयार नव्हता.

तो म्हणाला, “मी पुढच्या वर्षी पंच्याहत्तर वर्षांचा होईन. मला लग्न झालेला मुलगा आहे. मला आजपर्यंत, कोणीही फटक्यांची शिक्षा दिलेली नाही. आणि आता तो देवीचे वण असलेला इव्हान, मला फटक्यांची शिक्षा सुनावतो आहे. मी त्याला क्षमा करण्याबद्दल विनंती करू? नाही. मी खूप सहन केले --- मी इव्हानला चांगलाच धडा शिकवेन.”

पुन्हा गॅब्रिएलचा आवाज थरथरला. त्याला अधिक काही बोलवेना. तो वळला आणि बाहेर पडला.

कोर्टापासून गाव सात मैलांवर होते. इव्हान घरी पोचला, तेव्हा उशीर झाला होता. त्याने रात्रीसाठी घोड्याचे खोगीर काढून ठेवले आणि घरात शिरला. तिथे कुणीच नव्हते. स्त्रिया गुरे राखायला गेल्या होत्या. तरुण मुले अजून शेतावरून घरी आली नव्हती. इव्हान आत जाऊन विचार करत बसला. गॅब्रिएलने शिक्षा कशी ऐकून घेतली व तो कसा पांढरा पडला आणि त्याने कसे भिंतीकडे तोंड केले ते आठवून, त्याचे हृदय जड झाले. त्याला स्वतःला शिक्षा झाली असती, तर त्याला कसे वाटले असते, असा विचार तो करू लागला. त्याला गॅब्रिएलची दया आली. मग त्याने अंथरुणावरील वडिलांना खोकताना ऐकले व उठून बसलेले पाहिले. त्यांनी त्यांचे पाय खाली केले व कसेबसे उठून उभे राहिले. खुरडत खुरडत, ते बसायच्या जागी आले व बसले. असे करून ते बरेच दमले. घसा साफ होईपर्यंत खोकले. मग टेबलावर वाकत म्हणाले, "काय रे, त्याला शिक्षा झाली का?"

इव्हान उत्तरला, "हो. झाडाच्या फोकाने वीस फटके मारण्याची शिक्षा मिळाली."

म्हाताऱ्याने मान हलवली.

तो म्हणाला, “वाईट झाले. तू बरोबर वागला नाहीस --- त्याच्याकरताच नव्हे, तर तुझ्यासाठीही हे वाईट झाले --- ठीक आहे. ते त्याला बडवून काढतील. पण त्याने तुझे काही चांगले होईल का?

इव्हान म्हणाला, “तो परत असे करणार नाही.”

“कशावरून तो परत असे करणार नाही? तो तुझ्यापेक्षा काय वाईट वागला आहे?”

इव्हान म्हणाला, “का? त्याने मला दिलेला त्रास आठवा. त्याने माझ्या बायकोला जवळजवळ ठार मारले. आता तो आपल्या घराला आग लावायच्या गोष्टी करतो आहे. त्यासाठी मी त्याचे आभार मानू का?”

उसासा टाकत म्हातारा बोलला, “इव्हान, मी इथे असा वर्षानुवर्षे अंथरुणावर पडलेलो असतांना, जरा बाहेर जगात जाऊन बघ. तुला काय वाटते, तू सर्व जग पाहिले आहेस आणि मी काहीच पाहिलेले नाही --- काय रे मुला, तुला ते दिसत नाही? द्वेषबुद्धीमुळे ते दिसत नाही. दुसऱ्यांची पापे तुला दिसतात, पण स्वतःची दिसत नाहीत. तो वाईट वागला. आता काय बोलणार? तोच एकटा वाईट वागला असता, तर भयंकर राग कसा उत्पन्न झाला असता? माणसामाणसांमधील द्वेष आणि राग काय फक्त

एकाच बाजूने असतो का? तो दोन्ही बाजूने असतो. तुला त्याचे वाईट वागणे दिसते. पण स्वतःचे दिसत नाही. जर तो वाईट असता व तू चांगला वागला असतास, तर राग नसताच. त्याचे दाढीचे केस कुणी उपटले? त्याची गवताची गंजी कुणी विस्कटून टाकली? कुणी त्याला कोर्टात खेचले? तरी तू सगळा दोष त्यालाच देतोस? तू स्वतः वाईट, चुकीचे आयुष्य जगलास. मी कधी असा जगलो नाही. मुला, मी तुला हे शिकवले नाही. त्याचे वडील आणि मी, आम्ही असे रहात होतो का? आम्ही कसे रहायचो? दोन शेजाऱ्यांनी रहावे, तसे गुण्यागोविंदाने रहायचो. जर कोणाकडचे पीठ संपले, तर त्या घरातील स्त्री येऊन म्हणायची, "काका, थोडे पीठ हवे आहे." मी म्हणत असे, "आत जा आणि तुला काय हवे ते घे." जर त्यांच्या घोड्यांना चरायला न्यायला कुणी नसेल, तर मी म्हणत असे, "इव्हान जा. त्यांच्या घोड्यांकडे लक्ष दे. जर मला काही कमी पडत असेल, तर मी त्याच्याकडे जात असे, "गॉर्डे काका, मला अमुक तमुक हवे आहे." तो म्हणे, "घे तर मग." असे आमचे संबंध होते. आमचे जगणे सुकर होते. आणि आता --- तो शिपाई रोज उठून आम्हाला तुमच्या प्लव्हेनामधील भांडणांबद्दल सांगत असतो. { प्लव्हेना हे बल्गेरियामधील एक गाव आहे, जिथे १८७७ मध्ये तुर्क आणि रशियन यांचात दीर्घकाळ चालणारे भयंकर युद्ध झाले ] तिथे जे

युद्ध झाले, त्याहूनही भयंकर असे तुमचे भांडण आहे. हे कसले जगणे आहे! हे किती पाप आहे! तू घराचा कर्ता पुरुष आहेस. तू याचा जाब द्यायला मुखत्यार असशील. तू बायका मुलांना काय शिकवतो आहेस? दात विचकून गुरगुरायला, की चावा घ्यायला? का रे, परवाच्या दिवशी, तुझा तरास --- तो छोट्या --- शेजारच्या इरेनावर ओरडत होता, शिव्या देत होता. आणि त्याची आई, ते ऐकून हसत होती. हे योग्य आहे का? आता तुझ्याकडे उत्तर नसेल. मनापासून विचार कर हे असेच चालणार का? तू मला एक शब्द बोलणार. मी तुला दोन बोलणार. तू मला गुद्दा मारणार. मी तुला दोन मारणार. नाही. मुला, जेव्हा येशू पृथ्वीवर आला, तेव्हा त्याने आपल्या मूर्खांना काही वेगळे शिकवले --- जर तुम्हाला कोणी शिव्या दिल्या, तर शांत रहा. त्याला सद्सदविवेकबुद्धीची टोचणी लागेल. आपल्या देवाने आपल्याला असे शिकवले आहे. कुणी तुम्हाला एका गालावर मारले, तर दुसरा गाल पुढे करा. आणि म्हणा, “माझी तशीच योग्यता असेल, तर मला अजून मार.” मग त्याची सद्सदविवेकबुद्धी, त्याचा तिटकारा करेल. तो पश्चात्ताप पावून, तुझे ऐकेल. देवाने आपल्याला असे शिकवले आहे. उगीच वृथा अभिमानी बनू नका. काय? तू बोलत का नाहीस? मी म्हणतो, ते तुला पटते आहे ना?”

इव्हान शांत बसून, ऐकत होता.

म्हातारा खोकला. त्याने मोठ्या मुश्किलीने, घसा साफ केला व परत बोलायला सुरवात केली.

“येशूने आपल्याला चुकीचे शिकवले आहे, असे तुला वाटते का? हे सर्व आपल्या भल्यासाठीच आहे. तुझे येथील आयुष्य बघ. तुझ्यात त्या प्लव्हेनाचा संचार झाल्यापासून, तू बरा आहेस की बिघडत चालला आहेस? कोर्टाची पायरी चढल्यापासून, तिथे जाण्यायेण्याचा व खाण्याचा तुझा किती खर्च झाला, हे आठवून बघ.”

तुझी मुले चांगली निपजली होती. तुम्ही सगळे एकत्र छान रहात होतात. पण आता उत्पन्न कमी झाले आहे. का? तर तुझ्या मूर्खपणामुळे आणि दुराभिमानामुळे! तू तुझ्या मुलांबरोबर शेत नांगरून पेरणी करायला हवी होतीस. पण डोक्यातील वाईट विचारांनी तुला जज्जकडे किंवा लहान वकीलाकडे नेले. शेत वेळेवर नांगरले व पेरले गेले नाही. आता भूमाता नीट पीक उगवणार नाही. यावर्षी मका का कमी आला? तू तो कधी पेरलास? तू शहरातून परतल्यावर? आणि त्यातून तुला काय मिळाले? तुझ्या खांद्यावरचे ओझे तू वाढवलेस --- अरे मुला, तुझ्या व्यवसायाचा विचार कर. तुझ्या मुलांबरोबर शेतात व घरात

काम कर. जर कुणी तुला त्रास दिला, तर त्याला क्षमा कर. तशी देवाची इच्छा आहे. मग तुझे आयुष्य सुकर होईल आणि हृदयावरचा भार हलका होईल.”

इव्हान गप्प होता.

“माझ्या मुला, इव्हान, तुझ्या वृद्ध वडिलांचे ऐक. जा घोडा तयार कर आणि ताबडतोब सरकारी कार्यालयात जा. तिथे या प्रकरणाची तड लावून टाक. देवाचे नाव घेऊन, सकाळी जाऊन गॅब्रिएलबरोबर सलोखा करून टाक. त्याला उद्या घरी बोलाव. उद्या सुट्टी आहे. चहा कर व व्होडकाची बाटली तयार ठेव. हा दुष्ट व्यवहार थांबव. त्यामुळे भविष्यात काही वैर रहाणार नाही. तुझ्या बायको व मुलांना देखील, असेच वागायला सांग.”

इव्हानने एक सुस्कारा टाकला व विचार केला, ‘ते म्हणत आहेत, ते खरे आहे.’ आणि त्याच्या मनावरचे ओझे उतरले. फक्त आता सर्व गोष्टी कशा सावराव्यात, हे त्याला समजेना.

पण जणू त्याला इव्हानच्या मनातले कळल्याप्रमाणे, म्हातारा पुन्हा बोलू लागला,

“जा इव्हान. ही गोष्ट लांबणीवर टाकू नको. आग भडकण्यापूर्वी ती विझव. नाहीतर फार उशीर होईल.”

म्हातारा अजून काही बोलणार होता. पण तेवढ्यात छोट्या पक्ष्याप्रमाणे चिवचिवाट करत, बायका घरात शिरल्या. गॅब्रिएलला फटक्यांची शिक्षा झाल्याचे व त्याने इव्हानच्या घराला आग लावून देण्याचे ठरवल्याचे वृत्त, आधीच त्यांच्या कानावर गेले होते. त्यात त्यांनी अजून स्वतःची भर घातली होती. गॅब्रिएलच्या घरातील बायकांबरोबर त्यांची कुरणात काही बाचाबाची झाली होती, हे त्यांनी अंगणात उभे राहून सांगितले. गॅब्रिएलच्या सुनेने आता कशी नवीन धमकी दिली आहे, ते एकमेकींना सांगू लागल्या. जाणकार वकील आता गॅब्रिएलच्या बाजूने उभा राहिला. त्याने सर्व खटला पूर्णपणे फिरवला. आता रशियाचा राजा, झारला पाठवण्यासाठी, शाळामास्तर पुन्हा इव्हानविषयी नवीन अर्ज लिहू लागला. त्यात सगळे होते. गॅब्रिएलच्या गाडीच्या आतील भागाचा एक सांधा नाहीसा झाला ते, बागेसंबंधी काही, येथपासून ते इव्हानचे अर्धे शेतघर खरे तर त्यांचेच असल्यापर्यंतचे सगळे काही! ते काय म्हणत होते, ते इव्हानने ऐकले आणि तो गार पडला. त्याने गॅब्रिएलशी समझोता करायचा विचार सोडून दिला.

मालकाला करण्यासारखे शेतघरामध्ये नेहमी खूपच असते. इव्हानने बायकांशी बोलणे थांबवले नाही. तो मळणी करायच्या

ठिकाणी व कोठाराकडे गेला. त्याने आवराआवरी केली. तोपर्यंत सूर्य मावळून, मुले शेतावरून घरी आली. दोन घोड्यांच्या सहाय्याने त्यांनी हिवाळी पिकांसाठी नांगरणी केली. इव्हान त्यांना भेटला. कामाबद्दल चौकशी केली. सर्व सामान जागेवर ठेवायला मदत केली. घोड्यांचे खोगीर दुरुस्त करण्यासाठी बाजूला ठेवले. झाडांना आधार द्यायच्या काठ्या कोठाराखाली ठेवायला निघाला. पण तोपर्यंत अंधार होऊ लागल्याने, त्याने त्या होत्या तिथेच ठेवल्या व दुसऱ्या दिवशी त्या जागेवर ठेवायचे ठरवले. गुरांना खायला घातले. गेट उघडून, घोड्यांना बाहेर सोडले. तरास त्यांना चरायला सोडणार होता. त्याने नंतर गेट लावून घेतले व विचार केला, ‘आता मी जेवतो आणि झोपतो.’ त्याने घोड्याचे खोगीर घेऊन, घरात प्रवेश केला. या वेळेपर्यंत, तो गॅब्रिएलबद्दल व वडिलांनी सांगितलेल्या गोष्टींबद्दल विसरून गेला होता. पण त्याने पॅसेजमध्ये शिरण्यासाठी दाराचे हँडल धरले, तेव्हा त्याने कुंपणापलीकडून त्याच्या शेजाऱ्यांना, कोणाला तरी जोरजोरात शिव्या देतांना ऐकले. गॅब्रिएल म्हणत होता, “त्या राक्षसाचा काय उपयोग आहे? तो ठार करायच्याच लायकीचा आहे.” हे शब्द ऐकून, इव्हानचा शेजाऱ्यांबद्दलचा आधीचा सगळा राग उफाळून आला. गॅब्रिएल ओरडत असतांना, तो ऐकत राहिला. त्याचे ओरडून संपल्यावर, तो घरात गेला.

आत उजेड होता. त्याची सून विणकाम करत बसली होती. बायको जेवण तयार करत होती. त्याचा मोठा मुलगा कुत्र्याच्या पट्ट्याचे बक्कल नीट करत होता. दुसरा टेबलाशी पुस्तक घेऊन बसला होता. तरास रात्री घोड्यांना चरायला घेऊन जाण्याच्या तयारीत होता. घरातील सर्व काही आनंदी आणि झगमगीत असणार होते, पण तो भिकार --- वाईट शेजारी!

चिडलेला इव्हान घरात शिरला. बाकावरून मांजराला हाकलले आणि कचऱ्याची बादली चुकीच्या जागी ठेवल्याबद्दल, बायकांवर ओरडला. तो निराश होऊन, भुवया उंचावत, खोगीर दुरुस्त करायला बसला. जोरजोरात उच्चारलेले गॅब्रिएलचे आताचे शब्द, 'तो मारण्याच्या लायकीचाच आहे' आणि त्याने कोर्टात दिलेली आग लावायची धमकी, हे दोन्ही इव्हानच्या कानात घुमत राहिले.

त्याच्या बायकोने तरासला जेवण दिले. ते जेवून, त्याने मेंढीचे जुने कातडे गुंडाळून, कोट घातला. कंबरेला कसा लटकवला. थोडा पाव बरोबर घेऊन तो घोड्यांकडे गेला. त्याच्या मोठ्या भावाने त्याला निरोप दिला. पण इव्हान स्वतः उठून बाहेर पडवीमध्ये गेला. बाहेर खूप अंधार झाला होता. ढग दाटून आले होते. वारा सुटला होता. इव्हान पायऱ्या उतरून आला. मुलाला

घोड्यावर चढायला मदत केली. लहान घोडाही त्याच्या मागे गेला. तरास घोड्यावर बसून गावाकडे निघाला. घोड्यांवर बसलेली इतर मुले, त्याला सामील झाली. ते दिसेनासे होईपर्यंत, इव्हान तिथे उभा राहून शेजारून काही ऐकू येते का, याची चाहूल घेत राहिला. तो गेटजवळ उभा होता. पण त्याच्या डोक्यातून गॅब्रिएलचे शब्द काही जात नव्हते. ‘आग लागून तुझे भयंकर नुकसान होणार आहे.’

इव्हानने विचार केला, ‘तो अगतिक झाला असणार. हवा कोरडी आहे. वारा सुटलेला आहे. तो मागून येऊन हळूच आग लावेल व पळून जाईल. माझ्या घराला आग लावून निसटेल, नालायक! --- त्याला तसे करतांना कोणीतरी पकडले पाहिजे. मग तो पळू शकणार नाही.’ तो विचार त्याच्या डोक्यात इतका पक्का बसला, की तो पायऱ्या चढून वर घरात गेला नाही, तर बाहेर रस्त्यावर कोपऱ्यापर्यंत गेला. परत येऊन त्याने विचार केला, ‘मी माझ्या घराभोवती फिरतो. त्याच्या मनात काय आहे, कुणास ठाऊक?’ असा विचार करून दबक्या पाऊलांनी इव्हान गेटबाहेर पडला. कोपऱ्यावर गेल्यावर, त्याने वळून कुंपणाकडे बघितले. विरुद्ध बाजूच्या कोपऱ्यावरून कुणी अचानक हलल्यासारखे वाटले. जणू कुणी बाहेर येऊन, परत आत गेले.

इव्हान थांबला. कान व डोळे उघडे ठेवून, शांतपणे उभा राहिला. सर्व काही स्तब्ध होते. फक्त झाडांची पाने हलत होती आणि गवताची पाती खुसखुसत होती. पहिल्यांदा मिट्ट काळोख वाटत होता. पण डोळे सरावल्यावर, त्याला लांबचा कोपरा, पॅरापिट आणि तिथे पडलेला एक नांगर दिसू लागला. तो थोडा वेळ बघत राहिला. पण कुणी दिसले नाही.

इव्हानने विचार केला, ‘मला वाटते, ती माझी चूक होती. पण मी अजून चक्कर मारतो.’ तो दबक्या पाऊलांनी चालत राहिला. इव्हान इतक्या काळजीपूर्वक चालला होता, की त्याच्या बुटांचा आवाज त्यालाही येत नव्हता. तो लांबच्या कोपऱ्याशी गेल्यावर तिथे पडलेल्या नांगराजवळ काहीतरी चमकून क्षणार्धात नाहीसे झाले. तिथेच त्याला डोक्यावर टोपी घातलेला व वाकून चालणारा, एक माणूस स्पष्टपणे दिसला. हातात पेटलेल्या काड्यांचा गठ्ठा धरलेल्या त्याची, इव्हानकडे पाठ होती. एखाद्या पक्ष्याप्रमाणे इव्हानचे हृदय धडधडू लागले. नसा उत्तेजित झालेल्या अवस्थेत, तो पुढे सरकला. त्याचे पाय त्याला जाणवत नव्हते. त्याने विचार केला, ‘ओहो! आता तो निसटू शकत नाही. मी आता त्याला रंगे हात पकडतो.’

इव्हान त्याच्यापासून काही अंतरावर होता. तेव्हा त्याला एकाएकी झगझगीत प्रकाश दिसला. पण तो मगाशी पाहिलेल्या जागी नव्हता. पॅरापिटखालून प्रकाश चमकला. ज्वाळा छतापर्यंत गेलेल्या होत्या. आणि त्याखालील गॅब्रिएलची पूर्णाकृती दृषायमान होत होती.

बगळयावर झेप घेणाऱ्या ससाण्याप्रमाणे, इव्हान लंगड्या गॅब्रिएलकडे झेपावला. त्याने विचार केला, ‘आता तो माझ्या हातून सुटू शकत नाही. त्याला पकडतोच.’ पण गॅब्रिएलला त्याची चाहूल लागली असणार. त्याने [ ते कसे माहिती नाही पण त्याने जमवले ] चौफेर नजर टाकली व एखाद्या सशाप्रमाणे कोठाराजवळून सटकला.

त्याच्यामागे धावत येत इव्हान किंचाळला, “तू निसटू शकणार नाहीस.”

तो गॅब्रिएलला पकडायला जात होता, तेव्हा गॅब्रिएलने त्याला एकदम गुंगारा दिला. पण इव्हान त्याचा कोट खेचण्यात यशस्वी झाला. तो फाटला व इव्हान खाली पडला. तो सावरून उभा राहिला व ओरडू लागला, “मदत करा! त्याला पकडा! चोर! खून!” व परत धावू लागला. पण तेवढ्यात गॅब्रिएल त्याच्या गेटशी पोचला. तिथे इव्हानने त्याला गाठले व तो आता त्याला

पकडणार, तेवढ्यात इव्हानला जसे काही एखादा दगड त्याच्या कानशीलावर फेकला जावा, तसा एक जोराचा गुद्दा बसला. तो जवळजवळ बहिरा झाला. गॅब्रिएलने गेटजवळ पडलेली ओकची फांदी उचलून, इव्हानला सर्व शक्तीनिशी मारली होती.

इव्हान अवाक् झाला त्याच्या डोळ्यासमोर काजवे चमकले. त्याच्यासमोर अंधार पसरला. तो कसाबसा चालत, भानावर आला. तेव्हा गॅब्रिएल तिथे नव्हता. दिवसासारखा उजेड पडला होता. त्याच्या शेतघराच्या बाजूला जोरात आवाज येऊन, काही कोसळले. इव्हानने वळून बघितले तर त्याचे मागील गॅरेज धडाडून पेटले होते. कडेच्या शेडलाही आग लागली होती. ज्वाळा उसळून, धूर कोंदाटला होता. आग घराच्या दिशेने पसरत चालली होती.

त्याचे हात वर करत व मांड्या पिटत, इव्हान किंचाळला, “मित्रानो, हे काय आहे? मला काय करायचे होते, तर फक्त पॅरापिटखालून त्याला काढून चिरडायचे होते. मित्रानो, हे काय झाले?” --- तो परतपरत तेच बडबडत राहिला. त्याला ओरडायचे होते. पण त्याचा आवाजच फुटेना. त्याला धावायचे होते. पण पायच चालेनात. ते एकमेकात अडखळू लागले. तो हळूहळू सरकू लागला. पण पुन्हा अडखळला आणि श्वास कोंडून

पडला. पुन्हा श्वास चालू होईपर्यंत, तो शांत उभा राहिला व मग चालू पडला. त्याची फेरी पूर्ण व्हायच्या आत, मागील शेडने पेट घेतला होता. कडेची शेडसुद्धा जळत होती. घराबाहेर ज्वाळा लपलपत होत्या. घरातून अंगणात येणे अवघड झालेले दिसत होते. मोठी गर्दी जमली पण कोणीच काही करू शकत नव्हते. शेजारी त्यांचा ऐवज व महत्वाच्या चीजवस्तू घराबाहेर काढत होते आणि गुरांना बाहेर हाकलत होते. इव्हानच्या घरानंतर गॅब्रिएलच्या घरानेही पेट घेतला. वारा जोरात होता. रस्त्याच्या दुसऱ्या बाजूलाही आग भडकली आणि अर्धे गाव जळून खाक झाले.

इव्हानच्या घरी त्याच्या वडिलांना ते जेमतेम वाचवू शकले. कुटुंबातील माणसे नेसत्या वस्त्रानिशी बाहेर पळाली. घोडे रात्री चरायला बाहेर गेलेले असल्याने बचावले. गाईगुरे, कोंबड्या, पक्ष्यांचे बार, गाड्या, नांगर, ट्रॅक्टर, बायकांच्या कपड्यांच्या पेट्या, कोठारातील धान्य, सर्व जळून गेले!

गॅब्रिएलकडे गुरांना बाहेर हाकलले होते. आणि घरातील काही वस्तू बचावल्या.

आग रात्रभर धुमसत होती. इव्हान त्याच्या शेतघरासमोर उभा राहून, “हे काय आहे --- मित्रानो! एकाने पुढे होऊन फक्त हे

भांडण चिरडण्याची गरज होती.” असे बोलत होता. जेव्हा छत कोसळले, तेव्हा इव्हान आगीत शिरला आणि पेटलेला वासा घेऊन, तो बाहेर ओढू लागला. स्त्रियांनी त्याला तसे करतांना पाहून, बाहेर यायला सांगितले. तो वासा घेऊन बाहेर आला. परत आत जाऊन, दुसरा वासा आणू लागला. तेव्हा त्याच्या पायाखालचा आधार जाऊन तो आगीच्या मध्ये पडला. त्याच्या मुलांनी आगीत शिरून, त्याला बाहेर काढले. त्याचे केस थोडेफार जळाले, दाढी आणि कपडे जळाले. हात पोळले. पण त्याला काहीच वाटले नाही. लोक म्हणाले, “दुःखाने तो बधीर झाला आहे.” आग भडकत चालली होती आणि इव्हान पुन्हा पुन्हा तेच म्हणत होता.

“मित्रानो --- हे काय झाले? --- कोणीतरी हे थांबवण्याची गरज होती.”

दुसऱ्या दिवशी गावप्रमुखाचा मुलगा इव्हानला न्यायला आला.

“इव्हानबाबा, तुमचे वडील मरायला टेकले आहेत. त्यांनी तुम्हाला निरोप घेण्यासाठी बोलावले आहे.”

इव्हान वडिलांना विसरून गेला होता. त्याला काय सांगितले, ते समजलेच नाही.

“कोण वडील? कुणाला बोलावले आहे?”

“तुम्हाला बोलावले आहे. निरोप घ्यायला. आमच्या घरी ते मरणोन्मुख झाले आहेत. चला इव्हानबाबा.” तो मुलगा परत बोलला व त्याना दंडाला धरून, घेऊन जाऊ लागला. त्यांना घराबाहेर काढले, तेव्हा त्यांच्या अंगावर एक जळकी तुळई पडली व त्यांना भाजले. त्यांना गावातील पुढच्या भागात असलेल्या गावप्रमुखाच्या घरी नेण्यात आले. तिथे आग पोचली नव्हती.

जेव्हा इव्हान वडिलांकडे आला, तेव्हा तिथे फक्त मोठी सून होती. शिवाय काही मुले त्यांच्याजवळ बसली होती. बाकी सगळे अजून आगीच्या जागी होते. बाकावर झोपलेल्या म्हाताऱ्याच्या हातात मेणबत्ती होती [ रशियन चर्चच्या पद्धतीप्रमाणे, मरणाऱ्या माणसाच्या हातात मेणबत्ती दिली जाते. ] आणि त्याचे डोळे दाराकडे वळत होते. त्याचा मुलगा आत आला, तेव्हा तो थोडा हलला. म्हाताऱ्या बाईने त्याच्याजवळ जाऊन सांगितले, की त्याचा मुलगा आला आहे. त्याने त्याला जवळ आणायला सांगितले. इव्हान जवळ आला.

म्हाताऱ्याने बोलायला सुरवात केली, “इव्हान, मी तुला काय सांगितले? गाव कुणी जाळले?”

इव्हान उत्तरला, “त्याने, बाबा. मी त्याला तसे करतांना पकडले. त्याला गवताच्या गंजीला आग लावतांना मी पकडले. मी ती जळकी गवताची काडी काढून बाहेर फेकू शकलो असतो. आणि मग काही झाले नसते.”

म्हातारा म्हणाला, “इव्हान, मी मरायला टेकलो आहे. तुझ्यावरदेखील मरायची पाळी येणार आहे. चूक कुणाची आहे?”

इव्हान त्याच्या वडिलांकडे नुसता बघत राहिला. पण काही बोलू शकला नाही.

“आता देवासमोर सांग, हे कुणाचे पाप होते? मी तुला काय सांगतो आहे?”

मग इव्हान भानावर आला व सर्व समजला. तो शिंकला आणि बोलला, “बाबा, ती माझी चूक होती. बाबा, मला क्षमा करा. मी तुमच्यासमोर व देवासमोर अपराधी आहे.” तो वडिलांसमोर गुडघे टेकवून बसला.

म्हाताऱ्याने त्याचे हात हलवले. मेणबत्ती उजव्या हातातून डाव्या हातात घेतली. उजवा हात कपाळाशी नेऊन, क्रॉस काढायला बघितला, पण जमले नाही. तो थांबला.

त्याच्या मुलाकडे डोळे वळवून, तो म्हणाला, “देवाची स्तुती कर. देवाची स्तुती कर. इव्हान, इव्हान, मी काय म्हणतो आहे?”

“काय बाबा?”

“तुला आता काय केले पाहिजे?”

इव्हान रडत होता.

तो म्हणाला, “बाबा, मला कळत नाही, आता आपण कसे जगायचे?”

म्हाताऱ्याने डोळे मिटले. जणू शक्ती एकवटण्यासाठी ओठ हलवले. डोळे उघडून तो म्हणाला, “जर तू देवाच्या इच्छेप्रमाणे केलेस, तर तू तरू शकशील.” तो थांबून हसला व बोलला, “इव्हान लक्षात घे. मला हे सांगू नकोस, की आग कुणी लावली. तू दुसऱ्याचे पाप झाक. मग देव तुम्हाला दोघांनाही क्षमा करेल.” मग म्हाताऱ्याने मेणबत्ती दोन्ही हातात घेतली. हात दुमडून छातीवर ठेवले. एक खोल उसासा टाकला व स्वतःला ताणून मरण पावला.

इव्हान गॅब्रिएलविरुद्ध काही बोलला नाही.

इव्हानचा गॅब्रिएलवरचा राग गेला. गॅब्रिएलला आश्चर्य वाटले, की इव्हानने कुणालाच असे सांगितले नाही, की गॅब्रिएलने

आग लावली. पण काही दिवसांनी, त्याला त्या गोष्टीची सवय झाली. त्या माणसांनी भांडायचे थांबवले. ती कुटुंबे पांगली. पुन्हा घर उभारतांना दोन्ही कुटुंबे एकाच घरात राहिली आणि जेव्हा गाव परत बांधले गेले, तेव्हा त्यांना वेगळे रहाता आले असते. पण इव्हान आणि गॅब्रिएलने शेजारी शेजारी घरे बांधली आणि पूर्वीसारखे शेजारी राहू लागले.

सख्ख्या शेजाऱ्यांनी रहावे, तसे ते राहू लागले. देवाचा कायदा पाळायची वडिलांची आज्ञा, इव्हान स्मरत राहिला. पहिल्या ठिणगीलाच आग विझवत राहिला. पुन्हा पुन्हा गोष्टी सुरळीत करत राहिला. कोणी त्याला शिव्या देऊ लागले, तर तो त्याला परत शिव्या देण्याऐवजी, त्याला असे शिकवू लागला, की वाईट शब्द वापरू नयेत. तसेच त्याने स्वतःच्या बायको व मुलांना शिकवले. इव्हानचे पाय पुन्हा पहिल्यासारखे झाले आणि तो आता पूर्वीपेक्षाही सुखाने राहू लागला

# What Men Live By

# प्रेमाची महती



एक सायमन नावाचा चांभार होता. त्याच्याकडे जमीन, घरदार काही नव्हते. तो त्याच्या बायको व मुलांबरोबर एका झोपडीत रहायचा व चपला, बूट बनवून आपला उदरनिर्वाह करायचा. तो जेमतेम पोटापाण्यापुरते मिळवी. त्याच्याकडे व त्याच्या बायकोकडे मिळून थंडीसाठी एकच कोट होता. पण तो सुद्धा जीर्ण व फाटका होता. आता हे दुसरे वर्ष होते, की तो नवीन कोट आणायचा बेत करत होता. त्याच्या बायकोच्या पेटीत तिने

तीन रुपये लपवून ठेवले होते व त्याच्याकडे जमलेले पाच रुपये तीस पैसे होते.

एकदा सकाळी तो कोट आणायच्या तयारीने बाहेर पडला. त्याने शर्टावर, त्याच्या बायकोच्या आईने दिलेला कोट घातला. त्याने विचार केला पाच रुपये गिऱ्हाईकांकडून वसूल करायचे आहेत, ते करीन, पण तिघांपैकी कुणीच पैसे दिले नाहीत. सर्वांनी त्याला वाटेला लावले. त्याच्याबरोबर बायकोने दिलेले तीन रुपये होते. निराश होऊन त्याने वीस पैशांची दारू प्यायली व कोट न घेताच घरी निघाला. सकाळी त्याला थंडी वाजत होती. पण आता दारूने त्याच्या अंगात उब आली होती. स्वतःशीच बडबडत चालतांना त्याला असे वाटले, की आपल्याला कोटाच्या उबेची काही गरज नाही. सबंध दिवस काम करूनही आपल्याला पुरेसे पैसे मिळत नाहीत. आता कोटावरुन बायको बडबड करेल. पण मी तरी काय करू? असे बडबडत तो एका देवळाजवळ आला. तिथे त्याला काहीतरी पडलेले दिसले.

संध्याकाळ होऊ लागली होती. काळोखात त्याला नीट दिसेना. डोळे फाडून बघितल्यावर त्याला दिसले की तो एक मनुष्य होता. जिवंत की मेलेला? हालचाल तर काहीच नव्हती. तो चांभार घाबरला. त्याला वाटले, त्या माणसाला लुबाडून, कोणी

ठार केले आहे. आपण काही करायला गेलो, तर नसती आफत ओढवायची. म्हणून तो पुढे चालू लागला. मागे वळून पाहिले, तर त्याची थोडी हालचाल जाणवली. तो मनुष्य सायमनवरच दृष्टी लावून होता. सायमन आणखीच घाबरला. पुढे जावे की मागे वळावे? अरे बापरे! हा तर पूर्ण विवस्त्र मनुष्य आहे. इतक्या थंडीत हा कपड्यांशिवाय नक्कीच मरून जाईल. पण माझ्याकडे तर मी घातले आहेत, तेवढेच कपडे आहेत. देवा, मला इथून निघून जायला मदत कर, असा विचार करत तो पट्कन पुढे चालू लागला.

'त्या माणसाला तुझी गरज आहे, सायमन आणि तू पळून चालला आहेस.' त्याला सद्सदविवेकबुद्धीने टोचले. 'तो चोर असेल आणि तुला लुबाडेल, असे तुला वाटत असेल. पण लुबाडायला तुझ्याजवळ आहेच काय?'

सायमन मागे वळून त्या मनुष्याजवळ गेला. त्याच्याकडे पाहिले, तर तो चांगला तरुण, धडधाकट मनुष्य होता. अंगावर जखमाही नव्हत्या. पण तो बर्फासारखा थंड पडला होता. खूप घाबरला होता. त्याला डोळे उघडून, सायमनकडे बघवतही नव्हते. पण सायमन जवळ आल्यावर, त्याने कसेबसे डोळे उघडून

बघितले. त्याला बघून सायमनचे मन द्रवले. त्याने स्वतःचे बूट व कोट काढून त्या माणसाला घातले. कंबरेलाही काही गुंडाळले.

“आता काही बोलू नको. ही टोपी पण घाल.” स्वतःचे टक्कल व त्या माणसाचे दाट कुरळे केस पाहून, त्याने हा निर्णय घेतला. आता उठून थोडी हालचाल कर. म्हणजे थंडी कमी होईल. तू चालू शकतोस का?”

तो माणूस उठून सायमनकडे कृतज्ञतेने, बघू लागला. पण काही बोलला नाही.”

“तू काही बोलत का नाहीस? इथे फार थंडी वाजेल. घरी जायला हवे.”

तो मनुष्य उठून सायमनमागोमाग चालू लागला.

सायमनने विचारले, “तू कुठला आहेस/”

तो बोलला, “मी इथला नाही.”

“पण तू इथे देवळाशी कसा येऊन पडलास?”

“ते मी सांगू शकत नाही.”

“कोणी तुला त्रास दिला का?

“कोणीही त्रास दिला नाही, मला देवानेच शिक्षा केली आहे.”

“देवच सगळे घडवून आणतो. पण तुला काही खाणेपिणे व आसरा तर मिळवायला हवा. तुला कुठे जायचे आहे?”

“कुठेही. मला सर्व सारखेच आहे.”

सायमनला नवल वाटले. तो चोर नव्हता. बोलणेही सभ्य माणसासारखे होते. पण त्याला स्वतःचा थांगपत्ता सांगता येत नव्हता. ‘त्याच्या बाबतीत काय झाले असेल, कुणास ठाऊक!’, असा विचार करून सायमन त्याला म्हणाला, “ठीक आहे. माझ्या घरी चल. थोडे उबदार वाटेल.”

दोघे चालू लागले. सायमनला नुसत्या शर्टाने थंडी वाजत होती. तो स्वतःशीच बोलू लागला, ‘नवीन कोट आणायला म्हणून बाहेर पडलो आणि आता माझा जुना कोटही माझ्या अंगावर नाही. आणि या नवख्या विवस्त्र माणसाचे लचांड गळ्यात घेतले आहे. माझी बायको, मेरी आता नक्कीच आरडाओरडा करेल.’

तो उदास झाला. पण त्या अनोळखी माणसाची करुण नजर आठवून, त्याचे मन शांत झाले.

सायमनच्या बायकोने, त्या दिवशी सर्व काम आटपले होते. लाकडे तोडून आणली. पाणी भरले. मुलांना जेऊ घातले. स्वतःही जेऊन घेतले. अजून थोडी भाकरी उरली होती. ‘जर सायमन काही खाऊनच परत आला, तर ती उद्याला झाली असती’, असा विचार तिने केला. अजून एक जेवण होण्याइतकेच पीठ जेमतेम शिल्लक होते. मग ती सायमनचा फाटलेला शर्ट शिवत बसली. ती असा विचार करत होती, ‘आता नवरा नवीन कोट घेऊन घरी येईल. माझा नवरा अगदी साधाभोळा आहे. त्याने लोकांचे येणे वसूल केले असले, तर त्याला कोट आणता आला असेल.’

त्याला कुणी फसवले तर नसेल ना? मागचा हिवाळा आपण दोघांनी एका कोटावर कसाबसा काढला. मला ना नदीवर जाता आले, ना अजून कुठे!’ तिला पायरव आला. तिने काम थांबवले. तिला दोघे येतांना दिसले. सायमनबरोबर कोण होते? ते आत आल्याबरोबर मेरीला समजले की तिचा नवरा पिऊन आला आहे. त्याच्या अंगात फक्त शर्ट आहे. जवळ कसले पुडकेही नाही. व थोडा खजील होऊन तो उभा आहे. तेव्हा ती रागावली. तिने विचार केला, ‘आधीच याने दारुवर पैसे उधळले आहेत व कुणा भणंगाला बरोबर घेऊन आला आहे.’

आत आल्यावर तिने पाहिले, हा नवखा माणूस तरुण आहे. त्याने नवऱ्याचा कोट घातला आहे. पण आत शर्ट नाही. तो जागच्या जागी थिजल्यासारखा उभा होता आणि वरदेखील बघत नव्हता. तिला वाटले, हा कुणी घाबरट, वाईट मनुष्य आहे. सायमन सर्व काही सुरळीत असल्यासारखा आत येऊन बसला.

“चल मेरी, जेवण तयार असेल, तर वाढ.”

मेरी तशीच बसून राहिली. सायमनला कळले, की ती रागावली आहे. त्याने दुर्लक्ष करून, त्या अनोळखी माणसाला म्हटले, “मित्रा, काहीतरी जेव.” तो बसला.

मेरी पुटपुटली, “मी जेवण केले आहे, पण दारुड्यांसाठी नाही. तुम्ही नवीन कोट आणला का? जुना कोटही तुमच्या अंगावर नाही. कुणाला घेऊन आला आहात?”

सायमन ओरडला, “मेरी, तुझी टकळी बंद कर.”

ती खेकसली, “तुम्ही पैशांचे काय केलेत, ते सांगा.”

सायमनने तिला तीन रुपये खिशातून काढून दाखवले व गिऱ्हाईकांचे पैसे नंतर मिळणार असल्याचे सांगितले.

मेरी अजूनच रागावली. नोटा हिसकावून घेत म्हणाली, “काही जेवण वगैरे मिळणार नाही.”

“मेरी राग आवर. ऐकून तर घे.”

“दारुड्याकडून मी आता शहाणपणा ऐकू का?” तुमच्याशी लग्न केले, तेच चुकले. माझ्या आईने दिलेला कोट कुठे आहे?”

सायमनने तिला सांगायचा प्रयत्न केला की त्याने फक्त वीस पैसे खर्च केले व त्याला कशा अवस्थेत तो मनुष्य दिसला, हे ही सांगितले. पण ती काही ऐकून घ्यायच्या मनस्थितीत नव्हती. ती दहा वर्षांपूर्वीच्या ढीगभर गोष्टी बोलत बसली होती. रागाने ती बाहेर पडणार, तोच अचानक परत फिरली. हा नवखा माणूस कोण आहे, ते तिला बघायचे होते.

ती म्हणाली, “तो चांगला सभ्य माणूस असता, तर तो शरीराने उघडा सापडलाच नसता.”

“मी तेच तुला सांगायचा प्रयत्न करतो आहे.”

असे म्हणून त्याने तिला सर्व हकीगत सांगितली.

“अशा वेळी मी काय करायला हवे होते? त्याला तशा मरणासन्न अवस्थेत सोडून देणे, म्हणजे पापच ठरले असते. रागाऊ नकोस. आपल्या सर्वांना एक ना एक दिवस मरण येणारच आहे.”

मेरीच्या तोंडून रागीट शब्द बाहेर पडणार होते. पण त्या अनोळखी माणसाकडे बघून ती शांत झाली .तो अगदी चिडीचूप, गुडघ्यात मान घालून, हाताची घडी घालून बसला होता. डोळे मिटलेले होते. भुवयांमध्ये वेदना दिसत होती.

“मेरी, तू देवाचे नाही का करत?’

सायमन विचारता झाला. आणि एकदम मेरीला करुणेचा पाझर फुटला. आत जाऊन तिने जेवण टेबलावर आणून ठेवले. सायमन व तो माणूस, दोघेही जेवले. मेरीचे मन त्या नवख्या माणसाबद्दलच्या दयेने भरून गेले. एकदम त्या पाहुण्याचा चेहरा उजळला व तो मेरीकडे बघून हसला. सर्व काही आवरून ठेवल्यावर, ती त्या माणसाशी बोलू लागली.

“तू कुठून आलास?”

“मी इथला नाही.’

“पण तू रस्त्यावर कसा पडलास?’

“मी सांगू शकत नाही.”

“तुला कुणी लुबाडले का?’

“देवाने मला शिक्षा केली.”

“आणि म्हणून तू तिथे, विवस्त्र अवस्थेत पडलास.?’

“अशा अवस्थेत थंडगार पडलेल्या मला, सायमनने पाहिले. माझ्यावर दया दाखवून त्याने मला कपडे दिले व इथे घेऊन आला. तू मला खायला प्यायला दिलेस. माझ्यावर दया दाखवलीस. देव तुला याचे फळ नक्कीच देईल.”

मेरी उठली. ती शिवत असलेला सायमनचा शर्ट तिने त्याला आणून दिला. कोटाच्या आत घालायला लावला व त्याला उबदार जागी झोपायला दिले. मेरी झोपायला गेली. पण तिच्या डोक्यातून त्या माणसाचे विचार जाईनात. आता खायचे काय व थंडीपासून बचाव कसा करायचा, या विचाराने ती दुःखी झाली. पण त्या माणसाचे हास्य आठवून, तिचे मन आनंदी झाले. सायमनही जागा असल्याचे तिने पाहिले.

ती बोलली, “तो कोण आहे, ते सांगत का नाही?”

सायमन म्हणाला, “तसेच काही कारण असेल.”

“सायमन, आपण इतरांना देतो. पण आपल्याला कुणीच काही देत नाही.”

त्यावर काय बोलावे, ते सायमनला कळेना. “आता झोपूया”, एवढेच तो म्हणाला.

सकाळी सायमन उठला. मुले झोपलेली होती. मेरी कामाला लागली होती. पाहुणा बाकावर बसला होता. कालच्यापेक्षा आज त्याचा चेहरा उजळलेला होता.

सायमन त्याला म्हणाला, “हे बघ मित्रा, जगण्यासाठी प्रत्येकाला काही काम करावेच लागते. तुला कुठले काम येते?”

“मला काहीच येत नाही.”

आश्चर्य वाटून सायमन म्हणाला, “पण माणसाला इच्छा असेल, तर शिकता येते.”

“मी शिकेन.”

“तुझे नाव काय?”

“मायकेल”

“जर तुला तुझ्याबद्दल काही सांगायचे नसेल, तर ठीक आहे. पण मी तुला शिकवतो, तसे काम केलेस, तर मी तुला इथे रहायला व जेवायला देईन.”

“देव तुझे भले करो. काय करायचे, ते दाखव. मी शिकेन.”

सायमनने दोरा हातात घेऊन त्याच्या अंगठ्याभोवती गुंडाळला व म्हणाला, “हे अगदी सोपे आहे.”

मायकेल सांगितल्याबरहुकूम शिकत गेला. तीन दिवसांनतर तो सराईतासारखा बूट बनवू लागला. तो अथकपणे काम करे. अगदी थोडे खाई. काम संपवल्यावर, तो वर बघत चुपचाप बसून राही. बाहेर जात नसे. कोणाबरोबर मिसळत नसे. हास्यविनोद करत नसे. मेरीने त्याला जेवण दिले, तेव्हा एकदा तो हसला होता. पण त्यानंतर नाहीच.

दिवसामागून दिवस जात, काही वर्षे गेली. मायकेल सायमनबरोबर काम करत राहिला. लोक मायकेलच्या कामाला वाखाणू लागले. या सायमनच्या साथीदारासारखे, सुबक व टिकाऊ बूट कुणीच बनवत नाही, असे ते म्हणू लागले. बुटांचा व्यवसाय तेजीत चालू लागला व सायमनला चांगले पैसे मिळू लागले.

एक दिवस घोडागाडीतून एक श्रीमंत माणूस आला. त्याने उच्च प्रतीचे चामडे आणले होते. त्याचे त्याला बूट तयार करून हवे होते. ते पायाला व्यवस्थित बसले पाहिजेत व एक वर्ष टिकले पाहिजेत, असे तो म्हणाला. तरच तो दहा रुपये देणार होता. नाहीतर तो सायमनला तुरुंगात टाकणार होता. सायमनने घाबरून, हे काम घ्यावे की नाही, अशा नजरेने मायकेलकडे बघितले. मायकेलने मान हलवून होकार दर्शवला. मग त्या श्रीमंत माणसाने

त्याच्या नोकराकरवी पायातील बूट काढून, माप दिले व पुन्हा मोठ्या आत्मप्रौढीने बोलला, “पायाला व्यवस्थित बसले पाहिजेत व एक वर्ष टिकले पाहिजेत. हे बोललेले नीट लक्षात ठेवा.”

पण मायकेल त्या उर्मट माणसाकडे बघतच नव्हता. त्याच्या मागे मायकेलला काहीतरी दिसत होते. तो बघतच राहिला व हसला. त्याचा चेहरा उजळला. तो श्रीमंत माणूस डाफरला, “ए मूर्खा, कुठे बघतो आहेस? वेळेवर काम पूर्ण व्हायला हवे.”

मायकेल उत्तरला, “वेळेवर होईल.”

तो गर्विष्ठपणे त्याच्या घोडागाडीत बसण्यासाठी बाहेर पडला. पण मध्येच दाराला आपटला.

एवढे आपटूनही त्याला काहीच झाले नाही. ते बघून सायमन म्हणाला, “फारच मजबूत तब्येत दिसते आहे.”

मेरी म्हणाली, “इतक्या सुखसुबत्तेत राहून तो का नाही मजबूत होणार? अशा बलवान माणसाला मरणदेखील घाबरेल.”

सायमन मायकेलला बोलला, “आता आपण हे काम घेतले आहे खरे, पण यात काही चूक होता कामा नये. हे खूप महागाईचे

चामडे आहे. माझ्यापेक्षा तुझी नजर चांगली आहे व हात तयार आहेत. तूच हे काम अंगावर घे.”

सायमन काळजीने म्हणाला. त्याने व मेरीने मायकेलला काही वेगळ्याच आकाराचे चामडे कापतांना बघितले. पण मायकेलवर त्याच्या भरवसा असल्याने त्यानी त्याला छेडले नाही. दोन तीन दिवसांनी त्याने बुटांऐवजी मऊसर सपाता बनवल्याचे बघून, सायमन मनात उद्गारला, ‘मायकेलने पूर्वी कधीच चूक केली नाही. मग आता त्याने बूट बनवायचे सोडून सपाता कशा काय बनवल्या? आता त्या श्रीमंत, चढेल मनुष्याला मी कसे तोंड देऊ? महागाईचे सगळे चामडे फुकट गेले. ते मी परत देऊही शकणार नाही. तो मायकेलला म्हणाला,

“अरे मित्रा, तू हे काय केलेस? मला तर तू पार गाळातच घातलेस. बूट बनवायचे सोडून सपाता कशा काय बनवल्यास?”

एवढ्यात दारावर टकटक झाली. त्या श्रीमंत माणसाच्या नोकराने आत येऊन, सांगितले, की माझ्या मालकिणीसाठी सपाता बनवायच्या आहेत. मालक काल वारल्यामुळे बुटांची गरज नाही. सायमनने आश्चर्याने आ वासल्यावर तो बोलला,

“तुमच्याकडून आम्ही निघाल्यावर, घोडागाडीतच, ते मृत्यू पावले. घरी पोचल्यावर त्यांचा मृतदेह बाहेर काढणेही मुश्कील

झाले होते. जर सपाता तयार असतील, तर मी त्या घेऊनच जातो.”

मायकेलने त्याच्या अॅप्रनला सपाता नीट पुसल्या व उरलेल्या चामड्याच्या तुकड्याबरोबर त्या गुंडाळून नोकराला दिल्या. नोकर निघून गेला.

वर्षामागून वर्षे गेली. आता सायमनबरोबर रहाण्याचे मायकेलचे सहावे वर्ष होते. मायकेल कुठेही जात नसे. अगदी जरुरीपुरते बोलत असे आणि एवढ्या वर्षात तो फक्त दोनदाच हसला. एकदा  मेरीने त्याला खायला दिले, तेव्हा आणि दुसऱ्यांदा तो श्रीमंत मनुष्य आला होता, तेव्हा! सायमन त्याच्यावर खूष होता. तो त्याला काही प्रश्न विचारेनासा झाला. उलट आपल्याला सोडून मायकेल जाणार तर नाही ना, अशी काळजी त्याला लागून राहिली.

एक दिवस ते सगळे घरीच होते. मेरी स्वयंपाक करत होती. मुले दंगा करत खिडकीतून बाहेर बघत होती. सायमन खिडकीत बसून काम करत होता. मायकेल एका बुटाला टाच बसवत होता.

मायकेलच्या खांद्यावरुन खिडकीतून बाहेर बघत मुलगा ओरडला,

“ती बघा एक बाई, दोन मुलींना घेऊन इकडेच येते आहे. त्यातील एक मुलगी लंगडी आहे.”

मायकेलने बाहेर पाहिले. त्याला तसे करतांना बघून सायमनला नवल वाटले, कारण तो कधी असे बघत नसे. सायमनने पाहिले की त्या बाईबरोबरच्या दोन मुली, अगदी सारख्या आहेत. फक्त एकीचा डावा पाय थोडा अधू आहे. त्यामुळे तिची चाल वेडीवाकडी आहे.

ती बाई त्या दोघी मुलींना घेऊन आत आली व अभिवादन करत म्हणाली, की तिला त्या दोन मुलींसाठी चामड्याचे बूट बनवायचे आहेत. सायमनने मायकेलकडे बोट दाखवून म्हटले,

“हा माझा हुशार कारागीर आहे. अजूनपर्यंत आम्ही इतके लहान बूट बनवले नाही, पण मायकेल ते काम करेल.”

मायकेल त्या दोन मुलींकडे टक लावून बघत होता. मुली सुंदर होत्या. काळेभोर डोळे, गोबरे गाल, लालचुटुक ओठ व अंगात छान कोट! पण तरीही मायकेलने त्यांच्याकडे असे बघण्याचे काय कारण? तो त्यांना ओळखतो की काय?

सायमनने त्या बाईबरोबर बुटांची किंमत ठरवली. मग ती बाई म्हणाली,

“दोघींच्या पायाचे माप सारखेच आहे. तेव्हा त्या मापाचे तीन बूट व पांगळ्या मुलीच्या नादुरुस्त पायासाठी, एक बूट असे चार बूट हवेत.”

मग मेरी आली. तिने विचारले की जन्मापासूनच या मुलीचा पाय असा आहे का, तर ती बाई म्हणाली,

“तिच्या आईने तिचा पाय चिरडल्यामुळे असा झाला आहे.”

“म्हणजे तू त्यांची आई नाहीस?’

‘मी त्यांची आई नाही व माझे त्यांच्याशी काही नातेही नाही. पण मी त्यांना दत्तक घेतले आहे.” “तू आई नाहीस, तरी त्या तुझ्या इतक्या लाडक्या आहेत.”

“कशा नसतील? मी त्यांना माझ्या दुधावर वाढवले आहे. मला मुलगा होता. पण तो देवाने नेला.

“पण मग या कुणाच्या मुली आहेत?”

मग त्याबाईने त्यांना सगळी हकीगत सांगितली.

“सहा वर्षांपूर्वी या मुलींचे पालक वारले. वडील मंगळवारी वारले. त्यानंतर तिसऱ्या दिवशी, म्हणजे शुक्रवारी या मुलींना जन्म देऊन, त्यांची आईही निवर्तली. आम्ही त्यांच्या शेजारी रहात होतो. वडील झाडाचे लाकूड तोडताना अंगावर जाड फांदी

पडून मेले. ते एकाकी व गरीब होते. त्या नवजात मुली आईशेजारी असतांना, आई घसरत एका मुलीच्या पायावर आल्याने, मुलीचा पाय नको इतका दाबला गेला व त्यामुळे असा झाला. गावकरी जमले व या अनाथ मुलींचे काय करावे, असे बोलू लागले. माझा मुलगा तेव्हा दोन महिन्यांचा होता. ते लोक मला म्हणाले,

"जेनी, तू यांना सांभाळशील का? मग मी त्यातील एका मुलीला छातीशी धरले. पण त्या पाय चिरडलेल्या मुलीला काही पाजले नाही. पण असे केल्यास, ती जगणार नाही, असे वाटून, मला तिची दया आली  मग मी या तिन्ही मुलांना आळीपाळीने पाजू लागले. मला सुदैवाने भरपूर दूध होते. मग माझा स्वतःचा मुलगा गेल्यावर, मीच या मुलींना सांभाळले. माझा नवरा गिरणीत कामाला असून, चांगले पैसे मिळवतो. आता या मुलींमध्येच माझ्या आयुष्याचा आनंद आहे." एवढे बोलून तिने डोळे पुसले. अचानक मायकेल बसलेला झोपडीचा कोपरा लख्ख उजळला. मायकेल हाताची घडी गुडघ्यावर ठेवून वर बघून हसत होता. ती बाई गेल्यावर तो उठला. त्याच्या हातातील काम त्याने खाली ठेवले. सायमन व मेरीपुढे झुकून, तो म्हणाला,

“माझ्या पोशिंद्यानो, मी तुमची रजा घेतो. देवाने मला क्षमा केली आहे. माझे काही चुकले असल्यास मला माफ करा.”

सायमन व मेरीने त्याच्या डोक्यामागे भव्य तेजोवलय पाहिले. सायमनने उठून त्याच्यापुढे मस्तक झुकवले.

“मायकेल, तू काही सामान्य मनुष्य नाहीस. तू जातो आहेस, तर मी काही तुला अडवू शकत नाही. फक्त मला एवढेच सांग, की मी तुला घरी आणले, तेव्हा तू अगदी मंद होतास. पण माझ्या बायकोने तुला जेवायला दिल्यावर, तू हसलास व तुझा चेहरा उजळला. मग तो श्रीमंत मनुष्य आला, तेव्हा तू परत हसलास व तुझा चेहरा अजून उजळला. आणि आता त्या बाईने मुलींना आणले, तेव्हा तू तिसऱ्यांदा हसलास आणि अजूनच उजळून, प्रकाशमान दिसू लागलास. मायकेल, मला सांग तू तीन वेळा का हसलास व तुझ्याभोवती हे तेजोवलय कसे आले?”

मायकेल बोलला, “देवाने मला शिक्षा केली होती. पण आता त्याने मला क्षमा केल्याने, मला माझे तेजोवलय परत मिळाले आहे. देवाने मला तीन सत्यांचा शोध घेऊन, ती शिकण्यासाठी भूतलावर पाठवले होते. ती मी शिकलो. मेरीने जेव्हा मला खाऊ घातले, तेव्हा तिच्या डोळ्यात मला दयाळू भाव दिसले. म्हणून मी तेव्हा पहिल्यांदा हसलो. श्रीमंत माणसाने

जेव्हा बूट बनवायला दिले, तेव्हा मला दुसरे सत्य उमगले, म्हणून मी हसलो. आणि आता त्या दोन मुलींना बघून मला तिसरे सत्य समजले, म्हणून मी तिसऱ्यांदा हसलो.”

सायमन विचारता झाला, “पण मायकेल, मला हे सांग की देवाने तुला शिक्षा का केली? आणि तीन सत्ये कुठली? मला ती जाणून घ्यायला आवडेल.”

मायकेल उत्तरला, ‘देवाचे आज्ञापालन न केल्याबद्दल, त्याने मला शिक्षा केली. मी स्वर्गातील देवदूत होतो. मला देवाने एका स्त्रीचा आत्मा हरण करण्यासाठी पाठवले. मी उडत पृथ्वीवर आलो. नुकत्याच जन्म दिलेल्या दोन मुलींना व एका आजारी बाईला, मी निपचित  पडलेले पाहिले. त्या मुली  त्यांच्या आईशेजारी निःश्चेष्ट पडल्या होत्या. पण ती त्यांना छातीशी धरु शकत नव्हती. जेव्हा तिने मला पाहिले, तेव्हा तिला कळले, की देवाने मला तिचा आत्मा नेण्यासाठी पाठवले आहे. ती विलाप करू लागली व मला म्हणाली, “हे देवदूता, झाडाच्या जाड फांदीमुळे, माझा नवरा तीन दिवसांपूर्वीच मेला. मला आई, बहीण, मावशी कोणीही नाही. माझ्या निराधार मुलींकडे बघायला कोणीच नसणार. माझा आत्मा हिरावून घेऊ नकोस. मला माझ्या मुलींना पाजू दे. त्यांचे लालन पालन करून, त्यांना त्यांच्या

पायावर उभे करू दे व मग मरू दे. आईवडिलांशिवाय मुले कशी जगतील? मला तिची दया आली. मी एका मुलीला तिच्या छातीजवळ धरले. दुसरीला तिच्या हातात दिले. मी तिचा आत्मा हरण न करताच परतलेला बघून देव म्हणाला, “जा. मी सांगितले होते, तसे कर व तीन सत्ये शिक. माणसात काय वास करते, माणसाला काय समजू शकत नाही आणि माणसे कशासाठी जगतात, हीच ती तीन सत्ये! जेव्हा तू ही तीन सत्ये शिकशील, तेव्हाच तू स्वर्गात परत येशील. म्हणून मी पृथ्वीवर परत आलो. त्या बाईचा आत्मा हरण केला. तिची मुलगी छातीपासून बाजूला पडली. तिचे मृत शरीर घरंगळून एका मुलीच्या पायावर पडले. मुलीचा नाजूक, छोटासा पाय चिरडला गेला. मी परत स्वर्गात उडणार तोच, वाऱ्याने माझे पंख निखळून पडले. त्या बाईचा आत्मा एकटाच तरंगत स्वर्गाकडे गेला व मी रस्त्याच्या कडेला पडलो.”

आता सायमन व मेरीला समजले, की ते कोणाबरोबर रहात होते व कोणाला त्यांनी खाऊन पिऊन आश्रय दिला. त्यांच्या एका डोळ्यात आसू व दुसऱ्या डोळ्यात, हसू होते. देवदूत पुढे म्हणाला,

“मी एकटाच विवस्त्र जमिनीवर पडलो. मला मानवी गरजा काय असतात, ते माहितीच नव्हते. कारण मी कधीच मानव नव्हतो. अती थंडीने मी मरायला टेकलो. मला जवळच देऊळ दिसले. मी कसाबसा तेथपर्यंत गेलो व मृतवत पडून राहीलो. गाभाऱ्याचे दार कुलुपबंद होते. त्यामुळे, आत जाऊन उब मिळेल, हा विचार मी सोडून दिला. मला एक माणूस येतांना दिसला. तो स्वतशीच बडबडत होता. मी मनुष्य झाल्यापासून प्रथमच, एका माणसाचा चेहरा पाहिला. तो मला भयानक वाटून, मी मान फिरवली. थंडीपासून स्वतचा बचाव कसा करायचा व बायको पोरांना खायला काय घालायचे, याविषयी त्याला बडबडताना मी ऐकले. मी इथे थंडी आणि भुकेने मरतो आहे आणि हा स्वतःपुरताच विचार करतो आहे, हे पाहून मी जाणले, की मला याचा काही उपयोग नाही. मला पाहिल्यावर, तो मनुष्य घाबरला व अजूनच भयानक दिसू लागला. मला तसेच टाकून, तो पुढे गेला. मी निराश झालो. पण तेवढ्यात त्याला परत येतांना बघितले. हा तर तोच माणूस आहे, हे मला समजलेच नाही. मगाशी त्याच्या चेहऱ्यावर मला मरणकळा दिसली, पण आता तो टवटवीत दिसला. मला त्यात देवाचा अंश दिसला. त्याने मला कपडे दिले व त्याच्याबरोबर मला घरी घेऊन गेला. घरी त्याची बायको, त्याच्याहून भयानक दिसत होती. मरणकळेचे शब्द

तिच्या तोंडातून लाह्या फुटल्यासारखे, बाहेर पडत होते. इतक्या थंडीत ती मला, बाहेर हाकलू बघत होती. तिने असे केल्यास, ती मरेल, हे मला माहिती होते. तिचा नवरा देवाबद्दल तिच्याशी काहीतरी बोलला. अचानक तिचा मनसुबा बदलला. तिने मला खायला दिले, तेव्हा तिने माझ्याकडे बघितले. तेव्हा मला तिच्या डोळ्यात मरणकळा दिसली नाही. तिथे जीवन वास करत होते. देवत्व दिसत होते.

तेव्हा मला देवाने सांगितलेला पहिला धडा जाणवला. माणसात काय वास करते, ते मला कळले. प्रेम! देवाने मला हे पहिले सत्य दाखवल्यामुळे, मी आनंदी होऊन हसलो. पहिल्यांदा हसलो. पण अजून शिकणे बाकी होते. माणसाला काय समजू शकत नाही व माणसे का जगतात, हे मला अजून शिकायचे होते.

मी तुमच्याबरोबर घरी राहिलो. ‘बूट पायाला व्यवस्थित बसले पाहिजेत व एक वर्ष टिकले पाहिजेत’, असे म्हणत एक श्रीमंत मनुष्य आला. मी त्याच्याकडे पाहिले अचानक मला त्याच्या खांद्यांमागे यमदूत दिसला. बाकी कोणालाही तो दिसला नाही. मी त्याला ओळखत होतो. सूर्यास्ताच्या आत तो त्या श्रीमंत माणसाचे प्राण हरण करणार आहे, हे मला समजले. मी विचार केला, ‘हा मनुष्य एक वर्षाच्या गोष्टी करतो आहे व तो

संध्याकाळच्या आत मरणार आहे, हे त्याला माहिती नाही. मला देवाचे दुसरे सत्य आठवले. माणसाला काय समजू शकत नाही, तर माणसाला स्वतःची जागा समजू शकत नाही, हे मला कळून मी हसलो. ते माझे दुसरे हास्य होते. यमदूत बघून, मी आनंदी झालो. देवाने मला दुसऱ्या सत्याची प्रचिती दिली.

पण माणसे कशासाठी जगतात, हे तिसरे सत्य मला अजून समजायचे होते. देव मला हा तिसरा धडा देईपर्यंत, मी जगत राहिलो. सहाव्या वर्षी दोन जुळया मुलींना घेऊन, ती बाई आली, तेव्हा मी त्या मुलींना ओळखले. त्या कशा जगल्या, ती गोष्ट मी ऐकली. त्या मुलींची मरणासन्न आई मला जेव्हा म्हणाली की आईवडिलांशिवाय मुले जगणार नाहीत, तेव्हा मला ते खरेच वाटले. पण या परक्या बाईने, त्यांना सांभाळले. वाढवले. तिच्या नसलेल्या या जुळया मुलींबद्दल, त्या बाईने प्रेम दाखवले व त्यांच्यासाठी तिच्या डोळयात अश्रू आलेले मी पाहिले, तेव्हा मला माणसे कशासाठी जगतात, ते तिसरे सत्य कळले. तिच्यात मला देवत्व दिसले. मला तिन्ही सत्ये उमगली तेव्हा माझ्या पापाचे क्षालन झाले. म्हणून मी हसलो. ते माझे तिसरे हास्य होते.”

देवदूताचे कपडे गळून पडले. प्रकाशाच्या झगमगाटाने त्याचे शरीर उजळून उठले. तो प्रकाश डोळयांना साहवेना. त्याचा आवाज मोठा झाला. जणू तो त्याच्यामधून नव्हे, तर स्वर्गातून येत होता. तो म्हणाला,

“मला हे कळले, की माणसे स्वतःची काळजी घेण्यासाठी जगत नाहीत, तर प्रेमासाठी जगतात. ती आई हे जाणू शकली नाही, की तिच्या मुलींना जगण्यासाठी कसली जरुरी आहे. श्रीमंत माणसाला स्वतःचे मरण जाणता आले नाही. मी जगलो, कारण मी स्वतची काळजी घेतली, म्हणून नव्हे तर सायमनने प्रेम दिले, म्हणून! त्याने व त्याच्या बायकोने माझ्यावर दया दाखवली, प्रेम केले, म्हणून मी जगलो.

त्या अनाथ बालिका त्यांच्या आईने केलेल्या काळजीमुळे नव्हे, तर परक्या बाईच्या हृदयातील प्रेमामुळे, जगू शकल्या. सर्व माणसे स्वतःच्या कल्याणाची काळजी केल्यामुळे नव्हे, तर त्यांच्या आतील प्रेमाच्या झऱ्यामुळे जगतात.

देव माणसांना आयुष्य देतो व जगण्याची इच्छा देतो, एवढेच मला माहिती होते. पण आता मला त्यापेक्षा अधिक ज्ञान मिळाले. मला हे समजले, की देव माणसांना एकेकटे जगण्यासाठी पाठवत नाही. प्रत्येकाला स्वतःची गरज काय आहे, हे कळू

शकत नाही. सगळ्यांनी एकजुटीने रहावे, अशी इच्छा देव करतो. त्यामुळे इतरांना, थोडक्यात सगळ्यांना, कसली गरज आहे, हे सर्वांना समजेल, अशी योजना तो आखतो. मला हे सत्य उमगले की माणसांना जे वाटते, की आपण स्वतःची काळजी घेतल्याने जगतो, तर तसे नाही. फक्त प्रेमातील शक्ती, त्यांना तारून नेते. ज्यांच्याकडे प्रेम आहे, त्यांच्याकडे देवच आहे. कारण प्रेम म्हणजेच देव आहे."

देवदूत देवाच्या स्तुतीचे गाणे गाऊ लागला. त्या आवाजाच्या कंपनाने, झोपडी थरारून उठली. छत उघडले. अग्नीच्या ज्वाळा जमिनीपासून स्वर्गापर्यंत उठल्या. सायमन, मेरी व त्यांची मुले जमिनीवर पडली. देवदूताच्या खांद्यावर पंख उगवले व त्याने स्वर्गारोहण केले. जेव्हा सायमन भानावर आला, तेव्हा झोपडी पूर्ववत होती व त्यात त्याचे कुटुंब सोडून, दुसरे कुणीच नव्हते.

The Empty Drum

# रिकामा ताशा

[व्होल्गाच्या प्रदेशात वर्षानुवर्षे प्रचलित असलेली लोककथा]



इमेल्यान नावाचा एक मजूर होता. तो त्याच्या मालकासाठी काम करायचा. एक दिवस कामासाठी कुरण तुडवत जात असतांना, एक बेडूक एकदम उडी मारून, त्याच्या पुढ्यात ठाकला. थोडक्यातच त्याच्यावर पाय पडायचा वाचला. अचानक त्याला मागून कोणीतरी हाका मारतांना ऐकू आले.

इमेल्याानने सभोवताली पाहिले, तेव्हा त्याला एक छान मुलगी दिसली. ती म्हणाली, “तू लग्न का करत नाहीस?”

तो बोलला, “अग मुली, मी कसे काय लग्न करू? मी घातले आहेत, एवढेच कपडे माझ्याकडे आहेत. अजून काही नाही. अशा माझ्याशी, कोण लग्न करणार?

ती म्हणाली, “मी होईन तुझी बायको!”

इमेल्यानला ती आवडली. तो म्हणाला, “अगदी आनंदाने. पण आपण कुठे व कसे रहाणार?”

मुलगी म्हणाली, “त्याचा आताच कशाला विचार करायचा? जर एखाद्याने झोप कमी घेऊन जास्त काम केले, तो जगाच्या पाठीवर तो कुठेही पोट भरू शकतो.”

इमेल्यान म्हणाला, “ठीक आहे तर मग, चल. आपण लग्न करुया. आपण कुठे जायचे?”

“आपण गावात जाऊ.”

मग इमेल्यान आणि मुलगी गावाकडे रवाना झाले. गावाच्या वेशीवर असणाऱ्या एका छोट्याशा झोपडीत, तिने त्याला नेले. लग्न करून, त्यांनी घरसंसार थाटला.

गावातून फेरफटका मारतांना, एक दिवस राजा इमेल्यानच्या झोपडीजवळ आला. राजाला बघण्यासाठी, इमेल्यानची बायको बाहेर आली. राजाने तिला पाहिले व तो आश्चर्यचकित झाला. ‘असे सौदर्य इथे कुठून आले?’ असे मनाशी म्हणत, त्याने रथ थांबवला. त्याने इमेल्यानच्या बायकोला विचारले, “तू कोण आहेस?”

ती बोलली, “शेतकरी इमेल्यानची बायको.”

“इतक्या सुंदर बाईने शेतकऱ्याशी का बरे लग्न केले? तू तर राणीच व्हायला पाहिजेस.”

ती म्हणाली, “तुमच्या दयाळूपणाबद्दल आभार. पण शेतकरी नवराच माझ्यासाठी बरा आहे.”

राजा तिच्याशी थोडा वेळ बोलला आणि निघून गेला. तो राजवाड्यात परतला, पण त्याच्या डोक्यातून इमेल्यानच्या बायकोचा विषय काही जाईना. रात्रभर त्याला झोप आली नाही. तिला स्वतःसाठी कसे मिळवावे, हाच विचार तो करत राहिला. त्याला काही उपाय सुचेना. तेव्हा त्याने त्याच्या नोकरांना बोलावून, काही मार्ग काढण्यास सांगितले.

राजाचे नोकर म्हणाले. “इमेल्यानला राजवाड्यावर कामाला बोलवा. आम्ही त्याला मरेमरेस्तोवर राबवून घेऊ. मग त्याची

बायको विधवा होईल आणि तुम्हाला मिळू शकेल.” राजाने त्यांचे ऐकायचे ठरवले. त्याने अशी आज्ञा केली, की इमेल्यानने राजवाड्यावर नोकर म्हणून दाखल व्हावे व बायकोबरोबर इथेच रहावे.

राजाच्या दूतांनी इमेल्यानकडे येऊन, त्याला राजाचा निरोप दिला. त्याची बायको म्हणाली, “इमेल्यान, तू जा. दिवसभर काम कर. पण रात्री घरी परत ये.”

अशा तऱ्हेने इमेल्यान गेला. जेव्हा तो राजवाड्यात पोचला, तेव्हा राजाच्या दिवाणाने त्याला विचारले, “तू बायकोशिवाय एकटाच का आलास?

तो बोलला, “तिची फरफट कशाला? तिला रहायला घर आहे.”

इमेल्यानला राजवाड्यात दोन माणसांचे काम दिले गेले. काम संपण्याची आशा सोडून, त्याने काम सुरु केले. पण संध्याकाळ झाली तेव्हा काय नवल, की त्याने ते काम पूर्ण केले होते. दिवाणाने ते पाहिले व दुसऱ्या दिवशी त्याला चौपट काम दिले.

इमेल्यान घरी गेला तेव्हा तिथे सर्व काही नीटनेटके व स्वच्छ होते. चूल गरम होती. जेवण शिजून तयार होते. त्याची बायको

टेबलाशी, त्याच्या परतण्याची वाट बघत, शिवणकाम करत बसली होती. तिने त्याचे स्वागत केले. जेवण टेबलावर मांडून, त्याला खायला प्यायला दिले व त्याच्या कामाची चौकशी करू लागली.

इमेल्यान बोलला, “अरे बापरे! हा तर दुष्टपणा आहे. ते मला माझ्या जीवाच्या वर काम देतात आणि इतके काम माझ्याकडून करवून घेतात, की मला त्यांना ठार मारावेसे वाटते.”

ती म्हणाली, “कामावरून चिडू नकोस. काम करतांना, आता किती झाले आहे व किती राहिले आहे, याचा विचार करू नकोस. धीर धर. सर्व काही ठीक होईल.”

मग इमेल्यान लवंडला आणि त्याला लगेच झोप लागली. दुसऱ्या दिवशी परत कामाला गेला व इकडे तिकडे जराही न बघता काम केले. आणि भले शाबास! संध्याकाळपर्यंत सर्व काही पूर्ण झाले. अंधार होण्यापूर्वी रात्रीसाठी म्हणून, तो घरी आला.

पुन्हा पुन्हा ते इमेल्यानचे काम वाढवत राहिले. पण ते वेळेवर पूर्ण करून, तो रात्री झोपण्यासाठी झोपडीत जात राहिला. एक आठवडा गेला. राजाच्या नोकरांनी पाहिले, की ते अतिरेकी कामाने त्याला चिरडू शकत नाहीत. तेव्हा त्यांनी त्याला कसबी काम देऊन बघितले. सुतारकाम, गवंडीकाम, छतशाकारणी, असे

कुठलेही काम इमेल्यान वेळेत पूर्ण करून, रात्री बायकोकडे घरी जाई. असा दुसराही आठवडा गेला.

मग राजाने त्याच्या नोकरांना बोलावून दम दिला. तो ओरडला, "काही न करण्याबद्दल, मी तुम्हाला पगार देतो का? दोन आठवडे गेले, तरी तुम्ही काही केलेले दिसत नाही. तुम्ही म्हणे इमेल्यानला मरेमरेस्तोवर काम देणार होतात. पण मी तर माझ्या खिडकीतून, रोज त्याला घरी जातांना बघतो. आनंदाने गाणे गात तो जात असतो. तुम्ही मला उल्लू बनवत आहात का?"

राजाचे नोकर काहीही सबबी सांगू लागले, "आम्ही त्याला अतिरेकी काम देण्याची शिकस्त केली, पण त्याला ते कठीण गेले नाही. झाडूने झाडावे, इतक्या सहजतेने, त्याने ते सर्व केले. त्याची दमणूकच झाली नाही. मग त्याला कसबी काम दिले. ते तरी त्याला नक्कीच जमणार नाही, असे आम्हाला वाटले. पण तेदेखील त्याने केले. कोणालाच कळत नाही, हे कसे झाले! तो किंवा त्याची बायको, कुणाकडे तरी जादू असली पाहिजे. आम्ही तर त्याच्यापुढे हात टेकले. आम्हाला असे एखादे काम शोधून काढायचे आहे, की जे त्याला जमणार नाही. आता आम्ही त्याला एका दिवसात चर्च बांधायला सांगणार आहोत. राजवाड्यासमोर

एका दिवसात त्याला चर्च  बांधायला सांगा आणि जर तो ते करू शकला नाही, तर आज्ञाभंग केल्याबद्दल, त्याचा शिरच्छेद करा.”

राजाने इमेल्यानला बोलावणे पाठवले व अशी आज्ञा दिली, “उद्या संध्याकाळपर्यंत माझ्या राजवाड्यासमोरील चौरसावर मला चर्च बांधून दे. जर तू ते केलेस, तर तुला बक्षीस मिळेल पण नाहीतर तुझे डोके उडवले जाईल.”

राजाची आज्ञा ऐकून इमेल्यान घरी गेला. त्याने विचार केला, ‘माझा शेवट जवळ आला आहे.’ त्याच्या बायकोजवळ येऊन, तो म्हणाला, “चल तयार हो. आपल्याला इथून पळ काढायला हवा. नाहीतर मला हकनाक प्राणांना मुकावे लागेल”

बायकोने विचारले, “इतके घाबरायचे काय कारण? पळ कशासाठी काढायचा?”

“घाबरू नको तर काय करू? राजाने मला उद्या संध्याकाळपर्यंत चर्च बांधून द्यायची आज्ञा दिली आहे. जर मी ते करू शकलो नाही, तर राजा माझे डोके उडवणार आहे. एकच गोष्ट आता शक्य आहे, की अजून बराच वेळ असल्याने आपण इथून परागंदा व्हावे, ते बरे!”

पण त्याची बायको काही ऐकून घेईना. ती म्हणाली, “राजाकडे पुष्कळ सैनिक आहेत. ते आपला पाठलाग करतील व

आपल्याला पकडतील. आपल्याला पळून जाणे शक्य नाही. सर्व शक्तीनिशी आपण आज्ञापालन करू.''

“माझ्या शक्तीपलीकडील काम असल्यावर, मी कशी काय आज्ञा पाळणार?

“अरे भल्या माणसा, धीर खचून देऊ नकोस. तुझे जेवण होऊ दे. मग झोप. सकाळी लवकर उठ. सर्व काही होईल.''

तर अशा तऱ्हेने इमेल्यान पडल्या पडल्या झोपला. दुसऱ्या दिवशी भल्या पहाटे बायकोने त्याला उठवले. ती म्हणाली, “लवकर जा आणि चर्च बांधून टाक. हे खिळे आणि हा हातोडा घे. अजून तर सारा दिवस पडला आहे.''

इमेल्यान गेला. राजवाड्यासमोरील चौरसाजवळ पोचला. तिथे भव्य चर्च उभे होते, पण अपूर्णावस्थेत! जे काही जरुरी होते, ते करायला इमेल्यानने सुरवात केली. संध्याकाळपर्यंत सर्व काही तयार झाले.

जेव्हा राजा जागा झाला, तेव्हा त्याने राजवाड्याच्या खिडकीतून बाहेर पाहिले. तर चर्च दिसले व इमेल्यान इथे तिथे खिळे ठोकणे वगैरे कामे करत होता. चर्च बघून राजा खूष झाला नाही. इमेल्यानचा पाडाव करून, त्याची बायको हस्तगत करता येत नाही, म्हणून तो चिडला. परत त्याने नोकरांना बोलावले. तो

म्हणाला, “इमेल्यानने हे काम पण केले. आता त्याला सूळी द्यायचे काही कारणच उरले नाही. हे काम देखील त्याच्यासाठी कठीण नव्हते. अजून जास्त लबाडीचा, काही डाव बनवायला हवा. नाहीतर मी त्याच्याबरोबर तुमचीही डोकी उडवून टाकीन.”

तेव्हा मग राजाच्या नोकरांनी अशी टूम काढली, की इमेल्यानला राजवाड्याभोवती नदी बांधायला सांगू व त्यात जहाजे तरंगत असली पाहिजेत, असे सांगू. तेव्हा राजाने इमेल्यानला बोलावून, हे नवे काम सांगितले.

राजा म्हणाला, “जर तू एका रात्रीत चर्च बांधू शकतोस, तर तू हेदेखील करू शकशील. उद्या सर्व काम पूर्ण व्हायला हवे. जर तसे नसेल, तर मी तुझे डोके उडवणार.” इमेल्यान पूर्वीपेक्षाही जास्त हिंपुटी होऊन व दुःखी अंतःकरणाने बायकोकडे परतला.

त्याची बायको म्हणाली, “तू इतका उदास का आहेस? राजाने तुला काही नवीन काम दिले आहे का?

इमेल्यानने तिला सर्व काही सांगितले. तो म्हणाला, “आपण पळून जाऊ.”

पण त्याची बायको उत्तरली. “सैनिकांना आपण चुकवू शकत नाही. आपण कुठेही गेलो, तरी ते आपल्याला पकडतील. आज्ञा पाळण्याशिवाय काही गत्यंतरच नाही.”

इमेल्यान किंचाळला, “मी हे कसे काय करू?”

“हं हं भल्या माणसा, निराश होऊ नकोस. जेवण करून झोप. लवकर उठ आणि वेळेत सर्व काही पूर्ण होईल.”

मग इमेल्यान लवंडला व झोपी गेला. सकाळी त्याच्या बायकोने त्याला उठवले. ती म्हणाली, “राजवाड्याकडे जा. सर्व तयार आहे. फक्त राजवाड्यासमोरील धक्क्यावरील एक उंचवटा राहिला आहे. फावडे घेऊन, तो सपाट करून टाक.”

जेव्हा राजा जागा झाला, तेव्हा त्याला एकच नाही तर अनेक जहाजे पाण्यावर तरंगतांना दिसली. इमेल्यान फावड्याने उंचवटा सपाट करत होता. राजाला आश्चर्य वाटले. पण नदी वा जहाजे पाहून, तो खूष झाला नाही. इमेल्यानचा पाडाव होत नाही, हे बघून तो चरफडला. ‘तो करू शकणार नाही, असे कुठलेच काम नसावे. काय करावे?’ तो विचार करू लागला. परत त्याने नोकरांना बोलावून सल्ला विचारला. तो म्हणाला,

“इमेल्यानला करता येणार नाही, असे एखादे काम शोधून काढा, कारण आपण ज्या अटी घालतो, ज्या परीक्षा घेतो, त्या सर्वात तो उत्तीर्ण होतो. आणि मला त्याच्या बायकोचा लाभ होत नाही.”

राजाच्या शिपायांनी खूप विचार करून, शेवटी एक बेत आखला. ते म्हणाले, “इमेल्यानला बोलावणे पाठवा आणि त्याला सांगा, “अज्ञात ठिकाणी जा आणि ‘काय ते माहिती नाही’ घेऊन ये.” मग तो काही सुटू शकणार नाही. तो कुठेही गेला, तरी तुम्ही ते योग्य ठिकाण नव्हते, असे म्हणू शकता. त्याने जे काही आणले असेल, ते खरे तर चुकीचे आणले आहे, असे तुम्ही म्हणू शकता. मग तुम्ही त्याचे डोके उडवून, त्याची बायको मिळवू शकता.”

राजा आनंदित झाला. तो म्हणाला, “हे चांगले आहे.” त्याने इमेल्यानला बोलावणे पाठवले व त्याला म्हणाला, “अज्ञात ठिकाणी जा आणि ‘काय ते माहिती नाही’ ते घेऊन ये. जर तू ते आणले नाहीस, तर तुझे डोके उडवण्यात येईल.”

इमेल्यान परतून बायकोकडे आला. राजा काय म्हणाला, ते तिला सांगितले. त्याची बायको विचारात पडली.

ती म्हणाली, “ठीक आहे. तुला कोंडीत कसे पकडायचे, हे यावेळी राजाला शिकवलेले दिसते. आता आपल्याला सावधपणे पाऊले उचलली पाहिजेत. ती बसून विचार करू लागली व शेवटी आपल्या नवऱ्याला म्हणाली, “सैनिकांची आई असलेल्या शेतकरी आजीबाईकडे तुला लांबवर जायला हवे. आणि तिची

मदत घ्यायला हवी. जर तिने तुला मदत केली, तर सरळ राजवाड्याकडे जा. मी तिथेच असेन. आता माझी त्यांच्यापासून सुटका नाही. ते मला जबरदस्तीने घेऊन जातील. पण हे जास्त वेळ चालणार नाही. आजीबाईने सांगितल्याप्रमाणे तू सर्व केलेस, तर तू मला वाचवू शकशील."

मग तिने नवऱ्याची प्रवासाची सर्व तयारी केली. तिने त्याला पिशवी दिली व चाती (spindle ) दिली. ती म्हणाली, "तिला हे दे. या वस्तूंवरून ती तुला माझा नवरा असल्याचे ओळखेल." मग तिने त्याचा निरोप घेतला.

इमेल्यान निघाला. त्याने गाव मागे टाकले. काही सैनिक कवायत करत होते. तिथे तो आला. कवायतीनंतर ते विश्रांती घेऊ लागले. मग इमेल्यानने त्यांच्याकडे जाऊन, त्यांना विचारले, "भाऊबंदानो, तुम्हाला अज्ञात ठिकाण माहिती आहे का? आणि 'काय ते माहिती नाही' मी कसे मिळवू शकेन? सैनिकांनी त्याचे बोलणे नवल वाटून ऐकून घेतले व विचारले, "तुला या कामगिरीवर कोणी पाठवले?"

तो म्हणाला, "राजाने."

आम्ही सैनिक झाल्यापासून, त्याने आम्हाला अज्ञात ठिकाणी जायला सांगितले आहे. आणि 'काय ते माहिती नाही'

शोधून आणायला सांगितले आहे. आम्हाला ते काही सापडत नाही. आम्ही तुला मदत करू शकत नाही.''

इमेल्यान थोडा वेळ सैनिकांबरोबर बसला व मग चालू लागला. बरेच मैल अंतर काटून, तो एका जंगलात आला. तिथे एक झोपडी होती. तिथे त्या सैनिक शेतकऱ्यांची जख्खड म्हातारी आई बसली होती. ती अंबाडीचे धागे काढत, शोक करत होती. ती ते धागे थुंकीने नव्हे तर डोळ्यांमधील अश्रूंनी ओले करत होती. जेव्हा तिने इमेल्यानला पाहिले, तेव्हा ती ओरडून त्याला म्हणाली, ''तू इथे का आला आहेस? मग इमेल्यानने तिला चाती देऊन, त्याला त्याच्या बायकोने इकडे पाठवल्याचे सांगितले.

म्हातारी आजीबाई एकदम मऊसूत झाली. त्याला प्रश्न विचारू लागली. इमेल्यानने तिला सर्व जीवनवृतांत सांगितला. त्याने कसे त्या मुलीबरोबर लग्न केले, राजवाड्यात त्याने काय केले, चर्च कसे बांधले, जहाजे असलेली नदी कशी तयार केली आणि राजाने आता त्याला कसे सांगितले आहे की, अज्ञात ठिकाणी जा आणि 'काय ते माहिती नाही' ते घेऊन ये.

आजीबाईंनी शेवटपर्यंत ऐकून घेतले, रडणे थांबवले व स्वतःशीच पुटपुटली, ''आता नक्कीच ती वेळ आलेली आहे.''

आणि मग त्याला म्हणाली, “ठीक आहे, माझ्या बाळा, आता बस. तुला काहीतरी खायला देते.

तिने दिलेले इमेल्याननने खाल्ले. नंतर आजीबाईंनी त्याला काय करायचे, ते सांगितले. ती म्हणाली, “हा बघ, दोऱ्याचा गुंडा आहे. तो उलगडत जाईल, तिकडे तू चालत रहा. तुला दूरवर समुद्र लागेपर्यंत चालावे लागेल. तिकडे पोचल्यावर, तुला एक मोठे शहर दिसेल. समोरच्च्याच घरात रात्रीसाठी निवारा माग. तू जे शोधतो आहेस, ते तुला तिथे मिळेल.”

त्याने विचारले, “आजीबाई, मला जे हवे होते, ते मला मिळाले, हे मला कसे समजेल?”

“आईवडीलांच्या आज्ञा पाळण्यापेक्षा, त्याचे महत्व जास्त असलेले, तुला बघायला मिळेल. तेच ते आहे. ते पकड व राजाला नेऊन दे. जेव्हा तू ते राजाकडे नेऊन देशील, तेव्हा राजा म्हणेल, की हे नव्हते आणायला सांगितले. मग तू असे उत्तर दे, ‘जर हे आणायला सांगितले नव्हते, तर मग हे तोडून मोडून टाकले पाहिजे. मग तू ते बडवायला सुरवात कर. नदीवर जाऊन, त्याचे तुकडे तुकडे करून, पाण्यात फेकून दे. मग तुला तुझी बायको परत मिळेल व माझा अश्रुपात थांबेल.”

इमेल्याननने आजीबाईंचा निरोप घेतला व दोऱ्याचा गुंडा उलगडत, त्याच्यामागे जात राहिला. त्याला शेवटी समुद्र दिसला. समुद्राशेजारी एक मोठे शहर होते आणि पुढच्याच बाजूला एक मोठे घर होते. तिथे रात्रभर रहाण्यासाठी इमेल्याननने परवानगी मागितली. त्याला ती मिळाली. तो झोपला व सकाळी जागा झाल्यावर त्याने ऐकले, की वडील मुलाला उठवून जळणासाठी लाकडे तोडून आणायला सांगत होते. पण मुलगा त्यांच्याकडे दुर्लक्ष करत बोलला, "हे फारच लवकर आहे. अजून भरपूर वेळ आहे." मग त्याने मुलाच्या आईला असे बोलतांना ऐकले, "जा रे बाळा, तुझ्या वडिलांची हाडे दुखतात. तू त्यांना जायला लावणार का? उठायची वेळ झाली आहे."

पण मुलगा फक्त काहीतरी पुटपुटला व परत झोपला. त्याला झोप लागते न लागते तोच, रस्त्यात गडगड, डमडम असा आवाज ऐकू येऊ लागला. मुलगा झटकन उठला. कपडे केले व रस्त्यावर कसला आवाज आहे, ते बघायला पळाला. त्याने काय पाहिले, तर एक मनुष्य त्याच्या पोटाला दोरीने एक वस्तू बांधून, ती काठ्यांनी बडवत चालला होता --- अशी वस्तू, की जी त्या मुलाला आईवडिलांची आज्ञा पाळण्यापेक्षा, जास्त महत्वाची वाटली. इमेल्याननने ती पाहिली. ती गोल होती. छोट्या टबसारखी

होती. त्यावर दोन्ही बाजूंना कातडे ताणून बसवले होते. त्याने विचारले, की त्या वस्तूला काय म्हणतात?

त्याला उत्तर मिळाले, “ताशा.”

“आणि तो रिकामा आहे?”

“हो. तो रिकामा आहे.”

इमेल्यानला आश्चर्य वाटले. त्याने ताशावाल्याला ते त्याला द्यायला, सांगितले. पण तो काही देईना. म्हणून मग इमेल्यान त्यांची विनवणी करत, त्यांच्या मागे जाऊ लागला. दिवसभर त्यांच्या मागोमाग गेल्यावर, शेवटी ताशावाला जेव्हा झोपला, तेव्हा इमेल्यानने तो ताशा हिसकावून घेतला व पळत सुटला.

इमेल्यान जो पळत सुटला, तो शेवटी त्याच्या गावाला पोचला. त्याने झोपडीत बायको आहे का, ते बघितले. ती नव्हती. तो गेल्याच्या दुसऱ्या दिवशीच, राजाने तिला पकडून नेले होते. म्हणून मग इमेल्यान राजवाड्यात गेला. त्याने राजाला निरोप पाठवला, की अज्ञात ठिकाणाहून तो आला आहे आणि त्याने त्याच्याबरोबर ‘काय ते माहिती नाही’ आणले आहे.

राजाने त्याचे ऐकून घेतले व त्याला दुसऱ्या दिवशी येण्यास सांगितले.

पण इमेल्यान म्हणाला, “राजाला सांगा, मी आज इथे आहे. राजाला जे हवे ते घेऊन आलो आहे. त्याला बाहेर यायला सांगा, नाहीतर मी आत जातो. राजा आला व म्हणाला, “तू कुठे होतास?”

इमेल्यानने काय ते सांगितले.

राजा म्हणाला, “तिथे नव्हते जायला सांगितले. तू काय आणले आहेस?”

इमेल्यानने ताशाकडे निर्देश केला. पण तिकडे न बघताच राजा म्हणाला, “हे नव्हते आणायला सांगितले.”

“जर ही गोष्ट आणायला नव्हती सांगितली, तर मग ती तोडून फोडून सैतानाला देऊन टाकू.”

इमेल्यान राजवाड्यातून निघाला. ताशा बडवत चालू पडला. त्या डमडम आवाजाने सगळे सैन्य त्याच्या मागोमाग येऊ लागले. त्याला सलाम करून, त्याची आज्ञा झेलण्यास तयार झाले.

राजा त्याच्या खिडकीतून ओरडून, सैन्याला सांगू लागला, की इमेल्यानच्या पाठोपाठ जाऊ नका. पण त्या सर्वांनी राजाचे काही ऐकले नाही. ते इमेल्यानच्या पाठोपाठ जात राहिले.

राजाने हे पाहिले तेव्हा त्याने, इमेल्यानच्या बायकोला परत पाठवून देण्याची आज्ञा दिली व ताशा आपल्याला हवा असल्याचे इमेल्यानला सांगितले.

इमेल्यान म्हणाला, “ते शक्य नाही. त्याची तोडफोड करून, ते तुकडे नदीत टाकण्यासाठी मला सांगण्यात आले आहे.”

म्हणून  इमेल्यान ताशासकट नदीवर गेला. सैनिक त्याच्या मागोमाग जात होते. जेव्हा ते नदीकिनारी पोचले, तेव्हा इमेल्यानने, ताशाची तोडफोड करून, तुकडे पाण्यात टाकून दिले. मग सर्व सैनिक पळून गेले. इमेल्यान त्याच्या बायकोला घेऊन घरी गेला. त्यानंतर राजाने त्याला त्रास देणे थांबवले. त्यामुळे त्यानंतर ते सुखाने राहू लागले.

# The Bear Hunt

# अस्वलाची शिकार



[ १८५८ मध्ये टॉलस्टॉयने स्वतः केलेल्या साहसाचे वर्णन पुढे केलेले आहे. त्यानंतर वीस वर्षांनी, मानवीय दृष्टीकोनातून त्याने शिकार करणे सोडून दिले. ]

आम्ही अस्वलाची शिकार करायच्या मोहिमेवर बाहेर पडलो. पण आम्ही त्याच्या मासात, फक्त एक जखम करू शकलो. बर्फावर रक्ताच्या खुणा होत्या. पण अस्वल निघून गेले.

लगेच अस्वलाच्या मागे लागावे का, दोन तीन दिवस थांबून त्याला थोडे स्थिरस्थावर होऊ द्यावे, याचा विचार करण्यासाठी आम्ही एकत्र जमलो. त्याच दिवशी परत त्या अस्वलाच्या मागे जावे की नाही, याबद्दल आम्ही अस्वलांचा माग काढणाऱ्या शेतकऱ्याला विचारले.

तो म्हातारा माणूस म्हणाला, "नाही. ते अशक्य आहे. तुम्ही चार पाच दिवस थांबावे. ते थोडे शांत झाल्यावर मग त्याचा पाठलाग सुरु करावा. आताच तुम्ही त्याच्या मागे लागलात, तर तुम्ही त्याला नुसते घाबरवून दूर घालवाल."

पण तोच व्यवसाय असलेला तरुण, त्या म्हाताऱ्याबरोबर वाद घालू लागला. त्याचे म्हणणे होते, की आतादेखील हे करणे शक्य आहे.

तो म्हणाला, "असा बर्फ असतांना, ते फार लांब जाणार नाही, कारण ते जाड आहे. संध्याकाळपूर्वी ते थांबेल. मी बर्फाचे बूट घालून त्याचा माग काढू शकेन."

माझ्याबरोबरच्या मित्राने थांबण्याचा सल्ला दिला. पण मी म्हणालो,

"आपण वाद घालायला नको. तुला करायचे, ते तू कर मी दामिआनबरोबर माग काढायला जातो. आम्हाला अस्वल

सापडले, तर ठीक आहे. नाहीतर तोटा काही नाही. अजून बराच वेळ आहे आणि आपल्याला आज दुसरे काही काम नाही.” मग ते ठरले.

दुसरे सगळे बर्फगाड्यांवरून गावात परतले. दामिआनने व मी थोडा पाव जवळ ठेवून, जंगलाची वाट धरली.

ते गेले, तेव्हा मी व दामिआनने आमच्या बंदुका तपासल्या. जाकीटाचा घोळ पट्ट्यात कोंबून आम्ही अस्वलाचा माग घेत निघालो.

हवा शांत व छान होती धुके पसरले होते. बूट घालून बर्फातून चालणे कठीण काम होते. बर्फ मऊ आणि खोल होता. तो घट्ट झाला नव्हता. आदल्या दिवशीच पडला होता. त्यामुळे आमचे बूट सहा इंच किंवा त्याहूनही जास्त बर्फात बुडत होते.

थोड्या अंतरावर अस्वलाचे माग दिसत होते. ते कधी पोटापर्यंत बर्फात बुडत तर कधी पायाने बर्फ तुडवत चाललेले आम्हाला कळत होते. पहिल्यांदा, मोठ्या झाडाखाली आम्ही त्याचा माग काढू शकलो. पण ते लहान फर झाडांच्या दाट भागात पोचले, तेव्हा दामिआन थांबला.

“ते इथेच जवळपास कुठेतरी असणार. आपण आता थांबू. बर्फ ओढत नेल्याच्या खुणांवरून आपल्याला ते समजू शकते.

आपण गुपचूप गोल चक्कर मारू. ओरडू नको. किंवा खोकू नको. नाहीतर आपण त्याला पळवून लावू.”

त्यामुळे माग काढायचे सोडून, आम्ही डावीकडे वळलो. पण साधारण पाचशे यार्ड गेल्यावर, तिथे आमच्या समोरच अस्वलाच्या खुणा होत्या. आम्ही त्यामागोमाग गेल्यावर आम्हाला रस्ता लागला. तिथे आम्ही थांबलो. तिथून अस्वल कुठे गेले, हे बघायला आम्ही थांबलो. बर्फामध्ये इकडेतिकडे त्याच्या पाऊलखुणा व शेतकऱ्याच्या बुटांच्या खुणा विखुरल्या होत्या. अस्वल नक्कीच गावाच्या दिशेने गेले होते.

आम्ही रस्त्याने चालतांना, दामिआन म्हणाला,

“आता रस्त्याचे निरीक्षण करून काही उपयोग नाही. ते उजवीकडे वळले की डावीकडे ते आपण बघू. कुठेतरी ते वळले असणार, कारण ते गावाकडे जाणार नाही.”

आम्ही रस्त्याने मैलभर गेलो. मग आमच्यापुढे आम्ही अस्वलाच्या पाऊलखुणा रस्त्यापासून दूर गेलेल्या पाहिल्या. आम्ही त्यांची परीक्षा केली. किती विचित्र! त्या अस्वलाच्या पाऊलखुणा होत्या पण रस्त्यापासून जंगलात गेलेल्या नव्हत्या. तर जंगलातून रस्त्याकडे येत होत्या. चवडा रस्त्याकडे निर्देश करत होता.

मी म्हणालो, “हे दुसरे अस्वल असावे.”

दामिआनने बघितले तो क्षणभर गप्प राहिला.

तो म्हणाला, “नाही, ते तेच आहे. ते आपल्याला चकवते आहे. रस्ता सोडून परत मागे फिरले आहे.”

आम्ही माग काढत गेलो. आणि खरेच तसे होते! अस्वल दहा पाऊले मागे गेले होते. आणि फरच्या झाडांजवळ वळसा घेऊन, सरळ गेले होते.

दामिआन थांबून, बोलला,

“आता आपण खात्रीने, त्याच्या परिघात आलो आहोत. पुढे दलदल आहे. ते तिथेच असणार. आपण चक्कर मारू.”

आम्ही दाट फरच्या झाडांमधून चक्कर मारायला सुरवात केली. मी आता थकलो होतो. खूप वेळ झाल्याने आता अजून चालणे मुश्कील होते. ज्युनिपरच्या झुडूपांमधून कसेबसे चालतांना, माझे बर्फाळ बूट त्यात अडकले. किंवा सवय नसल्याने ते घसरले. मी आता बर्फाने झाकल्या गेलेल्या एका ओंडक्याजवळ आलो. मी फारच दमून, घामाने डंवरलो होतो. माझी फरची शाल मी काढून टाकली.

दामिआन मात्र बोटीने झुलल्यासारखा, कुठेही न अडखळता, मजेत चालला होता. त्याचे बर्फातले बूट कुठेही न घसरता, तालात पडत होते. त्याने माझी फरची शाल ओढून स्वतःच्या खांद्यावर टाकली. आणि अजूनही माझी विनवणी करत राहिला.

आम्ही पुढे अजून दोन मैल गेलो आणि दलदलीच्या दुसऱ्या बाजूला आलो. मी मागे पडत होतो. माझे बर्फाचे बूट घसरत होते. माझे पाय अडखळत होते. माझ्यापुढे असलेला दामिआन एकाएकी थांबला. त्याने हात हलवले. मी त्याच्याजवळ आलो, तेव्हा तो खाली वाकला व हाताने निर्देश करत कुजबुजला,

“तिथे तुला मॅगपाय ओरडताना दिसतो आहे का? त्याला खूप लांबून अस्वलाचा वास येतो. त्यामुळे ते अस्वल इथेच कुठेतरी असले पाहिजे. आम्ही वळून अजून अर्धा मैल गेलो. पुन्हा आम्ही जुन्या पाऊलखुणांपाशी आलो. त्यामुळे आम्ही आता अस्वलाभोवती एक चक्कर पूर्ण केली. आम्ही थांबलो. मी टोपी काढून कपडे सैल केले. मी वाफेने अंघोळ केल्यासारखा उकडून निघालो होतो. दामिआन देखील त्याचा घाम शर्टाच्या बाहीने पुसत होता.

तो बोलला, “ठीक आहे, सर. आपण आपले काम केले. आता आपण विश्रांती घेतली पाहिजे.”

रानात संध्याकाळचा लाल प्रकाश पसरला होता. आम्ही आमचे बर्फाचे बूट काढून त्यावर बसलो. आम्ही आमच्या पिशवीतून पाव व मीठ काढले. आधी मी थोडा बर्फ खाल्ला आणि मग पाव खाल्ला. मला पाव इतका चविष्ट लागला की आयुष्यात कधी असा लागला नव्हता.

आम्ही तिथे मावळतीच्या वेळेपर्यंत, विश्रांती घेत बसलो. मग मी दामिआनला विचारले, की गाव इथून किती लांब असेल.

तो म्हणाला, “इथून साधारण आठ मैल असेल. आपण आज रात्री तेथे जाऊ. पण आता आपल्याला विश्रांती घेतली पाहिजे. सर, तुमचा फर कोट घाला. नाहीतर तुम्हाला सर्दी होईल.”

दामिआनने बर्फ सपाट केला. फरच्या काही फांद्या मोडून त्याचे अंथरूण केले. आम्ही शेजारी शेजारी झोपून, हाताची उशी केली. मी इतका गाढ झोपलो, की मला एकदम दोन तासांनी काही मोडल्याचा आवाज ऐकून जाग आली.

मी इतका गाढ झोपलो होतो, की मला मी कुठे आहे, तेच कळेना. मी आजूबाजूला पाहिले. किती छान! मी पांढऱ्या शुभ्र

चकचकीत खांबांच्या हॉलमध्ये होतो. मी वर पाहिले तेव्हा नाजूक पांढरी कलाकुसर असलेले, रंगीबेरंगी प्रकाशाचे काळे कुळकुळीत छत दिसले. नीट पाहिल्यावर मला आठवले, आम्ही जंगलात होतो. मला हॉल आणि खांब दिसत होते, त्या फांद्या होत्या आणि बर्फाने व धुक्याने वेढलेली झाडे होती. रंगीबेरंगी प्रकाश म्हणजे फांद्यांमधून चमकणारे तारे होते. बर्फाळ धुक्याने रात्र वेढली गेली होती. त्यामुळे सर्व फांद्या जाड झाल्या होत्या. झाडांवरून बर्फ पडून, दामिआन त्याने झाकला गेला होता. माझ्या फर कोटावरही ते पडून तो पांढरा दिसत होता. मी दामिआनला उठवले. आम्ही बूट पायात घालून निघालो. जंगल एकदम शांत होते फक्त आमचे बूट मऊ बर्फात रुतून, आम्ही चालल्याचा आवाज येत होता आणि बर्फाच्या वजनाने फांद्या मोडून, त्याचा प्रतिध्वनी येत होता. आम्ही एकदाच जिवंत प्राण्याचा आवाज ऐकला.

मधूनच आम्हाला काही घसपटून आमच्या जवळून सरकत गेल्याचा, आवाज येत होता. मला वाटले, की ते नक्की अस्वल असणार. पण आम्ही आवाजाच्या जवळ गेलो, तेव्हा तिथे सशांचे ठसे दिसले व साली कुरतडलेली पॉप्लरची पुष्कळ लहान झाडे दिसली. खाणाऱ्या काही सशांना आम्ही दचकवले.

आम्ही रस्त्यावर आलो व बूट घासपटवत चालू लागलो. कडक रस्त्यावर चालणे सोपे जात होते. आमचे बर्फातले बूट इकडे तिकडे घसरत आवाज करत होते. बर्फाळ धुक्याने आमचे चेहरे भरले होते. फांद्यांमधून चकाकणारे तारे, जणू आमच्या भेटीला धावून येत होते आणि मध्येच अदृष्य होऊन, पूर्ण आकाश हलल्यासारखे वाटत होते.

माझा सोबती अजून झोपेच्या अंमलाखाली होता. अस्वलाभोवती आम्ही कशी चक्कर मारली, ते सांगून त्याला नीट जागे केले. आमच्या शेतकरी यजमानाला सकाळसाठी ताशा बडवणारे लोक लागतील असे सांगून, आम्ही जेवण केले व झोपलो.

जर माझ्या सोबत्याने मला उठवले नसते, तर मी दुपारपर्यंत झोपलो असतो, इतका मी दमलो होतो. मी उडी मारून पाहिले, की तो आधीच कपडे घालून तयार झाला होता आणि त्याच्या बंदूकीला काहीतरी करत होता.

मी विचारले, “दामिआन कुठे आहे?”

“तो केव्हाच जंगलात गेला होता व माग काढत फिरत होता आणि आता परत येऊन ताशा  बडवणाऱ्या लोकांना बघायला गेला आहे. ”

मी तोंड धुवून कपडे केले व माझी बंदूक भरली. मग आम्ही बर्फाच्या गाडीत बसून निघालो.

अजूनही बर्फाळ धुके होते. सूर्य दिसत नव्हता. आमच्या डोक्यावर दाट धुके होते व प्रत्येक गोष्ट धुक्याने भरून गेली होती. रस्त्याने दोन मैल तुडवल्यावर, आम्ही जंगलात आलो. तिथे भाले घेतलेल्या शेतकरी स्त्री पुरुषाचा गट होता. आम्ही त्यांच्याजवळ गेलो. पुरुष मंडळी बटाटे भाजत स्त्रियांशी हसत, गप्पा मारत बसले होते.

दामिआन पण तिथे होता. आम्ही तिथे गेल्यावर, ते लोक उठून उभे राहिले. दामिआनने त्यांना बाजूला केले व आदल्यादिवशीसारखे गोलात उभे केले. त्या एकंदर तीसजणानी, पुरुष व स्त्रिया अशी वेगळी रांग केली. बर्फ इतका जास्त होता, की आम्हाला ते लोक कंबरेपासून वरचेच दिसत होते. ते जंगलात शिरले. मी आणि माझे मित्रही त्यांच्या पाठोपाठ गेलो.

त्यांनी तुडवलेल्या वाटेवर चालणेसुद्धा अवघड होते. आम्ही जणू बर्फाच्या दोन भिंतींमधून चालत होतो.

असे आम्ही सुमारे अर्धा मैल चाललो. तेव्हा अचानक आम्ही दामिआनला दुसऱ्या दिशेने येतांना पाहिले --- त्याच्या बर्फाच्या बुटांनी तो धावत येत होता. तो आम्हाला त्याच्याबरोबर

येण्यासाठी खुणा करत होता. आम्ही त्याच्याजवळ गेल्यावर, त्याने आम्हाला कुठे उभे रहायचे ते सांगितले. मी माझी जागा घेऊन सभोवताली पाहिले.

माझ्या डावीकडे उंच फरची झाडे होती. त्यामधून मला वाट गेलेली दिसत होती. झाडांमागे एक काळा डाग दिसत होता. मला ताशा  वाजवणारा दिसत होता. माझ्यासमोर माणसाच्या उंचीच्या लहान फरच्या झाडांच्या फांद्या, बर्फाच्या भाराने वाकल्या होत्या. हा झाडांच्या झुबक्याचा रस्ता बर्फाने भरलेला होता. तो थेट मला येऊन मिळत होता. माझ्या उजवीकडे पण तशीच फरची गर्दी झालेली होती. त्यापुढील मोकळया जागी, दामिआनने, माझे मित्र उभे केले होते.

मी माझ्या दोन्ही बंदूका तपासल्या. मला उभे रहाण्यासाठी, चांगली जागा शोधली. माझ्या तीन पाऊले मागे मोठे फरचे झाड होते.

मी विचार केला, “मी इथे उभा राहीन. म्हणजे मला माझी दुसरी बंदूक झाडाला टेकून ठेवता येईल“ माझे गुडघे बर्फात रुतवत मी झाडाकडे सरकलो. मी बर्फ झटकला. मला उभे रहाण्यासाठी, एक यार्डाचा चौकोन स्वच्छ केला. एक बंदूक माझ्या हातात ठेवली. दुसरी गोळया भरून झाडाला टेकवून

ठेवली. मग सुऱ्यावरील आवरण काढून तो सुरा तयार ठेवला. मला गरजेच्या वेळी तो लगेच मिळेल, असे पाहिले.

मी अशी तयारी करतो न करतो, तोच मी जंगलात दामिआनला ओरडताना ऐकले.

”ते येते आहे!  ते येते आहे!”

दामिआन ओरडल्याबरोबर, गोलात उभे असलेल्या शेतकऱ्यांनी त्यांच्या वेगवेगळया आवाजात उत्तरे दिली. ते ओरडले,

“उठ, उठा, उठा! ओहो! ओहो! ओहो!”

स्त्रिया उच्चरवात ओरडल्या,

“ओय! ओय! ओय!”

अस्वल गोलात होते. दामिआन त्याला हाकलत होता. गोलातील सर्व लोक ओरडत होते. फक्त मी व माझा मित्र, अस्वल आमच्या अंगावर चालून येण्याची वाट बघत, न हलता, शांत उभे होतो. मी कान व डोळे सजग ठेवून उभा असतांना, माझे हृदय जोरात धडधडू लागले. माझी बंदूक घट्ट धरून, मी थरथरू लागलो.

मी विचार केला, ‘आता ते अचानक चालून येईल. मी नेम धरून चाप ओढेन आणि ते खाली पडेल –-- ‘

अचानक, माझ्या डावीकडे काही अंतरावर, बर्फात काही पडतांना ऐकू आले. मी उंच फर झाडांमधून बघितले. पन्नास पाऊलांवर झाडामागे मला काळे, मोठे काही दिसले. मी नेम धरून विचार करत थांबलो,

“ते अजून जवळ येणार नाही का?”

मी थांबलो. त्याने कान हलवले. वळले आणि मागे जाऊ लागले. मग ते सर्वच्या सर्व माझ्या नजरेत आले. ते फार नालायक होते. मी उद्दीपित होऊन, गोळी चालवली. मी पाहिले, माझी गोळी झाडाला लागून फुकट गेली. मी धुरातून डोकावून पाहिले. अस्वलाला मी परत फिरून, झाडांमध्ये घुसताना पाहिले.

मी विचार केला, ‘ठीक आहे. माझी संधी हुकली. आता ते माझ्याकडे परत येणार नाही. माझा मित्र त्याला गोळी मारेल किंवा तो ओरडणाऱ्या शेतकऱ्यामध्ये जाऊन मिसळेल. कुठल्याही परिस्थितीत ते मला दुसरी संधी देणार नाही.’

मी माझ्या बंदुकीत गोळ्या भरल्या. पण परत ऐकत उभा राहिलो. शेतकरी ओरडत होते. माझा मित्र जिथे उभा होता, तेथून जवळच मला एका स्त्रीचे फार जोराने किंचाळणे ऐकू आले,

“अस्वल इथे आहे! इथे अस्वल आहे! इकडे या! इकडे या! ओहो! ओहो! ओय! ओय!”

तिला अस्वल दिसत होते. मी ते दिसण्याची अपेक्षा सोडून दिली होती. मी उजवीकडे माझ्या मित्राकडे बघत होतो. मी एकदम हातात काठी घेतलेल्या व कशावर तरी नेम धरल्यासारख्या दामिआनला पाहिले. त्याच्या पायात बूट नव्हते. तो माझ्या मित्राच्या दिशेने फुटपाथवरून धावत होता. तो त्याच्याशेजारी गुडघ्यात वाकून उभा राहिला. त्याच्या हातातील काठीने त्याने कशावर तरी नेम धरला होता. मग माझ्या मित्राने बंदूक उंचावलेली मी पाहिली. ठो! त्याने गोळी मारली.

मी विचार केला, ‘त्याने अस्वलाला मारले.’

पण मी पाहिले, की माझा मित्र अस्वलाकडे धावला नाही. त्याचा नेम चुकला होता. कारण बहुधा, पूर्ण परिणामकारकतेने नेम साधला गेला नव्हता.

मी विचार केला, ‘अस्वल निघून जाईल. आता दुसऱ्यांदा परत माझ्याकडे येणार नाही --- पण हे काय झाले?’

सुसाट वाऱ्यासारखे, ते माझ्याकडे येऊ लागले. मी सरळ नजर टाकली, तर दाट जंगलातील रस्त्याने ते थेट माझ्यावरच चालून येत होते. ते फार तर पाच सहा पाऊलांवर असेल. मी

त्याला समग्र पाहिले. त्याचे लाल डाग असलेले प्रचंड डोके व काळी छाती पाहिली. ते बर्फ बाजूला उडवत सरळ माझ्यावर चाल करून येत होते. मी त्याच्या डोळ्यात पाहिले. त्याने मला पाहिले नाही. रागाने धुमसत, ते वेड्यासारखे उधळले होते. मी उभा असलेल्या झाडावर, ते चाल करून आले. मी माझी बंदूक घेऊन नेम साधला. आता ते जवळजवळ माझ्या दिशेने येऊ लागले. आणि माझा नेम चुकलेला मी पाहिला. माझी गोळी त्याला लागली नाही, त्याने तिचा आवाज सुद्धा ऐकला नाही.

तरी ते माझ्या समोरासमोर आले. मी माझी बंदूक खाली केली. आणि नेम धरून, परत गोळी मारली. ती त्याच्या डोक्याला जवळजवळ चाटून गेली. ठो! त्याला लागली, पण ते मेले नाही. ते त्याचे डोके उचलून, कान मागे टाकत, दात विचकत माझ्यावर चालून आले.

मी माझी दुसरी बंदूक उचलली. पण मी तिला हात लावण्यापूर्वी, त्याने माझ्यावर हल्ला केला. मला बर्फात पाडून, ते माझ्या अंगावरुन गेले.

मी विचार केला, ‘त्याने मला सोडले! देवाचे आभार!’

मी उठू लागलो. पण मला कोणीतरी खाली दाबत होते. मला उठू देत नव्हते. घाईमध्ये अस्वलाने मला ओलांडले. पण ते वळले

आणि त्याच्या पूर्ण शरीराच्या ओझ्याने माझ्या अंगावर पडले. मला काही जड खाली ढकलत असल्याचे समजले. माझ्या चेहऱ्यावर काही गरम मला जाणवले. ते माझा पूर्ण चेहरा ओरबाडून चावायला बघत होते. माझे नाक त्याच्या तोंडात आधीच गेले होते. मला गरम तोंड लागत होते. त्याच्या रक्ताचा वास येत होता. ते त्याच्या पंजांनी माझे खांदे खाली दाबत होते. त्यामुळे मला हालचाल करता येत नव्हती. मी फक्त माझे डोके त्याच्या जबड्यापासून दूर, खालील बाजूस माझ्या छातीत रुतवू शकत होतो. माझे नाक डोळे त्याच्या पकडीतून सोडवण्याचा प्रयत्न करत होतो. तर ते त्यात त्याचे दात घुसवायला बघत होते. नंतर त्याने त्याच्या खालच्या जबड्याने माझे केसांखालील कपाळ आणि त्याच्या वरील जबड्याने माझा डोळ्याखालील भाग पकडल्यासारखे मला वाटले. आणि आता चावा घेतला जाणार, असे वाटले. जणू माझा चेहरा सुरीने  कापला जात होता. मी सुटण्यासाठी धडपडत होतो. तर तो चावणाऱ्या कुत्र्यासारखा जबडा मिटायचा प्रयत्न करत होता. मी माझा चेहरा गरकन वळवण्यात यशस्वी झालो. पण तो परत त्याचा जबडा पुढे पुढे आणू लागला.

मी विचार केला, 'माझा अंत जवळ आला!'

मग मला माझ्यावरचे ओझे उचलले गेल्यासारखे वाटले. आणि वर बघून मला समजले, ते तिथे नव्हते. त्याने उडी मारली व पळून गेले.

जेव्हा माझ्या मित्राने व दामिआनने मला अस्वलाने खाली पाडून हल्ला करायला सुरवात केल्याचे पाहिले, तेव्हा ते माझ्या सुटकेसाठी धावले. माझ्या मित्राने घाईने मूर्खपणा करून, बर्फ चेपला गेलेल्या रस्त्यावर धावण्याऐवजी, तो खोल बर्फात पळाला आणि पडला. बर्फामधून कसाबसा उठतांना, अस्वल माझ्या अंगावर गुरगुरत होते. पण दामिआन होता तसा, बंदुकीशिवाय, फक्त हातातील काठीनिशी रस्त्याने ओरडत धावत आला.

“ते मालकाला खाते आहे! ते मालकाला खाते आहे!“

आणि धावत तो  अस्वलाशी आला.

“अरे मूर्खा, तू काय करतो आहेस? चल बाजूला हो! चल निघ!”

अस्वलाने त्याचे ऐकले. आणि मला सोडून, ते पळून गेले. मी उठल्यावर एखाद्या बकरीला मारावे, तेवढे माझे रक्त बर्फावर सांडले होते आणि डोळ्यांवर माझे मास लोंबत होते. तरीही मी जोशात असल्याने, मला दुखत नव्हते.

एव्हाना माझा मित्र आला आणि इतर लोकही जमले. ते माझ्या जखमांकडे पाहू लागले. त्यावर त्यांनी बर्फ लावला. मी माझ्या जखमा विसरून विचारले,

"अस्वल कुठे गेले? कुठल्या मार्गाने गेले?"

एकदम मला ऐकू आले.

"ते इथे आहे! ते इथे आहे!"

पुन्हा आम्ही अस्वलाला आमच्या दिशेने येतांना पाहिले. आम्ही आमच्या बंदूका रोखल्या. पण कोणी गोळी मारण्यापूर्वीच ते पळून गेले.

ते फार चिडले होते. त्याला मला पुन्हा पकडायचे होते. पण एवढे लोक बघून ते घाबरले. आम्हाला त्याच्या मागावरून कळले, की त्याच्या डोक्यातून रक्त गळत होते. आम्हाला त्याचा पाठलाग करायचा होता. पण माझ्या जखमा आता फार ठणकू लागल्या होत्या. त्यामुळे आम्ही गावात डॉक्टरच्या शोधार्थ गेलो.

डॉक्टरने माझ्या जखमा शिवल्या व लवकरच त्या बऱ्या होऊ लागल्या.

महिन्याभराने आम्ही परत अस्वलाच्या शिकारीसाठी गेलो. पण मला त्याला संपवायची संधी मिळाली नाही. ते गोलातून बाहेर येईना. पण तिथल्या तिथे जोरजोरात केकाटत फिरत राहिले.

दामिआनने त्याला मारले. अस्वलाचा खालचा जबडा तुटला होता. आणि माझ्या गोळीने त्याचा एक दात तुटून उडाला होता.

तो अवाढव्य प्राणी होता आणि त्याच्या अंगावर खूप फर होते.

मी त्यात पेंढा भरून माझ्या खोलीत ठेवले. माझ्या कपाळावरच्या जखमा इतक्या चांगल्या भरून आल्या, की त्याच्या खुणादेखील अगदी क्वचित पुसट दिसतात.

# Three Hermits

# तीन साधू

## व्होल्गाच्या खोऱ्यात प्रचलित असलेली लोककथा



"प्रार्थना करतांना उगीच पुनरावृत्ती करू नका. लोक असे करतात, कारण त्याना वाटते की जास्त वेळा म्हटले, की ते देवापर्यंत पोचेल. तेव्हा त्यांच्यासारखे वागू नका. तुम्ही काही मागण्यापूर्वी तुमच्या बापाला, देवाला कळते की तुम्हाला कसली गरज आहे."

एक धर्मगुरू अर्चांगेलपासून सोलोव्हेत्स्कच्या मठापर्यंत जहाजाने प्रवास करत होता. त्याच जहाजात बरेचसे वारकरी होते. ते काही धर्मस्थळांना भेटी देण्यासाठी चालले होते. आरामशीरपणे सफर चालली होती वारा अनुकूल होता. हवामान चांगले होते. वारकरी डेकवर जमले होते. गट करून गप्पा मारत, खातपीत बसले होते. धर्मगुरू डेकवर फेऱ्या मारत होता. एक गट बोटीच्या पुढच्या भागात उभा राहून एका कोळयाचे बोलणे ऐकत होता. धर्मगुरूने थांबून तो कोळी सगळ्यांना दाखवत होता, त्या दिशेकडे बघितले. पण त्याला समुद्राच्या चकाकत्या पाण्याशिवाय काही दिसले नाही. ते काय बोलत आहेत, ते ऐकण्यासाठी तो त्या गटाच्या जवळ सरकला. पण त्याला बघितल्यावर त्या कोळी मनुष्याने टोपी काढली व तो  गप्प झाला. इतर लोकांनीही टोपी काढून धर्मगुरूला थोडे झुकून अभिवादन केले.

धर्मगुरू म्हणाले, “तुम्हाला त्रास द्यायची माझी इच्छा नाही. पण तो कोळी तुम्हाला काय सांगतो आहे, हे ऐकण्यासाठी मी इथे आलो. इतरांपेक्षा थोडा धीट, असा एक व्यापारी बोलला, “तो आम्हाला तीन साधूंबद्दल सांगत होता.” बोटीच्या कडेला जाऊन एका पेटीवर बसत धर्मगुरू बोलले, “कोण साधू? मला

त्यांच्याबद्दल सांगा. मला ऐकायला आवडेल. तुम्ही कशाकडे निर्देश करत होतात?”

थोडे उजवीकडे निर्देश करत, तो मनुष्य म्हणाला, “ते लहानसे बेट समोर दिसते आहे. तिथे मोक्षप्राप्तीसाठी तीन साधू रहातात.”

धर्मगुरू बोलला, “कुठले बेट? मला तर काही दिसत नाही.”

“ते बघा. दूर अंतरावर माझ्या हाताच्या दिशेने बघा. तो छोटा ढग दिसतो आहे? त्याच्या खाली थोडे डावीकडे, एक लांब बारीकशी रेष दिसते आहे. तेच ते बेट आहे.”

धर्मगुरूने काळजीपूर्वक बघितले. पण त्यांच्या डोळयांना चकाकणाऱ्या पाण्याशिवाय काही दिसेना.

तो म्हणाला, “मला दिसत नाही. पण तिथे रहाणारे साधू कोण आहेत?”

कोळी बोलला, “ती पवित्र माणसे आहेत. मी पूर्वी त्यांच्याबद्दल ऐकले आहे. पण दोन वर्षांपूर्वीपर्यंत, त्यांना भेटायचा योग आला नव्हता.”

एकदा मासे पकडतांना रात्रीच्या वेळी, मी भरकटत त्या बेटाला लागलो. मी कुठे आलो ते मला समजत नव्हते. सकाळी

तिथे आसपास भटकताना, एक मातीची झोपडी दिसली. एक म्हातारा मनुष्य त्याजवळ उभा होता. मग अजून दोघे झोपडीतून बाहेर आले. त्यांनी पहिल्याला खायला घालून, त्याच्या वस्तू कोरड्या केल्या. माझी बोट दुरुस्त करायला त्यांनी मदत केली.

धर्मगुरूने विचारले, "ते कसे आहेत?"

एक छोटासा असून त्याची पाठ वाकलेली आहे. तो पोपचा झगा घालतो आणि खूप म्हातारा आहे शंभरच्या पुढे असावा. तो इतका म्हातारा आहे, की त्याच्या पांढऱ्या दाढीला हिरवी छटा येऊ लागली आहे. पण तो नेहमी हसत असतो व त्याचा चेहरा स्वर्गातील देवदूतासारखा तेजस्वी आहे. दुसरा उंच असून तोही खूप म्हातारा आहे. तो शेतकऱ्याचा जुना फाटका कोट घालतो. त्याची दाढी रुंद असून करड्या पिवळसर रंगाची आहे. तो दणकट मनुष्य आहे. मी त्याला मदत करण्यापूर्वी, त्याने जणू पेला असावा अशा तऱ्हेने माझी बोट वळवली. तो दयाळू आणि आनंदी आहे. तिसराही उंच असून, त्याची दाढी बर्फासारखी शुभ्र आहे. तो गंभीर आणि शिस्तप्रिय असून त्याच्या भुवयांचे केस लोंबत असतात. तो एक चटई कमरेभोवती गुंडाळतो.

धर्मगुरूने विचारले, "ते तुझ्याशी बोलले का?"

बराच वेळ ते गप्प राहूनच काम करत होते. ते आपापसात देखील अगदी कमी बोलत होते. त्यातील एकजण फक्त नजर टाकत होता आणि दुसरे दोघे त्याला समजून घेत होते. मी त्यातील उंच माणसाला विचारले, की ते इथे खूप वर्षे रहात आहेत का, तर तो हसला आणि रागावल्यासारखे काही शब्द पुटपुटला. पण सर्वात म्हातारा होता, त्याने त्याचा हात हातात घेतला. तो हसला आणि उंच माणूस शांत झाला. म्हातारा एवढेच बोलला, “आमच्यावर दया कर.” आणि हसला.

कोळी बोलत असतांना, जहाज त्या बेटाजवळ पोचले. व्यापारी हाताने दाखवत बोलला, “महाशय, आता तुम्ही नजर टाकलीत, तर तुम्हाला ते नीट दिसू शकेल.”

धर्मगुरूने पाहिले आणि त्याला एक गडद रेष दिसली --- तेच बेट होते. थोडा वेळ त्याकडे बघून तो सुकाणू असलेल्या माणसाकडे जाऊन म्हणाला,

“ते कुठले बेट आहे?”

तो माणूस उत्तरला, “त्याला काही नाव नाही. या समुद्रात अशी खूप आहेत.

“हे खरे आहे का, की तिथे मोक्षप्राप्तीसाठी तीन साधू रहातात?”

"महाशय, असे बोलले जाते. पण ते खरे आहे का, मला माहिती नाही. कोळी लोक म्हणतात, की त्यांनी त्यांना पाहिले आहे पण ही थाप असू शकेल."

धर्मगुरू बोलला, "मला त्या बेटावर उतरून त्याना बघण्याची इच्छा आहे. हे कसे जमवता येईल?"

सुकाणू असलेल्या माणसाने म्हटले, "जहाज त्या बेटाजवळ जाऊ शकणार नाही. पण तुम्ही बोटीने जाऊ शकाल, तुम्ही कप्तानाशी बोला."

कप्तानाला बोलावणे गेले व तो आला.

धर्मगुरू बोलला, "मला त्या तीन साधूंना भेटायला आवडेल. मला तिथे जाता येईल का?"

कप्तानाने त्याला त्याच्या विचारापासून, परावृत्त करण्याचा प्रयत्न केला.

तो म्हणाला, "अर्थात ते करता येईल. पण यात फार वेळ जाईल. महाशय, मी असे सांगायचे धाडस करतो, की इतके कष्ट घेऊन तुम्ही त्याना भेटावे, असे ते नाहीत. मी असे ऐकले आहे, की ते मूर्ख म्हातारे आहेत. त्यांना काही समजत नाही. ते एकही

शब्द बोलू शकत नाहीत. सागरातील माशाहून अधिक ते नाहीत.”

धर्मगुरू म्हणाला, “मला त्यांना भेटायचे आहे. मी तुमच्या त्रासासाठी व वेळासाठी पैसे भरेन. कृपया मला एक बोट द्या.”

नाईलाजाने आज्ञा देण्यात आली. खलाशांनी शिडे खाली घेतली. जहाजाने नांगर  टाकायची तयारी केली. एक बोट तयार ठेवण्यात आली. जहाजाच्या टोकावर धर्मगुरूसाठी खुर्ची टाकण्यात आली. त्यावर तो पुढे बघत बसला. बोटीतील सर्वजण तिथे जमले व बेटाकडे बघू लागले. नजर चांगली असणाऱ्यांना त्यावरील खडक दिसू लागले. मग मातीची झोपडीही दिसली. एका माणसाला तीन साधूही दिसले. कप्तानाने दुर्बिणीतून बघितले व ती धर्मगुरूला दिली.

“ते खरे दिसते आहे. त्या मोठ्या खडकाच्या थोडे उजवीकडे, तीन माणसे किनाऱ्यावर उभी आहेत.

धर्मगुरूने दुर्बीण नीट हलवून, तीन माणसे बघितली. एक उंच, एक बुटका आणि तिसरा अगदी लहानसा आणि वाकलेला होते. ते तिघे किनाऱ्यावर एकमेकांचा हात धरून उभे होते.

कप्तान धर्मगुरूकडे वळला.

“महाशय, जहाज याहून पुढे जाऊ शकणार नाही. जर तुम्हाला बेटावर जायचे असेल, तर बोट घेऊन तुम्ही जाऊ शकता. आम्ही इथेच थांबतो.”

शीड मिटवून जहाजाने थांबायची तयारी केली. एक धक्का बसून जहाज हेंदकाळले. नंतर बोट खाली करण्यात आली. त्यात ती वल्हवणारे नावाडी उडी मारून बसले. शिडीने धर्मगुरू उतरला व त्याच्या जागी बसला. नावाडी वल्ही मारू लागले व बोट झपाट्याने बेटाकडे जाऊ लागली. ते अगदी जवळ आल्यावर, त्यांना तिघे म्हातारे दिसले. एकजण उंच कंबरेला चटई गुंडाळलेला होता. दुसरा बुटका व शेतकऱ्याचा जुना फाटका कोट घातलेला होता. तिसरा खूप म्हतारा, वयाने पाठीत वाकलेला व पायघोळ झगा घातलेला होता. तिघे हातात हात घालून उभे होते.

नावाड्यांनी बोट किनाऱ्याला लावली व बोटीच्या कड्यांना धरून ठेवले. धर्मगुरू उतरला.

तिघे म्हातारे त्याच्यापुढे वाकले आणि धर्मगुरूने त्याला आशीर्वाद दिले. त्यामुळे ते आणखी नत झाले. मग तो त्यांच्याशी बोलू लागला.

तो म्हणाला, “मी असे ऐकले, की तुम्ही देवाची माणसे असून येथे आत्म्याच्या उन्नतीसाठी रहाता. आणि लोकांसाठी

ख्रिस्ताला भजता. देवदयेने ख्रिस्ताच्या कळपाला राखण्यासाठी व शिकवण्यासाठी काम करणारा, मी एक नम्र व क्षुल्लक सेवक असून, येथे तुम्हाला भेटायला आलो आहे. मला तुमच्यासारख्या ख्रिस्त सेवकांना भेटायचे होते. मी तुम्हाला काही शिकवू शकलो, तर शिकवायचे होते.”

तिघे म्हातारे एकमेकांकडे बघत हसले. पण काही बोलले नाहीत.

धर्मगुरू म्हणाला, “मला सांगा, तुमच्या आत्म्याच्या उन्नतीसाठी तुम्ही काय करता? या बेटावर तुम्ही देवाची सेवा कशी करता?”

एकाने सर्वात म्हाताऱ्या साधूकडे पाहून उसासा टाकला. तो सर्वात म्हातारा असलेला साधू बोलला, “देवाची सेवा कशी करायची, ते आम्हाला माहिती नाही. आम्ही आमचीच सेवा करून आम्हालाच आधार देतो.”

याबरोबर तिघांनी आकाशाकडे डोळे लावून म्हटले, “आम्ही तिघे आहोत. आमच्यावर कृपा कर.”

धर्मगुरू हसला. तो म्हणाला,

“तुम्ही पवित्र ट्रिनीटीबद्दल नक्कीच काही ऐकले असेल. पण तुम्ही प्रार्थना बरोबर करत नाही. देवासारख्या माणसानो, तुम्ही माझे मन जिंकले आहे. तुम्ही देवाला खूष करू बघत असल्याचे, मला समजते आहे. पण त्याची सेवा कशी करायची, हे तुम्हाला माहिती नाही. प्रार्थना अशी करत नाहीत. माझे ऐका. मी तुम्हाला शिकवतो. ही माझी पद्धत नाही, तर पवित्र बायबलमध्ये सगळयांनी अशा तऱ्हेने प्रार्थना करावी, अशी आज्ञा देवाने दिलेली आहे.

धर्मगुरूने तिन्ही साधूंना हे सांगायला सुरवात केली, की कसे वडील देवाने, मुलगा देवाने व पवित्र भूत म्हणून देवाने, लोकांमध्ये स्वतःला प्रकट केले आहे.

तो म्हणाला, “माणसांना वाचवण्यासाठी, मुलगा देव पृथ्वीवर आला. अशा तऱ्हेने त्याने आपल्याला प्रार्थना करायला शिकवले. मी म्हणतो. माझ्या मागून तुम्ही ‘आपले वडील’ म्हणा. आणि त्याच्यानंतर पहिल्या म्हाताऱ्याने परत म्हटले, “आपले वडील’. दुसऱ्या म्हाताऱ्याने म्हटले, “आपले वडील” व तिसऱ्यानेही म्हटले, “आपले वडील”

धर्मगुरूने म्हटले, “जे स्वर्गात आहेत”

पहिला साधू म्हणाला, “जे स्वर्गात आहेत” पण दुसरा गडबडला. त्याला शब्द नीट म्हणता येईनात. उंच साधूलाही तसेच झाले. त्याचे दाढीचे केस तोंडावर आल्याने, त्याला नीट बोलता येत नव्हते. सर्वात जास्त म्हाताऱ्या साधूच्या तोडात दात नसल्याने, त्याचेही उच्चार नीट नव्हते.

धर्मगुरूने परत परत म्ह्टले. त्याच्यामागून तिघे म्हणू लागले. धर्मगुरू एका दगडावर बसला.

तिघे म्हातारे त्याच्यासमोर उभे राहिले. त्याच्या तोंडाचे निरीक्षण करत, त्याच्यामागून म्हणत राहिले. धर्मगुरू दिवसभर ते काम करत राहिला. वीस वेळा, तीस वेळा, शंभर वेळा आणि तिघे त्याच्यामागून म्हणत राहिले. ते अडखळल्यावर त्याने तिघांना दुरुस्त केले व परत परत म्हणायला लावले.

देवाची पूर्ण प्रार्थना शिकवेपर्यंत व तिघांनी त्याच्यामागून म्हणेपर्यंत, धर्मगुरू थांबला नाही. त्यांना परत परत म्हणायला लावले. त्यांचे त्याना म्हणता येईपर्यंत तो तिथे थांबला.

मधल्या साधूला प्रथम सर्व म्हणता येऊ लागले. धर्मगुरूने त्याला परत परत म्हणायला लावले. शेवटी इतर दोघांनाही म्हणता येऊ लागले.

धर्मगुरू उठून जहाजाकडे जायला लागण्यापूर्वी, अंधारून यायला लागले होते. पाण्यावर चंद्र उगवू लागला होता. जेव्हा त्याने म्हाताऱ्यांचा निरोप घेतला, तेव्हा त्यांनी त्याला साष्टांग प्रणिपात केला. त्याने  त्यांना उठवून त्यांचे कपाळावर चुंबन घेतले. त्याने शिकवल्याप्रमाणे प्रार्थना करा, असे त्याना सांगितले. मग बोटीवर आरूढ होऊन तो जहाजावर पोचला.

त्याने तिघांना मोठ्याने ओरडून त्याने शिकवलेली प्रार्थना म्हणतांना ऐकले. बोट जहाजाजवळ गेल्यावर आवाज ऐकू येईनासा झाला. पण चंद्रप्रकाशात, ते किनाऱ्यावर उभे असलेले दिसत होते. सर्वात बुटका मध्ये, सर्वात उंच उजवीकडे आणि मध्यम उंचीचा डावीकडे. धर्मगुरू जहाजाशी पोचून, त्यावर चढला, शीडे उभारली गेली. जहाज सुटले, तरी धर्मगुरूला तीन साधू दिसत होते. शेवटी ते दिसेनासे झाले. पण बेट दिसत होते. शेवटी तेदेखील दिसेनासे झाले. फक्त समुद्राच्या लाटा चंद्रप्रकाशात दिसत राहिल्या.

बोटीतील लोक झोपू लागले. धर्मगुरूला झोपायची इच्छा नव्हती. तो एकटाच सुकाणूजवळ बसून, न दिसणाऱ्या बेटाच्या दिशेने समुद्राकडे बघत राहिला. त्या तीन साधूंबद्दल आठवत राहिला. देवाची प्रार्थना शिकून त्यांना किती आनंद झाला! देवाने

त्याला अशा चांगल्या लोकांच्या मदतीसाठी पाठवल्याबद्दल, त्याने देवाचे आभार मानले.

अशा तऱ्हेने तो बेटाच्या दिशेने समुद्राकडे बघत विचार करत बसलेला असतांना, इकडे तिकडे लाटांवर पडणारा चंद्रप्रकाश त्याला दिसत राहिला. अचानक त्याला शुभ्र, चकाकणारे काही चंद्रप्रकाशाच्या वाटेतून येतांना दिसले. तो समुद्रपक्षी होता, की एखाद्या बोटीचे चकाकणारे शीड होते? मनाशी नवल करत धर्मगुरूने, त्यावर नजर स्थिर केली.

त्याने विचार केला, ‘ती आपल्यामागून येणारी एखादी बोट असावी. पण ती फार वेगाने आपल्या जवळ येते आहे. एका मिनिटापूर्वी ती खूप लांब होती. पण आता खूपच जवळ आली आहे. पण मला शीड दिसत नाही. ती बोट नसावी. काही असले तरी जोराने येत, ते आपल्या जहाजाला गाठते आहे.’

ते काय आहे, ते त्याला कळेना. बोट नाही, पक्षी नाही आणि मासाही नाही! एका माणसापेक्षा, ते मोठे होते. पण असा भर समुद्रात माणूस कसा असेल? धर्मगुरू उठला व सुकाणूजवळील माणसांना म्हणाला,

“मित्रानो, तिकडे बघा. ते काय आहे?” आता त्याला ते काय आहे, ते स्पष्ट दिसू लागले होते. पण तरी तो परत म्हणाला,

“तीन साधू पाण्यावरून धावत आहेत. त्यांच्या करड्या दाढ्या चकाकत आहेत व ते जोराने जहाजाकडे येत आहेत.”

सुकाणू चालवणाऱ्याने त्याना बघून, घाबरून सुकाणू सोडून दिले.

“अरे देवा, ते साधू कोरड्या जमिनीवरून चालल्यासारखे पाण्यावरून धावत येत आहेत.

त्याचा आरडाओरडा ऐकून जहाजावरील प्रवासी तिथे गोळा झाले. त्यांनी साधूंना हातात हात घालून येतांना पाहिले. कडेचे दोघे जहाज थांबवायला सांगत होते. ते तिघेही हातपाय न हलवता पाण्यावर तरंगत होते. जहाज थांबायच्या आत ते जहाजाशी आले. डोकी वर काढून तिघेही एका आवाजात ओरडू लागले,

“हे देवाच्या सेवका, तू शिकवलेले आम्ही विसरून गेलो आहोत. आम्ही ते परत परत म्हणत होतो, तोपर्यंत ठीक चालले होते. पण आम्ही थोडा वेळ थांबल्यावर शब्द हरवले. आता सर्व काही हरवून गेले. आम्हाला आता काहीच आठवत नाही. आम्हाला परत शिकव.”

धर्मगुरू वळला व जहाजाच्या कडेला जाऊन बोलला, “अरे देवाच्या माणसानो, तुमची प्रार्थना देवापर्यंत पोचेल. मी तुम्हाला

शिकवण्याची काही गरज नाही. आम्हा पापी लोकांसाठी, तुम्ही प्रार्थना करा.”

आणि धर्मगुरू त्या तिघांपुढे नतमस्तक झाला. ते वळून समुद्रावरून चालत परत जाऊ लागले. दिवस उजाडायच्या आधीच, तेजस्वी प्रकाशात ते वाट चालू लागले.

The Imp And The Crust

# छोटारडा सैतान



एक शेतकरी पहाटे लवकर उठून, बरोबर न्याहारीसाठी पावाच्या कडा घेऊन, शेत नांगरणीसाठी नांगर व घोडा घेऊन बाहेर पडला. त्याने नांगर तयार केला. कोट काढून त्यात न्याहारी गुंडाळली व एका झुडूपाखाली ती ठेवून कामाला लागला. काही वेळाने जेव्हा त्याचा घोडा दमला व त्याला भूक लागली, तेव्हा त्याने घोड्याला चरण्यासाठी मोकळे सोडले आणि त्याने कोटात गुंडाळून ठेवलेल्या न्याहारीकडे तो गेला.

त्याने कोट उचलला. पण त्यात पावाच्या कडा नव्हत्या. त्याने कोट उलगडून नीट पाहिले. तो झटकला. पण --- पाव नव्हता. त्याला असे कसे झाले, ते कळेना.

त्याने विचार केला, ‘हे विचित्र आहे. मी तर इथे कुणाला येऊन पाव चोरतांना पाहिले नाही.’

छोटारड्या सैतानाने पाव चोरला होता. शेतकरी शेत नांगरत असतांना, तो झुडूपामागे बसलेला होता. शेतकरी शिव्या देऊन कांगावा कसा करतो, ते पहाण्यासाठी तो थांबला होता.

शेतकऱ्याला न्याहारी गायब झाली म्हणून वाईट वाटले. ‘पण आता त्याला काय इलाज होता? शेवटी मी काही भुकेने मरणार नाही. ज्याने पाव चोरला, त्याला त्याची गरज असेल. त्याचे भले होवो.’ असा विचार त्याने केला.

तो विहीरीशी गेला. पाणी प्यायले आणि थोडा वेळ विश्रांती घेतली. मग घोड्याला जुंपून परत नांगरणी सुरु केली.

शेतकरी काही वाईट वागला नाही, हे सांगायला तो छोटारडा मोठ्या सैतानाकडे, त्याच्या मालकाकडे, गेला.

तो म्हणाला की त्याने शेतकऱ्याचा पाव पळवला, तरी काही न चिडता उलट शेतकरी म्हणाला, की कुणा गरजूचे भले होवो.

सैतान रागावून बोलला, “असे झाले असेल, तर तो तुझा दोष आहे --- तुला तुझे काम नीट करता येत नाही. जर शेतकरी आणि त्यांच्यापाठोपाठ त्यांच्या घरातील बायका असे वागू लागल्या, तर आपले कसे होणार! परत जा आणि पाव होता तसा

ठेवून दे. लगेच जा. जर तीन वर्षात तू शेतकऱ्याला तू बिघडवले नाहीस, तर मी तुला ठार करेन.”

छोटारडा घाबरला. आपली चूक कशी सुधारावी, असा विचार तो करत बसला. त्याने खूप विचार केला. शेवटी त्याला एक कल्पना सुचली.

त्याने कामगाराचे रूप घेतले. आणि त्या गरीब शेतकऱ्याकडे नोकरी स्वीकारली. पहिल्या वर्षी त्याने, शेतकऱ्याला दलदलीच्या जमिनीत मका पेरायचा सल्ला दिला. त्याचे ऐकून, शेतकऱ्याने त्या वर्षी तसे केले. त्या वर्षी पाऊस अजिबात न पडल्याने इतर शेतकऱ्यांची पिके करपून गेली. पण आपल्या गरीब शेतकऱ्याकडे भरघोस पीक आले. त्याला वर्षभर ते पुरून, शिवाय उरले.

पुढील वर्षी त्याने शेतकऱ्याला, डोंगर उतारावर पेरणी करायचा सल्ला दिला. त्या वर्षी अती पाउस पडल्याने, इतर शेतकऱ्यांचे पीक वाहून वा कुजून गेले. पण आपल्या गरीब शेतकऱ्याचे पीक डोंगर उतारावर असल्याने चांगले आले. मागील वर्षापेक्षाही ते जास्त उरले.

एवढ्या ढीगाचे काय करावे, ते त्याला कळेना. मग छोटारड्याने त्याला त्यापासून दारू कशी बनवायची, ते शिकवले. शेतकऱ्याने कडक दारू बनवली, स्वतः प्यायला व मित्रांना

पाजायला सुरवात केली. छोटारडा त्याच्या मालकाकडे, सैतानाकडे गेला आणि बढाया मारल्या, की त्याने त्याच्या चुकीचे परिमार्जन केले आहे. सैतान म्हणाला, की तो स्वतः येऊन खात्री करेल.

तो शेतकऱ्याच्या घरी आला. त्याने पाहिले की शेतकरी त्याच्या आसपासच्या सधन शेतकऱ्यांना घरी बोलावून, दारू देऊन त्यांचे स्वागत करतो आहे. त्याची बायको पाहुण्यांना पेले देत आहे आणि असे करतांना टेबलाला धडकून एक पेला फुटतो.

शेतकरी रागावून बायकोला ओरडतो, "अग सटवे, हे काय केलेस? तुला हे काय गटाराचे पाणी वाटले का? अग लंगडे, ती दारू तू जमिनीवर सांडवून फुकट घालवलीस."

कोपराने मालकाला धक्का देत छोटारडा बोलला, "बघा. मागे मी त्याचा पाव चोरला, तेव्हा शिव्या न देणारा माणूस, आता बघा कसा वागतो आहे."

शेतकऱ्याने त्याच्या बायकोच्या अंगावर ओरडत, स्वतः पेले वाटायला सुरवात केली. तेवढ्यात कामावरून परतणारा, एक अनाहूत गरीब शेतकरी तिथे आला. त्याने सगळ्यांना अभिवादन केले व बसला. त्याने बघितले, की सगळे काहीतरी पीत आहेत. दिवसभराच्या कामाने दमलेल्या त्याला वाटले, की त्यालाही पेय

मिळेल. तो खूप वेळ बसला. त्याच्या तोंडाला पाणी सुटले होते. पण त्याला पेय देण्याऐवजी यजमान पुटपुटला, “कुणी आगंतुकाला देण्याइतके पेय माझ्याकडे नाही.”

यामुळे सैतान खूष झाला पण छोटारडा गालातल्या गालात हसून बोलला, “थांबा. अजून पुढे काय होते, ते बघा.”

श्रीमंत शेतकरी प्यायले. यजमानही प्यायला. ते एकमेकांना वाट्टेल तशी, निसरडी भाषा वापरून बरळू लागले.

सैतानाने खूप वेळ ऐकले व छोटारड्याला शाबासकी देऊन त्याची स्तुती केली.

तो म्हणाला, “जर दारू त्यांना इतके लबाड बनवते, तर ते आता एकमेकांना फसवू लागतील. आणि लवकरच सर्वजण आपल्या हातात येतील.”

छोटारडा म्हणाला, “त्यांनी अजून एकेक पेला प्यायला, की काय होते ते बघा. आता ते शेपटी हलवणारे कोल्हे आहेत व एकमेकांना शिव्या देत आहेत. पण नंतर तुम्ही बघाल, की ते रानटी लांडगे होतील.”

सगळेजण अजून एकेक पेला दारू पितात. त्यांचे बोलणे अजून रानटी व अर्वाच्य होते, आता निसरडे बोलणे, शिव्याशापांमध्ये व गुरगुरण्यामध्ये बदलते. थोड्याच वेळात तिथे

मारामारी सुरु होते. ते एकमेकांच्या नाकावर ठोसे लगावतात. यजमानही मारामारीत सामील होतो व त्याला पिटून काढले जाते.

हे बघून सैतान फार खूष होतो. तो म्हणतो, “पण हे किरकोळ आहे.” छोटारडा म्हणतो, “अजून थांबा. --- अजून कळसाध्याय यायचा आहे. त्यांनी तिसरा पेला रीचवेपर्यंत थांबा. आता ते रागाने लांडग्यासारखे आक्रमक झाले आहेत. पण अजून एक पेला प्यायल्यावर, ते डुकरासारखे होतील.

शेतकरी तिसरा पेला घेतात आणि का कुणास ठाऊक, पण असमाधान व्यक्त करत, ओरडत रहातात. कोणी कोणाचे ऐकून घेत नाही. मग मेजवानी संपत येते. एकटेदुकटे वा गर्दी करून ते भेलकांडत रस्त्याने जाऊ लागतात. यजमान त्यांचा निरोप घ्यायला बाहेर जातो. पण नाकावर आपटून डबक्यामध्ये पडतो. नखशिखांत चिखलाने बरबटतो आणि एखाद्या डुकरासारखा केकाटत बसतो.

सैतान अजून अजून खूष होत जातो.

तो म्हणतो, “अरे वा! छान! पाव चोरून तू जी चूक केली होतीस, ती पूर्णपणे भरून काढलीस. पण आता मला सांग, तू हे पेय कसे बनवलेस? पहिल्यांदा तू कोल्ह्याचे रक्त त्यात घातले असणार. त्यामुळे ते शेतकरी लबाड बनले. मग मला वाटते, तू

लांडग्याचे रक्त घातले असणार. त्यामुळे ते आक्रमक झाले. आणि शेवटी तू डुकराचे रक्त घातले असणार. त्यामुळे ते डुकरासारखे वागू लागले.”

छोटारडा म्हणतो, “नाही. मी असे काही केले नाही. मी फक्त एवढेच पाहिले, की शेतकऱ्याकडे शेतामध्ये जरुरीपेक्षा जास्त उत्पन्न कसे येईल. पशूंचे रक्त माणसामध्ये नेहमी असतेच. ते दबलेले असते. पण जोपर्यंत त्याच्याकडे जरुरीपुरते धान्य होते, तोपर्यंत शेतकरी स्वभावाने चांगला राहिला. पण जेव्हा त्याच्याकडे अती धान्य झाले, तेव्हा तो ऐषारामाचा विचार करू लागला --- पिण्याचा! त्याच्यातील कोल्ह्याचे, लांडग्याचे व डुकराचे रक्त बाहेर आले. माणूस पीत राहिला तर तो पशूच होतो.

सैतानाने छोटारड्याची स्तुती केली आणि त्याला बढती दिली.

Three Questions

# तीन प्रश्न



एकदा एका राजाच्या असे मनात आले, की जर त्याला प्रत्येक गोष्ट सुरु करायची योग्य वेळ माहिती झाली, ज्या लोकांचे ऐकावे, असे चांगले लोक माहिती झाले आणि सर्वात महत्वाचे म्हणजे त्याला हे माहिती झाले, की त्याने कुठली महत्वाची गोष्ट करायला हवी, तर एकदा तो जे करायचे ठरवेल, त्यात तो कधीही अयशस्वी होणार नाही.

असे त्याच्या मनात आल्याने, त्याने पूर्ण राज्यभर अशी दवंडी पिटवली, की या तीन गोष्टी त्याला जो शिकवेल, त्याला

मोठे बक्षीस देण्यात येईल. पहिली म्हणजे प्रत्येक गोष्टीची योग्य वेळ कोणती, दुसरे म्हणजे ज्यांचे आपण ऐकावे, असे चांगले लोक कोण आणि तिसरे म्हणजे, आपण करायची सर्वात महत्वाची गोष्ट कुठली.

मोठी विद्वान मंडळी राजाकडे आली. प्रत्येकाने त्याच्या प्रश्नांना वेगवेगळी उत्तरे दिली.

पहिल्या प्रश्नाचे उत्तर देतांना काहीजण म्हणाले, की प्रत्येक गोष्टीची योग्य वेळ शोधण्यासाठी, आधीच वर्षभराचे वेळापत्रक माहिती हवे. त्या त्या दिवसानुसार, महिन्यानुसार वर्षभराचे नियोजन करावे. त्यामुळेच केवळ गोष्टीची योग्य वेळ लक्षात येईल. तर काहीजण म्हणाले, की प्रत्येक गोष्टीची योग्य वेळ ठरवणे अशक्य आहे. पण उगीच भूतकाळात गुंतून पडू नये. सध्या सभोवताली काय सुरु आहे, हे डोळसपणे पहावे. त्यावरून आता काय करणे गरजेचे आहे, ते ठरवावे. तर काहीजण म्हणाले, की राजा कितीही जागरूक असला, तरी एका माणसाला प्रत्येक कामाची योग्य वेळ ठरवणे, अशक्य आहे. त्यासाठी त्याने शहाण्या लोकांचे मंडळ तयार केले पाहिजे. त्यांच्या सहकार्याने प्रत्येक गोष्टीची योग्य वेळ निश्चित करता येईल.

काहीजणांचे म्हणणे पडले, की काही गोष्टी अशा असतील की त्या मंडळापुढे मांडण्याइतका वेळ नसेल. आणि त्या करायच्या की नाही, हे ताबडतोब ठरवणे आवश्यक असेल. पण हे ठरवण्यासाठी आधी हे माहिती पाहिजे, की पुढे काय होणार आहे. फक्त जादूगारच हे जाणू शकतात. त्यामुळे त्यांनी जादूगाराचा सल्ला घावा.

दुसऱ्या प्रश्नाला वेगवेगळी उत्तरे मिळाली. काहीजण म्हणाले की राजाचे सल्लागार मंडळ, काहीजण म्हणाले धर्मगुरू. काहीजण म्हणाले डॉक्टर, तर काहीजण म्हणाले योद्धे हे सर्वात गरजेचे आहेत.

तिसरा प्रश्न, करण्यासारखी कुठली महत्वाची गोष्ट आहे, याचे उत्तर देतांना काहीजण म्हणाले, शास्त्र ही जगात सर्वात महत्वाची गोष्ट आहे. काहीजण म्हणाले युद्धकौशल्य सर्वात महत्त्वाचे आहे. तर काहीजण म्हणाले की धार्मिक पूजापाठ करणे, हे जास्त महत्वाचे आहे.

सगळी उत्तरे वेगवेगळी होती. राजाला कुणाचेच उत्तर पटले नाही. त्याने कुणालाच बक्षीस दिले नाही. योग्य उत्तर मिळण्यासाठी, त्याने शहाणपणाबद्दल पंचक्रोशीत प्रसिद्ध असलेल्या एका साधूला भेटायचे ठरवले. तो साधू एका जंगलात

रहात होता. ते त्याने कधीच सोडले नव्हते व तो फक्त सामान्यजनांना भेटत असे. तेव्हा राजाने साधे कपडे केले व साधूला भेटण्यापूर्वी घोड्यावरून उतरून, काही अंतर चालत गेला. अंगरक्षकालाही बरोबर नेले नाही. जेव्हा राजा साधूच्या झोपडीजवळ गेला, तेव्हा तो झोपडीच्या पुढील जमीन खणत होता. राजाला बघून त्याने अभिवादन केले, पण खणतच राहिला. साधू लहानखुरा आणि अशक्त होता. प्रत्येक वेळेस जमिनीत घाव घालून थोडी माती बाहेर काढल्यावर तो जोरात श्वास घेऊ लागे.

राजा त्याच्याजवळ येऊन म्हणाला, “मी तीन प्रश्नांची उत्तरे जाणून घेण्यासाठी, तुमच्याकडे आलो आहे. मी योग्य वेळी योग्य काम कसे करू शकेन? माला आत्यंतिक गरजेचे असे कोण लोक आहेत? आणि कुठल्या गोष्टींकडे मी सर्वप्रथम लक्ष द्यावे?”

साधूने राजाचे ऐकून घेतले. पण काहीच उत्तर दिले नाही व खणणे चालू ठेवले. राजा बोलला, “तुम्ही दमला आहात. कुदळ घेऊन, थोडा वेळ मला तुमच्यासाठी खणू दे.”

“आभारी आहे.” असे राजाला म्हणत व त्याला कुदळ देत, साधू जमिनीवर बसला.

थोडा वेळ खणल्यावर, राजा थांबला व परत त्याला ते तीन प्रश्न विचारले. साधू पुन्हा काहीही उत्तर न देता उठला व हात पसरून कुदळ मागितली व बोलला,

“तुम्ही थोडी विश्रांती घ्या. आता मी खणतो.”

पण राजाने त्याला कुदळ न देता खणणे चालू ठेवले. एक तास गेला. दुसरा गेला. झाडांमागे सूर्य मावळू लागला. शेवटी राजाने कुदळ जमिनीवर ठेवली व म्हणाला,

“मी मला पडलेल्या प्रश्नांची उत्तरे मिळवण्यासाठी तुमच्याकडे आलो. जर तुम्हाला उत्तरे देता येत नसतील, तर मला तसे सांगा. मी घरी परततो.”

साधू म्हणाला, “इथे कुणीतरी धावत येत आहे. आपण बघू, ते कोण आहे.”

राजाने वळून बघितले, तर एक दाढीवाला माणूस जंगलातून पळतपळत येत होता. त्या माणसाने त्याचे हात पोटावर दाबून धरले होते. तिथून रक्त गळत होते. जेव्हा तो राजाच्या जवळ येऊन पोचला, तेव्हा तो क्षीणपणे कण्हत, जमिनीवर चक्कर येऊन पडला. राजाने आणि साधूने त्याचे कपडे सैल केले. पोटावर मोठी जखम होती. राजाने ती जमेल तशी धुतली व त्याच्या रुमालाने व साधूने दिलेल्या पंचाने ती बांधली. पण रक्त वहायचे थांबेना. राजा

कोमट रक्त टिपून घेऊन, फडकी बदलत, जखम परतपरत बांधत राहिला.

शेवटी जेव्हा रक्त वहायचे थांबले, तेव्हा तो माणूस शुद्धीवर येऊन काही प्यायला मागू लागला. राजाने ताजे पाणी आणून त्याला पाजले. मध्यंतरीच्या काळात, सूर्य मावळून थोडे गार झाले. साधूच्या मदतीने, राजाने त्याला झोपडीच्या आत नेले आणि अंथरुणावर ठेवले. त्या माणसाने शांतपणे डोळे मिटले. पण केलेल्या कामामुळे राज इतका दमला, की अगदी झोपेच्या काठावर येऊन ठेपला व तिथेच लवंडून झोपला --- त्या उन्हाळ्यातील लहान रात्री त्याला एकदम गाढ झोप लागली. जेव्हा सकाळी तो उठला, तेव्हा तो कुठे आहे, ते त्याला बराच वेळ आठवेना. त्याच्याकडे प्रकाशित डोळ्यांनी बघणारा, अंथरुणावरील विचित्र दाढीवाला माणूस कोण आहे ते देखील त्याला समजेना.

राजा जागा होऊन त्याच्याकडे बघतांना पाहिल्यावर, दाढीवाला माणूस क्षीण आवाजात म्हणाला, “मला क्षमा करा.”

राजा म्हणाला, “मी तुला ओळखत नाही आणि क्षमा कशाबद्दल करायची?”

“तुम्ही मला ओळखत नाही. पण मी तुम्हाला ओळखतो. तुमचा सूड घेण्याची शपथ घेतलेला असा मी, तुमचा शत्रू आहे. कारण तुम्ही माझ्या भावाला फाशी देऊन, माझी संपत्ती लुबाडली. तुम्ही एकटे साधूला भेटण्यासाठी गेल्याचे मला समजले. तुम्ही परततांना तुम्हाला मारायचे, असे ठरवून मी निघालो. पण दिवस मावळला, तरी तुम्ही निघाला नाहीत. त्यामुळे मी हल्ला करण्यासाठी लपून बसलेल्या जागेतून बाहेर पडलो. मी तुमच्या अंगरक्षकाजवळ आलो असता, त्याने मला ओळखले व मला जखमी केले. तेथून मी निसटलो. पण तुम्ही माझ्या जखमेला मलमपट्टी केली नसती, तर मी मेलोच असतो. मी तुम्हाला खलास करायची इच्छा करत होतो आणि तुम्ही मला जीवदान दिलेत. आता मी जर जगलो, तर तुमच्या परवानगीने मी तुमचा सर्वात विश्वासू सेवक, म्हणून राहू इच्छितो. माझ्या मुलांनाही मी तेच सांगेन. मला क्षमा करा.”

इतक्या सहजपणे शत्रूशी समझोता झालेला बघून, राजा फार आनंदित झाला व त्याचा मित्र म्हणून स्वीकार केला. त्याने त्याला फक्त क्षमाच केली नाही, तर स्वतःचे सेवक व डॉक्टर त्याच्याकडे पाठवणार असल्याचे सांगितले. त्याची संपत्तीसुद्धा त्याला परत मिळवून देण्याची हमी दिली.

जखमी माणसाचा निरोप घेऊन, राजाने बाहेर जाऊन साधू कुठे दिसतो का ते बघितले. जाण्यापूर्वी त्याच्याकडून तीन प्रश्नांची उत्तरे मिळाली तर पहावे, असा त्याचा विचार होता. त्याने आदल्या दिवशी खणलेल्या खड्ड्याजवळ गुडघ्यावर बसून, तो साधू बिया पेरत होता.

राजा त्याच्याजवळ जाऊन म्हणाला,

"महाशय, मी तुम्हाला माझ्या तीन प्रश्नांची उत्तरे देण्याची विनंती केली होती."

अजूनही त्याच्या काटकिळ्या पायांवर बसून, साधू त्याच्यासमोर उभ्या राहिलेल्या राजाला म्हणाला, "तुला आधीच उत्तरे मिळालेली आहेत."

राजाने विचारले, "म्हणजे काय? कशी काय उत्तरे मिळाली आहेत?"

साधू उत्तरला, "तू पाहिले नाहीस का, जर काल तुला माझ्या अशक्तपणाची दया येऊन, तू माझ्यासाठी जमीन खणली नसतीस, तर त्या माणसाने तुझ्यावर हल्ला केला असता. आणि तू इथे न राहील्याबद्दल, पश्चात्ताप केला असतास. तेव्हा, तू खणत होतास, ती योग्य वेळ होती व मी योग्य माणूस होतो. मला काही मदत करायची, हे महत्वाचे काम होते. नंतर तो मनुष्य जेव्हा

आपल्याकडे धावत आला, तेव्हा तू त्याला मदत केलीस. ती सर्वात महत्वाची वेळ होती. कारण तू त्याची शुश्रुषा केली नसतीस, तर तो तुझ्याबरोबर समझोता न करता मेला असता. त्यामुळे तो महत्वाचा माणूस होता आणि तू त्याच्याकरता जे काही केलेस, ते तुझे सर्वात महत्वाचे काम होते.

तेव्हा लक्षात ठेव, 'आता' हीच महत्वाची वेळ आहे --- तीच सर्वात महत्वाची वेळ आहे, कारण फक्त तीच अशी वेळ आहे, की जेव्हा तुझ्या हातात काही सत्ता आहे. तू काही करू शकतोस. तू ज्याच्याबरोबर आहेस, तो सर्वात गरजेचा मनुष्य आहे. मनुष्याला कधीच माहिती नसते, की आपली गाठ कोणाशी पडणार आहे. सर्वात महत्वाचे कृत्य, गरजवंताला मदत करणे हे आहे. कारण त्यासाठीच मनुष्याला जीवन मिळाले आहे.

Too Dear

# अती प्रिय

[ गाय डे मोपांसा याच्या गोष्टीवरून टॉलस्टॉयने घेतलेली ]



फ्रान्स व इटली यांच्या सीमारेषेवर, भूमध्य समुद्राच्या किनारी, मोनॅको नावाचे लहानसे राज्य होते. कुठल्याही देशातील

एखाद्या शहराची लोकसंख्या मोनॅकोच्या लोकसंख्येहून जास्त भरली असती. कारण तिथे फक्त सात हजार लोकवस्ती होती आणि सर्व राज्याची वाटणी केली असती, तर प्रत्येकाला, एक एकरसुद्धा जमीन आली नसती. पण या खेळण्यातील राज्याला राजा होता. त्याला राजवाडा होता. दरबार होता. मंत्री होते. धर्मगुरू होते, सैन्यप्रमुख होते व सैन्यही होते.

ते मोठे सैन्य नव्हते. फक्त साठ लोक होते. पण तरीही ते सैन्य होते. सगळीकडे होते, तसेच इथेही लोकांना कर भरावे लागत. तंबाखू, दारू, यावर व मतदानावर कर असे. जरी इतर देशातल्यासारखे लोक दारू पीत असले आणि सिगरेट ओढत असले, तरी मुळात लोकच इतके कमी होते, की दरबारी मंडळी, अधिकारी मंडळी व तो राजा स्वतः या सर्वांना पोसण्यासाठी, राजाला नवीन उत्पन्नाचे विशेष साधन शोधण्यावाचून, काही गत्यंतर नव्हते. हा विशेष कर लोक जिथे जुगार खेळत, त्या खेळघरातून येई. लोक जुगार खेळतांना जिंकत किंवा हरत. पण खेळात लावलेल्या पैशांच्या काही टक्के रक्कम तेथील संचालकाला मिळे आणि त्याला मिळालेल्या रकमेतून तो मोठा वाटा राजाला देई. तो खूप पैसे देत असे, कारण युरोपमध्ये तेवढाच जुगाराचा अड्डा उरला होता. जर्मनीमधील काही

राष्ट्रांमध्ये अशा प्रकारची जुगाराची खेळघरे होती. पण काही काळापूर्वी, त्यावर बंदी घालण्यात आली. असे करण्याचे कारण, त्यामुळे फार त्रास होऊ लागला. माणसे येऊन त्यांचे नशीब आजमावतात, धोका घेत व सर्व पैसा घालवून बसत. आणि मग निराशेने स्वतःला बुडवून घेऊन किंवा गोळी मारून घेऊन, आत्महत्या करतात. त्यामुळे जर्मनांनी त्यांच्या राजाला असा पैसा मिळवणे बंद करायला सांगितले. पण मोनॅकोच्या राजावर बंदी आणणारे, असे कोणी नव्हते. त्यामुळे तो प्रकार चालू राहिला.

त्यामुळे आता ज्यांना जुगार खेळायचा आहे, ते मोनॅकोला जातात. ते जिंकू देत किंवा हरू देत, राजाला पैसे मिळत रहातात. तुम्हाला दगडी राजवाडा, प्रामाणिक श्रमांवर मिळवता येत नाही. एका म्हणीप्रमाणे, मोनॅकोच्या राजाला माहिती आहे, की हा वाईट प्रकार आहे, पण तो काय करणार? दारू आणि तंबाखूवर कर बसवून पैसा मिळवणे, ही पण काही चांगली गोष्ट नाही. पण तो अशा तऱ्हेने जगत असे. राज्य करत असे आणि पैशात लोळत असे. खऱ्या राजाप्रमाणे त्याचा दरबार सांभाळत असे व सर्व समारंभ साजरे करत असे.

त्याचा राज्यारोहण समारंभ देखील झाला. तो तटबंदी बांधे. बक्षिसे देई. सूचना करे. क्षमा करे. तो परीक्षणे करे. परिषदा भरवे.

कायदे तयार करे. न्यायालये चालवे. सर्व काही दुसऱ्या राजांसारखेच, पण लहान प्रमाणात.

काही वर्षांपूर्वी असे झाले, की त्याच्या लुटूपुटीच्या राज्यात एक खून झाला. राज्यातील लोक शांतीप्रिय होते आणि पूर्वी असे कधी झाले नव्हते. समारंभपूर्वक जज्ज एकत्र झाले आणि कायदेशीर रीत्या केस हाताळली गेली. तिथे जज्ज, वकील, ज्युरी, असे सगळे लोक होते. त्यांनी वादविवाद केला. तर्कवितर्क केले आणि शेवटी गुन्हेगाराला कायद्याने फाशीची शिक्षा सुनावली. इथपर्यंत ठीक झाले. मग त्याला राजाकडे नेले. राजाने त्याला जोखून, त्याच्या शिक्षेवर शिक्कामोर्तब केले. ‘जर गुन्हेगाराला फाशी देणे गरजेचे असेल, तर त्याला फाशी द्या.’

या बाबतीत एकच गोम होती. त्यांच्याकडे गिलोटिन नव्हते व फाशी देणारा कुणी माणूस नव्हता. मंत्र्यानी यावर विचारविनिमय करून फ्रेंच सरकारला विनंती केली, की ते त्याना गिलोटिन व ते चालवणारा माणूस देतील का आणि देऊ शकत असतील, तर त्याची किंमत काय असेल. पत्र पाठवले गेले व आठवड्याने त्याचे उत्तर आले. ते गिलोटिन व ते चालवणारा माणूस देतील. त्याची किंमत १६००० फ्रँक्स पडेल. ते राजासमोर

ठेवण्यात आले. त्याने विचार केला ‘१६००० फ्रँक्स! इतके पैसे घालवणे काही बरोबर नाही.’

तो म्हणाला, “त्या मूर्खांची इतकी किंमत नाही. असे करता येणार नाही. याहून स्वस्तात काही करता येणार नाही का? १६००० फ्रँक्स म्हणजे आपल्या एकूण लोकांचा दरडोई खर्च दोन फ्रँक्सपेक्षाही जास्त होतो. लोकांना हे परवडणार नाही. दंगेधोपे होतील.”

त्यामुळे काय करता येईल, याबद्दल विचारविनिमय करायला एक समिती नेमली गेली. असा ठराव पास झाला, की इटालीच्या राजाला असेच पत्र पाठवावे. फ्रान्समध्ये लोकशाही सरकार असल्याने, त्यांच्या मते राजाला काही मान नाही. पण इटालीचा राजाची आपल्यासारखीच एकाधिकारशाही आहे. ते कदाचित आपल्याला स्वस्तात हे काम करून देतील. त्यामुळे पत्र लिहिले गेले. लगेच उत्तरही आले.

इटालियन सरकारने सांगितले, की आम्ही तुम्हाला दोन्ही फक्त १२००० फ्रँक्समध्ये देण्यास तयार आहोत. यात प्रवासखर्च पण आला. हे जरा स्वस्त होते. पण तरी जास्तच वाटत होते. ते लुटारू काही इतक्या किमतीच्या लायकीचे नव्हते. दरडोई हादेखील खर्च फारच होता. हे अजून स्वस्तात कसे करता येईल,

असा विचार ते करू लागले. सैन्याच्या जनरलला बोलावून विचारण्यात आले, की असा एखादा सैनिक नाही का, जो गुन्हेगाराचे डोके उडवू शकेल? युद्धात ते शत्रूला ठार करतात. खरे तर त्यांना त्याचे प्रशिक्षण दिलेले असते. तेव्हा मग जनरल सैनिकांशी त्याबद्दल बोलला. पण कोणीच तयार होईना. ते म्हणाले, "ते कसे करायचे, आम्हाला माहिती नाही. असे काही आम्हाला शिकवलेले नाही."

आता काय करावे? मंत्रीगणांनी परतपरत विचारविनिमय केला. एक परिषद घेतली. बैठक बोलावली. शेवटी त्यांनी असे ठरवले, की फाशीऐवजी आजन्म कारावास देणे, सर्वात उत्तम राहील. राजाला त्याच्यावर दया दाखवता येईल. आणि ते स्वस्तही पडेल.

राजाही तयार झाला मग तसेच करायचे ठरले. आता अशी अडचण निर्माण झाली की गुन्हेगाराला आयुष्यभर ठेवता येईल, असा तुरुंग नव्हता. एक लहानसा तुरुंग होता. तिथे कधीकधी लोकांना काही काळ ठेवले जाई. पण कायमच्या उपयोगासाठी भक्कम असा तुरुंग नव्हता. तरीही त्यांनी असे एक ठिकाण मिळवले व तिथे त्या तरुण गुन्हेगाराला ठेवले. त्याच्यावर लक्ष

ठेवायला एक वॉचमन नेमला. त्याचे काम गुन्हेगारावर लक्ष ठेवणे व त्याच्यासाठी राजवाड्यातून जेवण आणणे हेच होते.

तिथे कैदी महीन्यांमागून महीने राहिला. एक वर्ष होऊन गेले. पण मग राजाने हिशेब बघितला असता, त्याला एक नवीनच खर्च दिसून आला. त्या कैद्यासाठी होणारा खर्च काही कमी नव्हता. विशेष वॉचमन, त्याचे जेवण यावर वर्षभरात ६०० फ्रँक्सहून जास्त खर्च झाला होता. त्याहून वाईट म्हणजे, तो कैदी अजूनही बळकट आणि तरुण होता आणि अजून पन्नास वर्षे तरी जगला असता. हा हिशेब करू बघितला, तर बाब गंभीर होती. हे परवडणे शक्य नव्हते. म्हणून मग राजाने त्याच्या मंत्र्यांना बोलावून म्हटले,

“या मूर्खाला शिक्षा देण्याची काही स्वस्त पद्धत, तुम्ही शोधून काढली पाहिजे. आताची पद्धत फार खर्चिक आहे.”

मंत्रीगणांनी परतपरत विचारविनिमय केला. त्यातील एकजण म्हणाला, “मला वाटते, त्या वॉचमनला काढून टाकावे.” दुसरा एकजण बोलला, “पण मग कैदी पळून जाईल.” पहिला उत्तरला, “ठीक आहे. त्याला पळून जाऊ दे. मग त्याला फाशी देऊ!” त्यांनी त्यांची साधकबाधक चर्चा राजाच्या कानावर घातली. राजाला ती पटली. वॉचमनला काढून टाकण्यात आले. आता

काय होते, हे पहाण्याकरता, ते थांबले. आणि झाले काय, तर जेवायच्च्या वेळेस कैदी बाहेर आला आणि तिथे वॉचमनला न बघितल्यामुळे, तो त्याचे जेवण आणण्याकरता राजाच्या स्वयंपाकघरी गेला. त्याने त्याला दिलेले जेवण घेतले. तुरुंगात परत आला. स्वतःच दार लावले. आणि आत बसून राहिला. दुसऱ्या दिवशी पुन्हा तसेच झाले. तो जेवायची वेळ झाली की जेवण आणायला जाई. पण तो पळून जाण्याचे काही नाव घेईना. आता काय करावे? त्यांनी परत विचारविनिमय सुरु केला.

ते म्हणाले, “आपल्याला त्याला सरळ सांगावे लागेल, ’आम्हाला काही तुला इथे ठेवून घ्यायचे नाही.’ तेव्हा मग त्याला न्यायाधीशासमोर आणण्यात आले. “तू पळून का जात नाहीस? तुझ्यावर देखरेख करायला कोणी नाही. तुला हवे तिकडे, तू जाऊ शकतोस. राजा काही हरकत घेणार नाही.”

तो कैदी बोलला, “राजा काही हरकत घेणार नाही, हे ठीक आहे. पण मला जायला कुठली जागा नाही. मग मी काय करणार? तुम्ही मला शिक्षा देऊन, माझे चारित्र्य खराब केले आहे. आणि आता कोणी लोक, मला थारा देणार नाहीत. मला कोणी काम देणार नाही. तुम्ही माझ्याशी गैरवर्तणूक ठेवलीत. हे बरोबर नाही. एकदा तुम्ही मला फाशी द्यायचे ठरवल्यावर, मला फाशी

द्यायला हवे होते. पण तुम्ही ते केले नाही. ही एक गोष्ट. तुम्ही मला उमरकैदेची शिक्षा सुनावलीत, आणि मला जेवण आणून देण्यासाठी एका माणसाला नेमलेत. पण वर्षभराने त्याला काढून टाकलेत. मग मलाच माझे जेवण आणण्यासाठी जावे लागले. तरीही मी काही तक्रार केली नाही. पण आता तर तुम्ही मला पळून जायला सांगत आहात.मी  हे कबूल करणार नाही. तुम्हाला काय हवे ते करा. पण मी काही इथून जाणार नाही.''

परत पश्न उभा राहिला, आता काय करावे? परत एकदा परिषद बोलावली गेली. काय चाल खेळावी? तो माणूस जाऊ शकत नाही. त्यांनी परत विचारविनिमय सुरु केला. त्याच्या कचाट्यातून सुटायचा एकच उपाय दिसत होता. तो म्हणजे त्याला निवृत्तीवेतन चालू करणे. तसे त्यांनी राजाला कळवले. ते म्हणाले, ''त्याच्या कचाट्यातून सुटायचा दुसरा काही उपाय उरला नाही.'' ६०० फ्रँक्स इतकी रक्कम ठरवली गेली व ते कैद्याच्या कानावर घातले.

तो म्हणाला, ''ठीक आहे. जोपर्यंत तुम्ही हे नेमस्तपणे द्याल, तोपर्यंत माझी काही हरकत नाही.''

मग तसे करायचे ठरले. वर्षातील एक तृतीयांश रक्कम त्याला अगोदर देण्यात आली. त्याला राजाच्या कैदेतून मुक्त

करण्यात आले. रेल्वेने राजाच्या हद्दीबाहेर जाणे, फक्त पाऊण तासात शक्य होते. तो गेला. आणि सीमेपासून थोड्याच अंतरावर राहू लागला. तिथे त्याने काही जमीन विकत घेतली. बागेत काही पीक काढून ते विकू लागला आणि आरामात राहू लागला. तो पैसे घेण्यासाठी नेमाने परत येई. ते घेऊन, तो जुगार अड्ड्यांवर जाऊ लागला. दोन किंवा तीन फ्रँक्स सट्ट्यावर लावू लागला. कधी तो जिंके. तर कधी हरे. आणि मग घरी येई. तो शांततेत, चांगला राहू लागला.

त्याचे बारीकसारीक गुन्हे करणे चालूच राहिले. पण त्याने गुन्हा राज्याच्या हद्दीत केला नाही, हे बरे केले. कारण त्या राज्यात, त्याना गुन्हेगाराला फाशी देणे किंवा आजन्म कारावास देणे परवडत नसे.

# अनुवादिकेची ओळख



## डॉ. वृषाली जोशी

B Sc, M A, M Ed, Ph D

२५ अनुवादित कथा मराठी मासिकामधून प्रसिद्ध झाल्या आहेत. ई साहित्यतर्फे सतरा पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.


मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळाकॉलेजमध्ये अध्यापन केले आहे.


संशोधन प्रकल्पात सहभाग घेतला आहे.


कॉलेजमध्ये प्राचार्यपद भूषवले आहे.

सुगमसंगीत स्पर्धेत पारितोषिके, सिंथेसायझरवर गाणी वाजवण्याचा, कविता करण्याचा व शब्दकोडी बनवण्याचा छंद आहे.

संपर्क: वृषाली जोशी ७, अक्षय, २० तुळशीबागवाले कॉलनी पुणे ४११००९, चलभाष ९९२१७४६२४५












ज्या  कव्हरवर क्लिक कराल

ते पुस्तक उघडेल


(नेट आवश्यक)

























शेरलॉक होम्स
१ ते ८
ज्या कव्हरवर
क्लिक कराल ते
पुस्तक उघडेल








**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे तेरावे वर्ष.**

**डॉ. वृषाली जोशी यांचे हे अठरावे पुस्तक.**

डॉ. वृषाली जोशी या मराठी व इंग्रजी या भाषांच्या विद्वान आहेत. त्या प्राचार्य होत्या. त्यांनी काही काळ विदेशातही राहून तेथल्या वाचन संस्कृतीचा अनुभव घेतला आहे. तशीच वाचन संस्कृती महाराष्ट्रातही निर्माण व्हावी असे त्यांना वाटते. इंग्रजीतील उच्च दर्जाचे निवडक लेखकांचे साहित्य मराठीत अनुवाद करून मराठी वाचकांची अभिरूची संपन्न व्हावी यासाठी त्या अतोनात कष्ट घेतात. तसे पहाता अनुवादित पुस्तकांना अनेक व्यावसायिक प्रकाशकांकडून मागणी असते. परंतू मराठीतील जास्तीत जास्त वाचकांपर्यंत आपले साहित्य जावे म्हणून त्यांनी ई साहित्यची निवड आपल्या पुस्तकांसाठी केली आहे.

डॉ. वृषाली जोशी यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली सर्व पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर शंभू गणपुले (नऊ पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९ पुस्तके), डॉ. वसंत बागुल (१७ पुस्तके), शुभांगी पासेबंद (९ पुस्तके), अविनाश नगरकर ( चार पुस्तके), डॉ. स्मिता दामले (सात पुस्तके), डॉ. नितीन मोरे (२७ पुस्तके), अनील

वाकणकर (९), अनंत पावसकर(४ पुस्तके), मधू शिरगांवकर (६), अशोक कोठारे (बारा हजार पानांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १६ पुस्तके), विनीता देशपांडे (७ पुस्तके) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(१६), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (८), अंकुश शिंगाडे(५), आनंद देशपांडे(२), निलीमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(२)  असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं ’इ’यें।

दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।